

# माणूस

११ जुलै १९७० । चाळीस पैसे

## क्रांतिकारी युवाशक्तीला एक सुवर्णसंधी

कार्यानुभवनाला (वर्क एक्स्पीरिअन्स) शिक्षणात खूप महत्त्व आहे. कोठारी शिक्षण आयोगाने शिक्षणातल्या ह्या पैलूवर फार भर दिलेला आहे. पण हा कार्यानुभवदेखील दिखाऊ ठरतो की काय अशी भीती निर्माण झालेली आहे. हल्ली शालेय जीवनात 'विज्ञानाचे प्रयोग' या नावाखाली बव्हंश ठिकाणी जे चालते त्याचीच कळा कार्यानुभवाला आणली जाण्याची शक्यता आहे! कार्यानुभवासंबंधी इतिहासादी विषयांप्रमाणे प्रवचनपद्धतीनेच प्रकाश टाकण्यात येईल असे दिसते! कार्यानुभवासाठी मन–बुद्धीचा सहयोग हवाच, पण कर्मेन्द्रिये त्यासाठी राबलीदेखील पाहिजेत. कर्म हो गद्ध-हमाली ठरू नये, आणि मनो–बुद्धीचे सहकार्य ही एक करमणूक बनू नये, अशी दक्षता घेतल्याशिवाय कार्यानुभवाला काही अर्थ राहाणार नाही. सत्संगती, कार्यानुभव ही शिक्षणातील महत्त्वाची तत्त्वे एकत्र साकार होण्याच्या दृष्टीने सोमनाथच्या मानव शक्तिसंवर्धन केंद्रात एक नवीन पाऊल येत्या नऊ ऑगस्टपासून टाकले जाणार आहे. पंचवीस तरुणांना उद्याच्या भारताच्या घडणीसाठी तयार केले जाणार आहे. उद्याच्या भारताच्या घडणीत छोटा शेतकरी आणि शेतमजूर यांचा वाटा फार मोठा असणार. शेतकरी व शेतमजूर यांना ही ऐतिहासिक जबाबदारी कार्यक्षमरीतीने पार पाडता यावी, या दृष्टीने विशेष हालचाल आज तरी आढळत नाही. सोमनाथला सुरू करण्यात येणाऱ्या शिक्षणविषयक प्रयोगात या गोष्टीची जागती जाणीव आहे. हरित क्रांतीची वाटचाल ज्या टप्प्यापाशी अडली आहे तो टप्पा छोटा शेतकरी व शेतमजूर हाच आहे.

लोकशाही समाजवादाच्या घोषणांची कसोटी याच एका टप्प्यावर लागणार आहे. नुसत्या ......

 मुखपृष्ठ १ वरून

जमिनीचे फेरवाटप करून प्रश्न सुटणार नाही, तर वाटयाला येणारी छोटी जमीन ही अधिक उपजाऊ कशी बनवता येईल त्याचे तंत्रही ह्या जमीन-धारकाला द्यावे लागणार आहे. हे नवे तंत्र व्यवस्थापनविषयकही असले पाहिजे तसे उत्पादनविषयकही असले पाहिजे. हरित क्रांती अशा दोन पंखानी उड्डाण घेईल तरच रक्ताळ लाल क्रांतीला ती रोकू शकेल. जमिनीच्या फेरवाटपानेही काम भागणार नाही, त्याचप्रमाणे नुसत्या आधुनिक उत्पादन तंत्रानेही भागणार नाही. एक दारिद्र्य वाढवील तर दुसरे परिग्रहाचे व विषमतेचे पोषण करील. दोन्ही समाजाला अहितकरच.

सोमनाथच्या मानव शक्तिसंवर्धन केंद्राने या दृष्टीने प्रयोग करण्यासाठी २५ तरुणांना आवाहन केले आहे. दृष्टी घेऊन, तळमळीने आणि उमाळयाने यापुढील काळात छोटया शेतकऱ्याच्या व शेतमजुराच्या भरभराटीसाठी प्रयत्न करणारे हे तरुण असतील. देशात ऐंशी टक्के ग्रामीण जन याच वर्गात मोडतात. कोरडया आश्वासनांनी किंवा जमिनीचे छोटे तुकडे देऊन त्यांच्यात त्राण निर्माण होणार नाही किंवा संघर्ष करण्याची कुवतही येणार नाही. भारताची यापुढील घडण ज्या पायावर केली जाणार आहे तो पाया तयार करण्याची (बेस-लाइन) ही धडपड आहे. ह्या पायावर आणि अशा धडपडणाऱ्या युवाशक्तीच्या साहचानेच भारताची अपेक्षित भावी घडण करता येणार आहे. राजकीय पक्षाजवळ असे तंत्रनिपुण तळमळीचे व उमाळयाचे कार्यकर्ते असावे लागतील. तीच गोष्ट नवसमाजाची घडण करण्याची स्वप्ने पाहणाराबाबतही आहे. इस्राएलमध्ये किबुत्झ आणि मोशाव उभारणाऱ्या तरुणासारखी जिद्द असणारे, सुबुद्ध युवक कार्यकर्ते ही आजची गरज आहे.

श्री. बाबा आमटे आपल्या मानवशक्ति–संवर्धन केंद्राच्या वतीने असा उपक्रम येत्या ९ ऑगस्टपासून सोमनाथला सुरू करू चाहत आहेत. तेथे जाणारे तरुण ऋतुचक्राचा एक परिपूर्ण फेरा होईपर्यंत त्याच्या संगतीत राहातील. कार्यानुभव घेतील. ह्या वर्षभरात त्याना प्रत्यक्ष शेतीत काम करावे लागेल, त्याप्रमाणे परिसरातील नियोजनाच्या आखणीत लोकबिरादरीच्या कार्यात सहभागी व्हावे लागेल निवास भोजनासाठी आवश्यक श्रम करण्याची तयारी असणाराना कोणताही खर्च येणार नाही, बाकी खर्च अर्थातच त्यांना वा त्यांना पाठवणाऱ्या संस्थांना करावा लागेल. भारतातील ही अभिनव अशी पहिलीच योजना असून धडधाकट शरीराच्या व मनाच्या तरुणाना ही नामी अशी संधी आहे. हात, डोके आणि हृदय याना क्रियाशील करून समाज-परिवर्तन करू मागणाऱ्यानी यासंबंधी संयोजकाशी संपर्क साधावा. फक्त २५ तरुणांनाच या पहिल्या फेरीत प्रवेश मिळेल. नोकरीसाठी उपयोगी पडणारे कोणतेही प्रमाणपत्र मिळणार नाही. मिळेल फक्त पुढे यशस्वीपणे कार्य करण्याचा आत्मविश्वास ! तरुण मने चांगल्या गोष्टीबाबत किती संवेदनाशील आहेत ते अजमावण्याचाच हा एक प्रयत्न आहे. देशाच्या भरभराटीसाठी स्वेच्छेने वर्षभर हा तुरुंग पत्करावयाचा आहे, स्वातंत्र्य-चळवळीच्या काळात तरुणानी अढळ निष्ठा दाखवली होती व त्यातूनच स्वातंत्र्याचा उदय झाला.

संपर्क-संयोजक, मानवशक्ति-संवर्धन केंद्र, अभिमन्यूनगर, पो. मारोडा, जि. चंद्रपूर.

११ जुलै १९७०

# माणूस

| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| --- | --- | --- |
| अंक : सहावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| --- | --- | --- |
| चाळीस पैसे | वीस रुपये | चाळीस रुपये |


## सप्रेम नमस्कार...

मी आपला २० जून ७० चा माणूस वाचला. त्यात 'मला चांगला म्हणू नकोस' ही राजश्री ठकार यांची गोष्ट वाचली. वाचून त्यामधील 'उस्मान' इतका मनाला खटकला आणि झोंबला की लिहिणेच नको पुढे. त्या गोष्टीमधील मदाला उस्मान-शिवाय कुणी 'भारतीय हिंदू' मिळाला नसता का ? आपण स्वत: गोष्ट छापण्या-पूर्वी सेन्सॉर करून उस्मानऐवजी दुसरे कोणीतरी हिंदू नाव घालू शकला असता. पण...जाऊ दे. वास्तविक आतापर्यंत भारतीय नारीचे असे वर्तन कधी आढळले नाही. परमुस्लीम सोडाच पण परपुरुषसुद्धा तिने कधीही इच्छिलेला नाही. माझा आपणावर दावा आहे की आपण असे का छापलेत ? असल्या भुक्कड गोष्टी न छापलेल्या बऱ्या. सध्याच्या चालू तंग वातावरणात आपण आणखी भर घालीत आहात.

२६ जून, १९७० — र. ग केळकर, मोतीनगर

आपल्या माणूसच्या दि. १३ व २० जूनच्या अंकातील 'अब्बाजान' व 'मला चांगला म्हणू नकोस' याच्याबद्दलचे माझे मत कळवीत आहे. अशा तऱ्हेच्या

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

न्यूनगंडी ' गोष्टी येऊ नयेत असे मला वाटते.

' हा एक न्यूनगंडाचा प्रकार. ' माणूसच्या गेल्या दोन अंकातील गोष्टीबाबतचा झालेला ग्रह असा आहे. कुठलीही गैर अनीतीकारक गोष्ट असो, त्यातील अशा तऱ्हेच्या कामासाठी हिंदू बाईची योजना व तिला सकटमुक्त करण्यासाठी किंवा पुरुषी अहंकाराने तिला एकप्रकारे मदत केल्याचे दाखवून शेवटी विनाशाकडेच नेण्यासाठी मुसलमान-अहिंदू युवकाची योजना करणे किंवा जातीय दगल झाल्यास हिंदू मुलास एका मुसलमान किंवा अहिंदू, मिशनरी लोकानी वाचविणे असा सकेत झालेला दिसतो. उलट पद्धतीने या गोष्टी लिहिता येणारच नाहीत काय ? का त्यात पुरोगामीपणा दिसणार नाही असे वाटते ? का तसे धैर्य नाही ?

२४ जून, ७० डॉ. मो. ग. कानिटकर, खडकी.

## सर्व मेडिकल कॉलेजीस सरकारने ताब्यात घ्यावी !

आपल्या २७ जूनच्या ' माणूस'च्या अंकातील श्री. वरुण भिडे यांचा ' तर कलकत्ता दूर नाही ' हा लेख वाचला. या विषयावर मी गेल्या ३–४ वर्षात थोडा फार विचार आणि काही हालचाल केली होती. आपल्या समोर हे मांडावे असे वाटले म्हणून हे पत्र.

जळगावचे बरेच विद्यार्थी मेडिकल कॉलेजला प्रवेश मिळत नाही म्हणून माझ्याकडे येतात, व डेंटल कॉलिजसंबंधी चौकशी करतात. या मुलांना ६०% चे वर गुण मिळालेले असत असे मला दिसून आले. आणि इतक्या चागल्या विद्यार्थ्यांना मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळू नये याचे फार वाईट वाटे. यावर थोडा विचार करता असे दिसले की पुणे विद्यापीठाच्या कक्षेतील विद्यार्थ्यांवर फार अन्याय होत आहे. ~ मराठवाडा, नागपूर, मुंबई व शिवाजी या विद्यापीठातील मुलाना ५३–५५%मार्क असता प्रवेश मिळतो. त्यावेळी पुणे विद्यापीठाच्या मुलांना ६५ टक्के मार्काची जरुरी असते.

या विषयावर मग मी येथील काही प्राध्यापक मंडळीबरोबर चर्चा केली. त्यांना यात काही रस वाटला नाही. प्रिन्सिपॉल साहेबाना भेटलो. त्यांनाही यात काहीच रस दिसला नाही. एकदा गाडीतून जाताना पुणे विद्यापीठाचे रजिस्ट्रार श्री. गोळे भेटले. त्याना याबद्दल विचारले. त्याचे म्हणणे असे की काही कोष्टक ठरवूनच कॉलेज अॅडमिशनची वाटणी केलेली आहे. यात अन्याय काही विशेष नाही.

पुढे येथील काही मुलांना घेऊन शिक्षण मंत्र्याना भेटण्याचा विचार केला. मुले कोणी पुढे आलीच नाहीत.

शेवटी शिक्षणमंत्र्यांना याबाबत पत्र लिहून मला चर्चा करण्यासाठी वेळ मागितला. त्याला उत्तर आले की शिक्षणमंत्र्यांचा हा विषय नाही. –थोडक्यात कोणालाच रस

घ्यायची इच्छा दिसली नाही म्हणून मी नाद सोडला. वास्तविक मला स्वतःला यात काही मिळणार नव्हते. माझे जवळचे कोणीही मेडिकलला जाण्याची शक्यता नाही. आता पुण्यातीलच मुलांना ७० टक्के मार्क मिळून प्रवेश नाही तेव्हा हाकाटी सुरू झालेली आहे व पुण्याच्या लोकाची आता कुठे चळवळ सुरू झालेली आहे. यासाठी काही उपाय माझ्या डोक्यात आहेत.

१ : मुंबईला ५० लाख लोकसंख्येला ४ कॉलेजीस व एकूण प्रवेशसंख्या ६०० आहे. पुणे विद्यापीठाच्या कक्षेतील लोकसंख्येच्या प्रमाणात १२० विद्यार्थ्यांना प्रवेश हा पहिला अन्याय आहे.

२ : मुंबईतील ४ पैकी ३ कॉलेजीस कॉर्पोरेशनची व १ सरकारी आहे. काही लोकाचे असे म्हणणे की महापालिकेची कॉलेजीस असल्याने तेथे अर्थातच मुंबई-करांना प्रवेश मिळेल.

३ : आता मुंबईतून पास झालेली मुले किती प्रमाणात खेडे भागात प्रॅक्टीस करण्यासाठी जातात याचा विचार व्हायला पाहिजे. शिवाय मुंबईतून पास झालेली किती मुले परदेशी कायम वास्तव्यासाठी गेली—गेल्या दहा वर्षातील—याचाही हिशेब घ्यायला हवा.

## पुण्यातील विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे...

४ : म्हणजे असे दिसते की सरकार खर्च करीत असलेला पैसा वाया जात आहे. जेथे गरज आहे तेथे डॉक्टर जात नाही. पुण्यातून पास होणारी अगर असे म्हणू की खेड्यातून जाऊन डॉक्टर झालेली मुले परत आपल्या गावी येण्याची शक्यता अधिक.

५ : याला उपाय असा की आणखी कॉलेज काढावे. पण मला वाटते त्याची जरुरी मुळीच नाही. एक तर हे प्रकरण अती खर्चाचे शिवाय काही वर्षातच डॉक्टर लोकाची बेकारी वाढण्याची स्पष्ट चिन्हे दिसत आहेत. इंजिनिअराचेबाबत झालेला मूर्खपणा येथे टाळावा. म्हणून मुबईतील प्रत्येक कॉलेजमध्ये २५ विद्यार्थी पुणे विद्यापीठ कक्षेतील घेण्याची सक्ती सरकारने करावी म्हणजे १०० ची वाढ होईल. महापालिकेची ३ कॉलेजीस हे मान्य करणार नसतील तर Grant medical college मुंबईतील विद्यार्थ्यांना बद करावे व बाहेरील विद्यार्थ्यांनाच प्रवेश द्यावा.

६ : सर्वात उत्तम उपाय म्हणजे महापालिकेची सर्व कॉलेजीस व इतरत्र असलेली सर्व विद्यापीठांच्या कक्षेतील कॉलेजीस सरकारने ताब्यात घ्यावीत. या सर्व कॉलेजीसच्या administration साठी एक खास विभाग उघडावा. व महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यांना एकाच ठिकाणी अर्ज करावयाला लावून मेरिटप्रमाणे लिजात विभागणी करून प्रश्न सोडवावा.

या विषयावर वर्तमानपत्रातून जी चर्चा चालू आहे त्यात मुबईतील कॉलेजीसबद्दल कोणी बोलताना दिसत नाही. वास्तविक हाच खरा महत्त्वाचा मुद्दा आहे. मुंबईकर विद्यार्थ्यांसाठी सरकारने किती खर्च करावेत, त्यांची आर्थिक स्थिती, खेड्यातून

येणाऱ्या मुलाची आर्थिक स्थिती, तो मुलगा पुढे कोठे धंदा करणार, या सर्व गोष्टीचा विचार होणे आवश्यक आहे.

शिवाजी विद्यापीठातील मुलांच्यासाठी पुण्याला जागा ठेवण्याची सरकार सक्ती करू शकते तर पुण्याच्या विद्यार्थ्यांसाठी मुंबईला का सक्ती करता येत नाही ? महाराष्ट्राचेच असे भाग पाडणे अती किती धोक्याचे आहे हे सांगण्याची आवश्यकता नाहीच.

३० जून, ७० —डॉ. राम आपटे, जळगाव

## कोणत्याही अर्थाने तेंडुलकरांचे ' गिधाडे ' न–नाटच नाही.

आपल्या दिनांक वीस जूनच्या अंकातील श्री. विलास पतकी यानी ' गिधाडे ' या श्री. विजय तेंडुलकराच्या नाटकाचे केलेले समीक्षण वाचले. त्यांनी स्वतःची म्हणून व्यक्त केलेली काही मते आक्षेपार्ह आहेतच (परंतु त्यांचा विचार येथे प्रस्तुत नाही) ; परतु त्यापेक्षाही सर्वसाधारण माहिती म्हणून रंगभूमीविषयी त्यांनी जी काही विधाने केली आहेत त्या विधानाबद्दल थोडेसे लिहीत आहे.

श्री. पतकी म्हणतात, " ' गिधाडे ' या नाटकाचा ललितकृती म्हणून विचार करताना, मला तरी, ती न-नाटच स्वरूपाची वाटते. न-नाटच म्हणजे ज्या नाटकात नाटच हे साध्य नसून निमित्त आहे; साधन आहे. "...या दोन वाक्यांपैकी पहिल्या वाक्यात, श्री. पतकी यानी, " मला तरी " असा सावध शब्दप्रयोग केलेला असला तरी ' न-नाटच ' हे काही वैयक्तिक मतानुसार अर्थच्छटा बदलणारे वर्णनात्मक विशेषण नाही.—ती एक वाङ्‌मयीन संज्ञा आहे. न-नाटच हा शब्द, मराठीत, Theatre of the Absured या चळवळीने निर्माण केलेल्या Anti-Theatre या शब्दाला प्रतिशब्द म्हणून योजला जातो. (प्रत्यक्षात अनेकजण काहीही नवे प्रयोग करणारे नाटक असले की त्यास न-नाटच म्हणतात ही गोष्ट वेगळी.) Anti-Theatre या शब्दाची फोड, श्री. पतकी यांनी, " नाटकात नाटच हे साधन नसून निमित्त आहे " अशी केली काय ?...वस्तुतः Anti-Theatre याचा अर्थ, जी रंगभूमी कथानकाची तीन अंकातील वर्तुळाकार गुंफण; तर्कबद्ध, सुसंगत व्यक्तिमत्त्व; वाङ्‌मयीन ढंगाने लिहिलेले सवाद; नाटकातून कथा सागण्याचा प्रयत्न; या सर्व पारंपरिक मूल्याच्या विरुद्ध आहे ती, असा होतो. त्यामध्ये दृश्य माध्यम सर्वाधिक महत्त्वाचे; आणि कथा ही दुय्यम असते. (म्हणजे नाटच हे निमित्त नसून सर्व काही असते.) काळकल्पना या नव्या नाटककाराना मान्य नाही; हास्य-कारुण्य यातील विरोधही मान्य नाही. काळ्या सुखात्मिका ( Dark-Comedies) लिहिणारे हे नाटककार भावविवशतेचा तिटकारा करतात. शब्द रोजच्या व्यवहारात वापरून अर्थहीन झाल्यामुळे हे श्राव्य माध्यम मोडून पुन्हा नव्याने अर्थपूर्ण करण्याचा प्रयत्न या नव्या नाटककारांनी केलेला आहे. म्हणून ते या चळवळीला व्यस्त-ललित (Anti-Literary) रंगभूमी म्हणतात.

वरील कल्पना लक्षात घेतल्यास, कोणत्याही अर्थाने, श्री. विजय तेंडुलकराचे 'गिधाडे' हे नाटक न-नाट्य ठरू शकत नाही. कारण एक तर 'गिधाडे'मधील अशिष्ट भाषा, काही मानवी संबंधाविषयीचे उघडेवाघडे उल्लेख वजा केले तर या नाटकात नवीन असे काय आहे? श्रीमंत मनुष्य—औरस पुत्र, अनौरस पुत्र—औरस पुत्र पैशाला हपापलेले तर अनौरस पुत्र निरिच्छ, संवेदनाक्षम कवी!—त्याच्यावर प्रेम करणारी प्रेमळ पण दु.खी वहिनी—धंद्यामधील पैशासाठी भावाभावातील तेढ—घरादारातील सामान विकण्यापर्यंत पाळी येणे—ज्याच्यावर अन्याय झाला आहे त्या पात्रांनी तिसऱ्या अंकात पुन्हा येणे—अनौरस पुत्राकडूनच घराला वारस मिळण्याची शक्यता निर्माण होणे...हे सारे मराठी नाट्यरसिकाच्या चागल्या परिचयाचे तर आहे. या नाटकाची कथा वर्तुळाकर गतीत फिरून उत्कर्षबिंदूपाशी स्थिरावणारी आहे. अनौरस-पुत्राच्या निमित्ताने, दीर्घ, काव्यात्मक निवेदने करणारे एक पात्रदेखील यात आहे. हे पात्र, 'गिधाडे' हे नाटकाचे नावसुद्धा पुन्हा पुन्हा स्पष्ट करून सांगते. शब्दाची अनिवार हौ(सो)स असणारा श्री. विजय तेंडुलकरासारखा नाटककार, त्यांच्या नाट्य लेखनातील काही आविर्भावांमुळे आधुनिक वाटला तरी, भावविवश मराठी रंगभूमीच्या मूलसकेताच्या पलीकडे जाऊ न शकणारा असल्यामुळे त्याला न-नाट्य अभिप्रेत असेल असे वाटत नाही. पाश्चात्य परंपरेत ज्या संज्ञांमागे निश्चित तत्त्वज्ञान आहे, त्या मराठीत भोंगळपणे वापरून लेखकाने वाचकाचा बुद्धिभेद करू नये, एवढीच श्री. पतकी यांस नम्र विनती.

'गिधाडे' नाटकाच्या प्रयोगात मात्र चागल्या अर्थाने नावीन्य आढळले. या नाटकाच्या दिग्दर्शकाने लेखकाला त्याच्या कल्पनेपलीकडे जाऊन साहाय्य केले आहे. नेपथ्यात सरकता—फिरता रंगमंच न वापरता एकाच वेळी तीन-चार खोल्याचा अभिनय-क्षेत्र म्हणून केलेला उपयोग कल्पक होता. तसेच मानवातील पशुत्व दाखवणाऱ्या या नाटकातील फर्निचर बिनपॉलिशचे—झाडांच्या ढलप्यांसारखे होते. याबद्दल नेपथ्यकार श्री. बापू लिमये याचे अभिनंदन करावे. हे नाटक खरे म्हणजे डॉ. श्रीराम लागू याचे! त्यांनीच फक्त या नाटकातील विशिष्ट भाषेला उत्स्फूत अभिनयाचे रूप दिले आणि त्यातील थोरल्या गिधाडाचे काम प्रत्ययकारकपणे सादर केले.

मराठी प्रेक्षकानी पूर्वग्रह न बाळगता उत्साहाने नव्या प्रयोगाचे स्वागत करावे असे मलाही वाटते. परंतु हा उत्साह डोळस असावा असे, 'गिधाडे' या नाटकाची समीक्षणे वाचल्यावर, वाटू लागले आहे. 'गिधाडे' या नाटकाचे स्वागत त्यातील शिव्याळ भाषेसाठी करणे, त्यातील स्त्रीपुरुषसबधातील काही उल्लेखाच्या उघडेपणासाठी करणे, योग्य नव्हे. नाटक हे स्वतत्र माध्यम आहे. त्यातील श्रेयस्कर नावीन्य हे मूलतः नाट्यात्म नावीन्य हवे—तपशीलाचे नावीन्य केवळ सजावटीसारखे असते.

३० जून, ७०

— सौ. पुष्पा भावे, मुबई

# एस्.
# ऊर्फ बादल सरकार

वॉर्डन रोडवर समुद्रासमोर भुलाभाई देसाई इन्स्टिटयूट म्हणून एक रम्य ठिकाण पूर्वी होते. छानशी निवांत, बंदिस्त बाग, ताजी ताजी हिरवळ, त्या हिरवळीवर झाडाच्या बुध्यापासून तयार केलेले चित्रविचित्र कलापूर्ण मुखवटे, लगतच एक दुमजली प्रशस्त इमारत आणि त्या इमारतीत काय नव्हते, विचारा. एक छोटे उघडे प्रायोगिक नाट्यगृह होते, नृत्याचे वर्ग तिच्या काही दालनात चालत, नाटकांच्या तालमी आणखी काही मोठ्याशा दालनात घेतल्या जात, चित्रकाराचे आणि शिल्पकाराचे स्टुडियोज तिच्या आणखी काही भागात होते, सतारीची एक शाळा यातच तळमजल्यावर भरत असे आणि फोटोग्राफीचेही—कोणाचे कुणास ठाऊक—एक दालन होते. एवढे कमी झाले म्हणून की काय, एक ग्रंथालय, एक ग्रंथविक्रीकेंद्र आणि थिएटर युनिट या इ. अलकाझी यांच्या नाटयसंस्थेची कचेरी या इमारतीतच होती. अवचित तुमच्यासमोर पैंजण रुमझुमवीत धावत येऊन ' माफ कीजियेगा ' पुटपुटत बाजूने पुन्हा लगबगीन निघून जाई ती एका वेणीची नवयुवती कोण असे, सांगा ? साक्षात वहिदा रेहमान. सतारीच्या शाळेत स्वराची मैफल मध्येच थबकून एकदम सारे छात्र आणि गुरू वाकून उभे रहात आणि ज्याची पाउले जवळ येताच त्यांवर नतमस्तक होत तो गुरूंचा गुरू कोण असे, विचारा ? पंडित रविशंकर. कुठे तरी वाद्याची नाहीतर ठुमरीची नाहीतर पाश्चात्य गीताची ध्वनिमुद्रिका पुनः पुन्हा, पुन. पुनः एका ध्यासाने वाजत राही. कोण संगीत वेडा हा नाद करतो आहे म्हणून शोधावे तर आपल्या स्टुडिओत त्या ध्वनीमुद्रिकेच्या नशेने एकटेच बसलेले प्रसिद्ध चित्रकार गायतोंडे भेटत. पलीकडे स्टँडवर एकादा अपुऱ्या चित्राचा कॅनव्हास लावलेला असे. फोटोग्राफीचे दालन खुल्या रंगमंचालगतच होते. त्याच्याशी तेव्हांच्या गीता बाली नामक गुणी अभिनेत्रीचा काही संबंध असावा. ती त्या भागात आपल्याच नादात वावरताना सापडे. एका वेळी कित्येकदा हिरवळीवर नाटकाची तालीम, एक दोन दालनातून नृत्याचा सराव, पलीकडच्याच दालनात सतारीचा सामुदायिक रियाज चालत असे आणि या एकत्रित लयीवर शीळ घालीत हिरवळी-पलीकडल्या स्टुडियोत शिल्पकार मोहन घिसाड गालफडात पानाचा तोबरा भरून एकाद्या शिल्पावर एकाग्रपणे छिन्नी चालवीत असे. क्वचित या वास्तूत बाहेरची

## आम्ही अशीच नाटके केली....
## करतो आहो
## यानंतर देखील करू....

नवखी माणसे गर्दीने यायची. एकादा ' परिसवाद ' नाहीतर प्रायोगिक नाटकाचा प्रयोग व्हायचा. वास्तूचे नेहमीचे वहिवाटदार बाजूबाजूने फिरकायचे; आणि पुन: आपापल्या निर्मितीच्या नशेत निमग्न व्हायचे.

परवा पुष्कळ वर्षांनी तिथेच गेलो. तसा मध्यंतरी त्या बाजूने प्रसंगा प्रसंगाने क्वचित गेलोही होतो, पण तेव्हा फरक प्रकर्षाने जाणवला नव्हता. परवा तो कसा एका क्षणात पुरता जाणवला. उद्यान नव्हते. हिरवळ नव्हती. ती प्रशस्त दोन मजली ऐसपैस वास्तू नव्हती सतारीची सामुदायिक दिडदा नव्हती, नृत्यांची रुमझुम नव्हती, बोल नव्हते त्या जागी उभी होती एक पेटीवजा तुकतुकीत भक्कम वीस बावीस मजली वास्तू; काँक्रीटच्या ठाम उद्दामपणे. नि:स्तब्धपणे. ताठ आणि उंचच उंच. पहाताना वाटले की पूर्वीच्या इरकली पदराच्या नऊवारी ऐसपैस इमारतीच्या अंगाखांद्यावर कला खेळत होत्या, बागडत होत्या, वाढत होत्या. आता या नव्या बावीस मजली करड्या ' मेट्रन 'च्या धाकाने त्या जणू कुठेतरी हवाबंद दालनात जाऊन लपल्या आहेत. चिडीचीप बसल्या आहेत.

लिफ्टने दुसऱ्या मजल्यावर सोडले. नाही म्हटले तरी मनात आले, पूर्वी दुसऱ्या मजल्यापर्यंत येताना वाटेत थबकून ऐकावे, न्याहाळावे असे किती असे ! दोन जिने चढून वर येण्याला कधी कधी दोन तास लागत आणि क्वचित दुसऱ्या मजल्यावर पोचायचे आहे हेच मुळी विसरून तळमजल्यावरच्या एकाद्या कला–साधनेत सपशेल हरवून जायला होत असे. आज किती लौकर दुसऱ्या मजल्यावर पोचलो !

खरं म्हणजे हे जरा विषयांतरच झाले. काचेचे दार उघडून आतल्या वातानुकूलित दालनात प्रवेश केला आणि गजबज अंगावर आली. वर एक भले थोरले शोभिवंत झुंबर लटकत होते. खाली जाडजूड गालिचा, मोठी मोठी कोचे होती. भिंतीशी एक अगडबंब नक्षीदार रंगीबेरंगी अलमारी होती. आणि यात अध्येमध्ये दालनभर माणसे एकमेकांत बोलत होती. यात दामू केंकरे होते, विजया मेहता होत्या, सत्यदेव दुबे होता, गुजराती रंगभूमीवरच्या दिना गांधी होत्या, शांता गांधी

होत्या, अरविंद आणि सुलभा देशपांडे होती, माधव वाटवे होते, दत्ता भट होते, पु. ल. देशपांडे देखील होते. रंगायनचे आणि थिएटर युनिटमधले अनेक चेहरे दिसत होते. आणखी कांही अनोळखी होते. नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टसचे नारायण मेनन त्याच्याच सेंटरच्या दालनात हा मेळावा जमूनही पाहुण्यासारखे एका कोपऱ्यात रंगीत बुशशर्ट घालून बसले होते. विजया मेहता दालनाच्या भिंती-एवढ्या उंचरुंद खिडकी पडद्याच्या कापडाशी आपली साडी कशी मॅच होते हे कोणाला तरी चष्म्यावाटे हसत दाखवीत होत्या तर दामू केंकरे थडपणें तमाखू मळण्यात एकाग्र होते. पु. ल. दे.नेहमीप्रमाणे कोणाला तरी काहीतरी फार मना-पासून ऐकवीत होते.

मग विजया मेहतांनी मंडळीला इशारा केला आणि जमलेल्या गर्दीत सिग्रेट ओढणाऱ्या एका आटीव कुडीच्या, गोऱ्या टक्कलवाल्या माणसाला घेऊन पु. ल. देशपांडे मधोमधच्या कोचात जाऊन बसले. हा माणूस सूट घातल्यासारखा न वाटता सुटात होता आणि मोजे न घालताच स्लिपरवजा बुटातदेखील तो होता. पु. ल. दे. म्हणाले, बहुधा तुम्ही एकटे लोकाना दिसणार नाही म्हणून मलाही शेजारी बसायला सांगितले असावे ! मागोमाग सत्यदेव दुबे दोघात तिसरे जाऊन बसले. आणि मग कोच खरेच भरले.

सत्यदेव दुब्यांनी लागलीच उभे राहून चार वाक्यांचे एक इंग्रजी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, की मुंबईत नगररचनेवर एक सेमिनार भरला होता. त्यासाठी आजचे आपले पाहुणे– असे म्हणून दुब्यानी एक हात, पलीकडे बसलेल्या आटीव कुडीच्या निरुपद्रवी वाटणाऱ्या, गोऱ्या, टक्कलवाल्या माणसाकडे केला—एस. सरकार —कारण बादल सरकार या नावाने ते नाट्यरसिकाना परिचित असले तरी त्याचे नाव बादल नव्हे—नगररचना—तज्ज्ञ म्हणून मुंबईत आले होते. त्यानिमित्ताने आजचा हा अनौपचारिक समारंभ आपण योजला आहे. त्याच्याविषयी इथे जमलेल्यांना काही अधिक सांगण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. आजचे भारतातले महत्वाचे नाटककार म्हणून ज्याची नावे घेतली जातात त्यात बादल सरकार याचे नाव प्रामुख्याने असते.

मग पु. ल. दे. प्रसंगाची औपचारिकता राखून बसूनच बोलले. तेही इंग्रजीतच बोलले त्यावरून मुख्य पाहुण्याला हिंदी—मराठी येत नसावे, असा तर्क मागल्या बाजूच्यानी आपापसात व्यक्त केला. पु. ल. दे. म्हणाले, बादलबाबूविषयी पुण्या—मुंबईत कोणी कोणाला सांगण्याची गरजच राहिलेली नाही. आमच्या इथे आजकाल हे नाव बिलकुल घरेलू बनून राहिले आहे. सर्वसामान्य मराठी नाट्यरसिकाना बादल सरकार आज जेवढे माहीत आहेत तेवढे कदाचित बंगालीमध्येही माहीत नसतील. त्याच्या काही नाटकाचे अनुवाद मराठीत चांगल्या प्रकारे केले गेले आहेत आणि

पृष्ठ ६१ वर

सु. ल. सोमण

# दिल्ली - इंदिरा धक्का !

गेल्या दीड-दोन महिन्यांपासून चर्चिली जात असलेली, केंद्रीय मंत्रिमंडळाची पुनर्रचना अखेर झाली ! १९७२ च्या सार्वत्रिक निवणुका अवघ्या दीड वर्षावर येऊन ठेपल्या असता, मंत्रिमंडळात रिकाम्या जागा भरण्यापलीकडे फार मोठे बदल करायला बाई धजावणार नाहीत अशी बऱ्याच जणांची अपेक्षा होती. फार काय, पण श्रीं. चव्हाणांच्या दिल्लीतल्या निकटवर्तीयांना, बाई चव्हणांना गृह-मंत्रालयावरून काढणार नाहीत ह्याविषयी यत्किंचितही शंका नव्हती. चव्हणां-प्रमाणेच, उत्तर प्रदेशातल्या रजपूत जमातीवर वर्चस्व गाजवणाऱ्या दिनेशसिंगांचंही स्थान अढळ राहील असाच अनेकांचा कयास होता. पण पंतप्रधानांनी सगळ्यांनाच धक्का दिला. पत्त्यांच्या डावात एखाद्याने मन मानेल तसे पत्ते पिसावेत त्याप्रमाणे त्यांनी मंत्रिमंडळात फेरफार केले. सत्तारूढ काँग्रेस म्हणजे इंदिरा गांधी, आणि इंदिरा गांधी म्हणजे सत्तारूढ काँग्रेस हे निर्विवाद सिद्ध करण्याचाच त्यांनी प्रयत्न केला. काही अंशी त्या त्यात यशस्वीही झाल्या आहेत. आणि तसं करताना त्यांनी कुणाचीच भाडभीड बाळगली नाही. श्री. चव्हाण हे त्यांचे, पंतप्रधानपदासाठीचे प्रतिस्पर्धी मानले गेलेले. गृहमंत्रालयावरून, स्वमर्जीप्रमाणे त्यांची उचलबांगडी करून त्यांना खच्ची करण्याचाच पद्धतशीर प्रयत्न केला गेला आहे. श्री. दिनेशसिंग त्यांचे उजवे हात मानले गेलेले ! पण त्यांनाही, त्यांच्या मर्जीविरुद्ध परराष्ट्र-खात्यातून बाहेर पडावं लागलं. अलीकडच्या काळात श्रीमती गांधींच्या खूपच जवळ आलेले फक्रुद्दिन अली साहेबही ह्या झंझावातातून सुटले नाहीत. किंबहुना बहुतेक सगळ्याच मंत्र्यांच्या काही ना काही तक्रारी आहेतच ! नाही म्हणायला, बाबू जगजीवनरामांना त्यांना हवं असलेलं संरक्षणमंत्रिपद मिळालं असं म्हणायला हरकत नाही. परंतु त्याचीही किंमत त्यांना लौकरच मोजावी लागल्याशिवाय राहणार नाही. बाबूंची उचलबांगडी करून काँग्रेसच्या अध्यक्षपदावर त्रिपाठीं-सारख्या स्वतःच्या कह्यातल्या व्यक्तीला विराजमान केलं, की नवीन काँग्रेसच्या, संसदीय पक्ष व संघटना ह्या दोहोंवरील आपली मांड घट्ट करण्यासाठी सुरू केलेला

श्रीमती गांधींचा प्रयोग पूर्ण होईल. तोपर्यंत जे काही थोडेसे लोक त्यांच्या नेतृत्वाला शह देण्याजोगे आज आहेत, तेही निष्प्रभ होतील, आणि श्रीमती गाधींचा मार्ग निर्वेध बनेल !

श्रीमती गाधींच्या ह्या व्यक्तिगत सामर्थ्य-प्रदर्शनाव्यतिरिक्त, मंत्र्यांच्या खाते बदलानी विशेष काही साधेलसं वाटत नाही. साधाव अशी कदाचित खुद्द पंतप्रधानाचीदेखील अपेक्षा नसावी ! एरवी सरक्षणमत्रिपद जगजीवन रामबाबूकडे गेल नसतं; किंवा परराष्ट्रमंत्रिपदही दिनेशसिंगाना सोडाव लागल नसतं. त्याचप्रमाणे स्वत वरचा बोजा कमी करण्यासाठी अर्थमंत्रिपद चव्हाणाच्या गळ्यात अडकवताना गृहमत्रालयाचा आणि हेरविभागाचा कारभार त्यानी स्वतःच्या ताब्यात घेतला नसता. गृह, अर्थ आदि सर्व विभागातली हेर खाती एकत्रित करून त्यासाठी स्वतंत्र विभाग त्यानी निर्माण केला, व त्याचं सूत्रसचालन त्यांनी स्वतःकडे घेतल. ह्याचाच अर्थ, स्वत.चा भार कमी करण्याऐवजी त्यांनी तो वाढवून घेतला आहे, नि त्याचबरोबर राजकीय सत्तेच जास्तीत जास्त केंद्रीकरण त्यांनी स्वत मध्ये करून घेतल आहे.

ह्या सर्व उलथापालथीत, श्री. चव्हाणाकडून गृहमत्रिपद गेल ह्या विषयीच जास्तीत जास्त चर्चा आज सर्वत्र होताना दिसते आहे. त्याची कारणंही उघड आहेत. श्री. चव्हाणानी, मुंबई-महाराष्ट्राच्या मुख्यमत्रिपदानतर, सरक्षणमत्रिपद यशस्वीरित्या हाताळल. निदान, श्री. कृष्ण मेननच्या पार्श्वभूमीवर तरी त्यांची कामगिरी उठून दिसली. नतर गृहमत्री असतानाही, कम्युनिस्ट सोडले तर इतरानी त्याची कामगिरी उचलूनच धरली. मूळ काँग्रेस दुभगेपर्यंत त्यानी मध्यस्थाची भूमिका स्वीकारली, नि आजही कित्येक सामान्य कार्यकर्त्यांची अशी अपेक्षा आहे की चव्हाणच ऐनवेळी पुढे दोन्ही गटाना एकत्र आणतील आणि काँग्रेसचा राज्यशकट पुढे चालवतील. खुद्द सघटना काँग्रेसच्या अनेकाची -चव्हाणाच नेतृत्व मानायची तयारी आहे श्रीमती गाधींना ह्या गोष्टीची कल्पना नसावी असं म्हणणं वेडेपणाच ठरेल. नि म्हणूनच, आजच्या परिस्थितीत, स्वतःच्या नेतृत्वाला खो मिळालाच तर तो श्री. चव्हाणाकडूनच मिळेल ह्याचीही त्याना मनोमन जाणीव


## पुरंदऱ्यांची दौलत

**नऊ पेशवेकालीन कथा**

**ब. मो. पुरंदरे**

**किंमत : साडेतीन रुपये**

**राजहंस प्रकाशन**

असेल. म्हणूनच, मिळेल त्या पहिल्या संधीला चव्हाणांना गृहमंत्रालयावरून डच्चू द्यायचा त्यांनी ठरवलं असणार! राष्ट्रपति–निवडणुकीनंतरच, त्यांनी कदाचित श्री. चव्हाणाना दूर केलं असतं. पण तेव्हा सारा महाराष्ट्र खंबीरपणे 'साहेबां' माग उभा होता. आणि सारा महाराष्ट्र विरुद्ध जाणं त्यावेळी श्रीमती गांधीना परवडलं नसतं. आज मात्र परिस्थिती बदललेली आहे. श्री. चव्हाणांविरुद्ध प्रत्यक्ष महाराष्ट्रातच पद्धतशीरपणे मोर्चे बांधले गेले आहेत. श्री. मधू लिमयांनी, 'इंदिरा गांधी की चव्हाण असा प्रश्न उभा राहिल्यास, महाराष्ट्रातून निदान पन्नास खासदार तरी श्री. चव्हाणांविरूद्ध उभे ठाकतील.' असं जे अलीकडेच सांगितलं त्यात बराच तथ्यांश आहे. ब्लाखेरीज, पॅट्रीअट, लिंक, ब्लिट्झ आदि कम्युनिस्ट धार्जिण्या वृत्तपत्रांनी त्यांच्याविरुद्ध आघाडी उघडलेलीच होती. त्यातच नक्षलवादी आणि जातीय अत्याचार ह्यांची भर पडली. ह्या साऱ्यातून श्रीमती गांधीना हवी असलेली संधी मिळाली.

रुढार्थानं गृहमंत्रिपद पंतप्रधानाच्या खालोखाल महत्त्वाचं मानलं जातं. तिथनं चव्हाणांना हुसकलं की आपोआप त्यांचं माहात्म्य कमी होईल हा श्रीमती गांधींचा सरळ साधा हिशोब! मा. चव्हाणांना त्यांनी तिथनं उचललं न् अर्थमंत्री बनवलं. त्या पदाचा आजपर्यंतचा इतिहास उत्साहजनक नाही. स्वतंत्र लोकशाही भारताचा प्रत्येक अर्थमंत्री राजीनामा देऊनच मंत्रिमंडळातून बाहेर पडला आहे, आणि बाहेर पडतानाही त्याच्याविषयी वादळ उठूनच! आजच्या परिस्थितीत तर अर्थमंत्रिपद म्हणजे तारेवरची कसरत. त्यातच गेल्या वर्षभरात, समाजवादाचा जप रोज चालू असला तरी, आर्थिक परिस्थिती कोलमडत असलेली! गेलं वर्षभर अर्थमंत्रिपद बाईंनी स्वत:कडे ठेवलं होतं. त्या रोज समाजवादाचे, दलितांच्या उद्धाराचे पालुपद उच्चरवाने आळवीत होत्या. असं असूनही मुंबई काँग्रेसने पसार केलेल्या कुठल्याही आर्थिक ठरावांना त्यांनी स्पर्शही केला नाही. उलट, ह्या काळात महागाई निर्देशांक अभूतपूर्व भडकले, बेकारी वाढली, संप, टाळेबंदी वाढल्या! आज बाई अर्थमंत्रिपदाची जबाबदारी झटकून मोकळ्या झाल्या आहेत. साहजिकच, समाजवादी घोषणा, त्याची न झालेली अंमलबजावणी, गेल्या वर्षभरातली आर्थिक पिछेहाट ह्या सर्वांचं उत्तरदायित्व साहेबांवर येणार! बाई पुन: 'समाजवाद–सेक्युलरवाद' ही रेकॉर्ड लावून देशभर हिंडतील, घोषणा देतील! घोषणांना मूर्त स्वरूप चव्हाणसाहेब अर्थातच, अवघ्या वर्ष–दीड वर्षात देऊ शकणार नाहीतच. ब्लीट्झ्, पॅट्रीअट वगैरे तयार आहेतच साहेबांना 'बूर्झ्वा' 'भांडवलदारांचे हस्तक' वगैरे लेबलं डकवायला. एवढं झालं की झाली बाईंची फत्ते. एका गुजराथी वृत्तपत्रानं ह्या संबंधात मोठं मजेशीर, पण फार बोलकं शीर्षक श्री. चव्हाणांविषयीच्या बातमीला दिलं आहे–
'श्री. चव्हाण – बनना था वजीर, बन गये दिवान!'

बाईंच्या मंत्रिमंडळातले नवागतही बरच काही सुचवून जातात. ज्याच्या जोरावर
पृष्ठ ५९ वर

# मुस्लिम समाजप्रबोधन हिदायतखान आणि दलवाई !

अंगार फरिश्ता

श्री. हिदायतखान यांचे 'माणूस 'मध्ये मुस्लिम प्रश्नाबाबत जे जे लिखाण आजवर प्रसिद्ध झाले ते सर्व ऐकीव किंवा कपोलकल्पित गोष्टींवर आधारीत असते. घटनास्थळी तर ते कधी नसतातच, पण त्या घटनांना कारणीभूत असणाऱ्या व्यक्तींनाही भेटण्याची फारशी तसदी घेण्याच्या फंदात न पडता ते आपल्या लेखाचा अलीशान इमला सत्यशोधकाच्या आवेशात उभा करतात तेव्हा त्यांच्या ह्या साहसाचे कौतुक वाटते आणि त्यांच्या इमानदारपणाबद्दल भ्रमनिरास होतो ! त्यांनी आपले लेखन करताना अधिक नेकी आणली तर त्यांच्या गंभीर लेखनाचीही कपोलकल्पित ललित साहित्यात गणना करण्याची पाळी येणार नाही ! अथवा त्यांनी कथा-कादंबऱ्या लिहिण्याचा आपला धंदा चालू ठेवावा, अन्य लेखनाच्या क्षेत्रात फुकट लुडबुड करू नये. आता क्रमाक्रमानेच त्यांच्या लेखनाचा विचार करू.

गफारखानाच्या संदर्भातील मुस्लिमांच्या वर्तनाबद्दल त्यांनी 'माणूस 'मध्ये लिहिले त्याला काडीचाही आधार नाही. राजभवनावर जमलेल्या मंडळीत मुसलमानांची संख्या बरीच होती. पण जाहीर सभेला त्यांची उपस्थिती अत्यल्प होती. गफारखान निधीला त्यांच्यापैकी कोणीही भरीव साह्य केले नाही, ही गोष्ट गफारखान निधीचे हिशोब पाहिले तर सहज ध्यानात येईल. पण हिदायतखान त्या भानगडीत पडणार नाहीत, कारण ते त्यांच्या गैरसोईचे आहे.

हमीद दलवाईंवर झालेल्या हल्ल्याचा निषेध करता करता दलवाईंना त्यांनी

अनेकविध उपदेश केला आहे. दलवाईंनी आपले मार्ग बदलावेत वगैरे त्यांनी सांगितले आहे. प्रश्न विचारावासा वाटतो की दलवाईंची भूमिका व विचार बरोबर आहे असा जो आव हिदायतखान आणतात तो खरा असेल तर आपल्या पद्धतीने हिदायतखान काही या बाबतीत करतात काय ? तसे तर काही दिसत नाही ! औरंगाबाद येथे हिंदू-मुस्लिम प्रश्नासंबंधी गतवर्षी परिसंवाद झाला होता तेव्हा प्रा. यु. म. पठाण यांनी हिदायतखानांसारखीच भूमिका घेतली, तेव्हा एका प्रतिनिधीने परखडपणे सुनावले, 'पासोड्यांचा शोध घेणारे पुष्कळ निघतील, प्रा. पठाणांनी मुस्लिम समाजप्रबोधनाच्या कार्यावर लक्ष केंद्रित करावे.' अर्थात प्रा. पठाण त्या कार्याला लागल्याची काही बातमी नाही ! हिदायतखानांचे कार्यही तसल्याच प्रकारचे आहे. हमीद दलवाईंचा मार्ग चुकीचा वाटतो ना, मग तुमच्या मार्गाने तुम्ही तेच कार्य का करीत नाही, असे हिदायतखानांना विचारावेसे वाटते. 'निदाये मिल्लत', 'नशेमन', 'इन्कलाब' यासारख्या वृत्तपत्रांमार्फत त्यांनी सौम्यपणे हेच विचार प्रसृत का करू नयेत ? पण ते लिहिणार 'माणूस'मध्ये आणि बुद्धिवादाचा आव आणीत मुस्लिम जातीयवादी व सनातनी यांचा अप्रत्यक्ष बचाव करणारे ! मुस्लिम तरुणांच्या बैठकी त्यांनीच घ्याव्या आणि दलवाईंना त्या बैठकीत चर्चेसाठी पाचारण करावे. चर्चेसाठी छोटया छोटया बैठकी घेऊन दलवाईंच्या संपर्कात त्यांनी मुस्लिम तरुणांना का आणू नये ? पण हे कार्य ते कधी करणार नाहीत, दलवाईंना 'माणूस' म्हणून फक्त उपदेश करणार !

हिदायतखान यांच्यासारखी मंडळी सामाजिक प्रश्नाबद्दल आपल्या समाजाशी कधी बोलतात काय ? हिदायतखान एका उर्दू माध्यमाच्या शाळेत शिक्षक आहेत. तेथील विद्यार्थ्यांना त्यांनी असे काही शिक्षण दिले आहे काय ? तशी दहावीस तरुणांची पिढी त्यांच्या पाठीशी उभी राहून सत्यशोधक मंडळाला अभिप्रेत असलेले कार्य करू लागल्याचे दिसले की हमीद हलवाईंना पुण्याला फेरी टाकण्याचे कारणच उरणार नाही, पण हिदायतखान त्याबाबतीत काही करणार नाहीत.

'प्रकरण मिटवण्याचा' हिदायतखानांचा सल्ला तर फारच अजब म्हटला पाहिजे. हिदायतखान 'प्रकरण' कशाला म्हणतात आणि ते 'मिटवायचे' म्हणजे काय, याचा काहीच खुलासा करीत नाहीत. मुसलमानांना त्यांच्या धर्मविषयक मतांधतेतील चूक दाखवून देण्याचे 'प्रकरण' कसे मिटायचे ? ते पटवण्याचे कार्य करूनच मिटणार आणि हिदायतखान स्वत ही ते करणार नाहीत आणि हमीद दलवाईंनीही ते करू नये असा त्यांचा सल्ला दिसतो ! हमीद दलवाईंच्या म्हणण्यात तथ्य आहे आणि ते जरी आवेशाने आपला विचार मांडत असले तरी तो आवेश वगळून मुसलमानांनी समजून घेणे इष्ट होईल, असे हिदायतखान, त्यांना ज्या मुसलमानांबद्दल एवढा उमाळा वाटतो त्यांना का सांगत नाहीत ?

भाषेवरून सत्यशोधनाची कसोटी पाहाणारे हिदायतखान हे उंटावरचे शहाणे

दिसतात! 'भले तरी देऊ कासेची लंगोटी – नाठाळाचे माथी हाणू काठी' असे म्हटल्याबद्दल ते तुकारामालादेखील फाशीची सजा सुनवायला बहुधा कमी करणार नाहीत! हमीद दलवाई आव्हान देऊन खडे ठाकतात हे हिदायतखानांना पटत नाही. न पटो बापडे. आव्हानाचा पवित्रा न घेता आधुनिक विचार मुसलमानांना पटवून देण्याला दलवाईंचा विरोध थोडाच आहे! त्यांची उलट तक्रार आहे: स्वातंत्र्योत्तर काळात एक नवी पिढी वयात आली, पण तीही अद्याप स्वातंत्र्यपूर्व मनोगंडात कशी आहे? ह्या त्यांच्या तक्रारीला हिदायतखानांचे उत्तर काय आहे?

## अजब सल्ला

हमीद दलवाईंनी 'क्लृप्तीने,' 'धूर्तपणे' कार्य करावे हा हिदायतखानाचा सल्ला तर मुसलमानाची त्यांनी फसवणूक करावी असे सांगण्यासारखाच आहे. दलवाईंनी चर्चेसाठी केलेले आवाहन फेटाळून लावले हा शोधही अजब आहे! 'अमक्या तमक्याशी बोला, त्याची खात्री पटवा व मगच आमच्याशी बोलायला या' ही काय चर्चेची पद्धत झाली? हमीद दलवाई व्यक्तीशी चर्चा करू पाहतात आणि हीच तर तथाकथित मुस्लिम नेत्याची खरी डोकेदुखी आहे. त्यांचा राग आहे तो दलवाई साक्षात लोकाना भेटतात हा. नेहमीचा जनतेच्या वतीने बोलण्याचा हक्कच ते हिरावून घेत आहेत. 'आमच्या नेत्यांशी काय ते बोला' असे सागणे हा जंगलीपणा (ट्रायबॅलिझम) आहे. दलवाईंनी ते करण्याचे नाकारले हे योग्यच झाले. त्यांची कल्पना वाद घालण्याची नसून लोकाशी मनमोकळेपणाने बोलण्याची आहे. हिदायतखान नेमके नको तेच दलवाईंनी करावे असे सागत आहेत! मॅन टु-मॅन चर्चा व्हावी हा दलवाईंचा उद्देश आहे. पेशइमाम व्यक्तिगत रीत्या चर्चा करू चाहातात की मुसलमानाचे मुखत्यार म्हणून, याचा खुलासा हिदायतखानानी का करून घेऊ नये? माझी तर माहिती अशी आहे की आठवड्यानंतर चर्चेची इच्छा व्यक्त करणाऱ्या गृहस्थांकडे दलवाई स्वतः पत्ता शोधीत गेले, ते गृहस्थ लग्नानिमित्त बाहेर गावी गेल्याने ती भेट होऊ शकली नाही. दलवाई चर्चेला भितात असे दाखवण्याचा हिदायतखानांचा विचार कपटी वाटतो. एक गोष्ट खरी 'इबादत'च्या धर्माबद्दल चर्चा करण्याला दलवाईंना उत्साह नाही आणि जीवनाच्या ज्वलंत प्रश्नाची उत्तरेही त्यांना ग्रथातून नको आहेत, जीवनाला सामोरे जाऊन मिळवायची आहेत. हिदयतखानाचे याबाबत काय म्हणणे आहे ते त्यानी एकदा स्पष्ट करावे.

हिदायतखानांनी हमीद दलवाईंनी आधी काय करावे याबद्दल दिलेला सल्लाही फसवा आहे. जी गोष्ट कोणाही संवदेनाशील माणसाला सहज जाणवावी त्याची पाहाणी करण्याला सागणे म्हणजे हातचे कंकण पाहायला आरसा आणायला सांगण्यासारखेच आहे. दलवाईंनी उध्वस्त महिलांचे पुनर्वसन करावे आणि पुनर्व-

सनाची सोय आहे म्हणून अधिक उत्साहाने मुसलमानांनी महिलांची जीवने उध्वस्त करावी हा हिदायतखान यांचा हिताचा सल्ला ! पाच पंचवीस दलवाईंची जीवने संपून जातील पण उध्वस्त स्त्रियांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मिटणार नाही ! हिदायतखानांच्या सुचनेचे मर्म हेच आहे. स्त्रियाचे जीवन उध्वस्त होण्याला आधी आळा घालू या, असे म्हणायला हिदायतखानाची तयारी नाही. किंवा ते काम आम्ही सांभाळतो असे म्हणायलाही ते तयार नाहीत.

मुस्लिम तरुणांच्या शिक्षणाचा युक्तिवादही असाच फसवा आहे. पाकिस्तानचे निर्माते काही अशिक्षित नव्हते किंवा मुसलमानाना जातीयतेच्या खातेऱ्यात लोळायला लावणारेही काही अशिक्षित नाहीत. तामिरे मिल्लत, जमाते इस्लामी, मजलिसे मशावरत याचे नेते काय निरक्षर आहेत ? हिटलरचे पाठीराखे काय निरक्षर होते ? काय शिकवायचे ते हिदायतखान गुलदस्तात ठेवतात. उर्दू शाळात ते नोकरी करतात, उर्दू शिकणाऱ्या हजारो तरुणाची उच्च शिक्षणाची कवाडे बंद होतात, भाषिक राज्यात त्याना पाढरपेशा नोकऱ्या मिळणे शक्य होत नाही, हे हिदायतखान कधी आपल्या मडळीना समजावतात काय ? नोकऱ्याबद्दलही तेच ! लाखो पदवीधर बेकार आहेत हे उघड दिसत असताना दलवाईंनी मुसलमानांना नोकऱ्या लावून देण्यासाठी काय करावयाचे ? हिदायतखान याबाबत मोघम बोलतात. आपल्या बाधवाना प्रश्नाचे व्यापक स्वरूप समजावून देत नाहीत की कार्यक्रम सुचवीत नाहीत ! बेकारी निवारण कार्यांत ह्यात खर्च केली तरीही हमीद दलवाईना आपले प्रबोधनकार्य हाती घेता येणार नाही ही हिदायतखानाची अटकळ दिसते ! शिवाय बेकारी काय फक्त मुसलमानाच्या वाट्याला येते असे थोडेच आहे ? तेव्हा बेकारीला ' मुसलमानाची ' असे विशेषण लावण्याची काय गरज आहे ? सर्व बेकाराचा प्रश्न सुटताना ह्या तरुणाचाही प्रश्न सुटून जाईल.

खरा अडथळा आहे तो सनातनी मुसलमानाचा नाही, कारण ते तळमळत असले तरी त्याच्या अपेक्षेप्रमाणे धर्माचे परिपालन कोणीच करीत नाही हे त्यांना दिसत असते ! हिदायतखानांसारखे जे सुशिक्षित वेड पाघरून पेडगावला जायला निघालेले असतात त्यांचाच प्रबोधनाला खरा अडथळा असतो. आपल्या शिक्षणाचा प्रबोधनासाठी ते प्रयोग कधीच करीत नाहीत, उलट प्रबोधनाच्या मार्गात वेगवेगळ्या सबबीचे अडथळे ते उभे करतात आणि प्रज्ञावादाचे कवच उभे करून सर्वसामान्य मुसलमानाला अंधारातच चाचपडत ठेवतात. हिदायतखानांसारख्याच्या मतलबी प्रज्ञावादी युक्तिवादाला बावळट हिंदू बळी पडतात, आणि मुस्लिम समाजप्रबोधनाच्या कार्यात अडथळा आणतात, हे हमीद दलवाईना देशाचे दुर्दैव वाटते. साळसूद, फसव्या युक्तिवादाची छाननी करायला लोक कधी शिकतील ?

□ □ □

# प्रेतयात्रा

**प्रतिनिधी**

मागे प्रभू रामरायाचं मंदिर. पुढ्यात एका गाडीवर एक अचेतन देह. आणि समोरच तो देह जेथे वावरला ते घर. माणसाची नुसती रीघ. काहींच्या हातात हार तर काही ओंजळीभर फुले घेऊन आलेले. राग पुढे सरकते, हार, फुले त्या देहावर ठेवली जातात. मग त्या हारांचे प्रचड ओझेच त्या देहावर होते. चेहरा झाकला जातो. ठशठशीत मिशाच काय त्या दिसत असतात.

तो देह होता शिवसेना कार्यकर्ते सदाकात ढवण याचा. हा तगडा माणूस भोईवाडा भागातला कार्यकर्ता. आज तेथूनच त्याची अखेरची यात्रा निघायची होती. सबध भोईवाडा विभाग 'मुबई बद'च्या वेळी वातावरण असावे तसा दिसत होता. रस्त्यावर शुकशुकाट. सारी दुकाने बद. डिपार्टमेंटल स्टोअर 'अपना बाजार'ही बंद. उघडे होते ते फक्त नाक्यावरचे फुलवाल्याचे छोटेसे दुकान. अंत्यदर्शनासाठी येणारे तेथूनच हार घेत होते. समोरच्याच दोन गल्लीत दोन ट्रक्स

# की प्रचारयात्रा?

सजवणे चालू होते. एका ट्रकवर दोन मोठे दूरध्वनिक्षेपक लावलेले होते. दुसऱ्या ट्रकच्या डोक्यावरच शिवसेना वार्ड नं. ५२, 'सदाकांत ढवण अमर रहे' असा भगव्या कापडावर लिहिलेला फलक होता., ट्रकच्या दोहो बाजूसही तसेच फलक होते. फुलांच्या माळांनी त्या देहाची मृत्युशय्या तयार केली जात होती.

दुपारचे तीन वाजून गेले होते. पाच वाजता प्रेतयात्रा निघायची होती. त्या आधी ४ वाजता शिवसेनाप्रमुख श्री. बाळ ठाकरे अंत्यदर्शन घ्यायला यायचे होते.

चौकात रस्त्यावर फुलांनी 'हुतात्मा सदाकात ढवण अमर रहे' असं लिहिलं जात होतं. राममंदिराभोवतालची गर्दी वाढतच होती. श्री. बाळ ठाकरे आले. अंत्यदर्शन घेऊन ढवण यांच्या कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी ते गेले.

आता ढवण यांच्याविषयी जे प्रेम शिवसेनेचे कार्यकर्ते दाखवत होते त्याला राजकीय हेतूचा वास आहे हे पाहून मला चीड आली. कारण आदल्या दिवशीचा प्रसंग मी विसरू शकत नव्हतो. आदल्या दिवशी म्हणजे ज्या दिवशी ढवण याना भोकसण्यात आले (गुरुवार २५ जून) त्या दिवशी मी महापालिकेच्या कामकाजाचे वृत्त आणण्यासाठी तेथे गेलो होतो. साडेतीन-चारच्या सुमाराला मी लॉबीत फोन करण्यासाठी गेलो. तेथे लॉबीच्या प्रवेशद्वाराशीच दोघा द्वारपालांसारखे दोन फोनचे बूथस् आहेत. मी तेथल्या एका बूथशी गेलो तो तेथल्याच फोनची घंटा वाजली.

मी रिसिव्हर उचलून विचारलं, 'कोण आहे?' उलट बाजूनं बोलणारा माणूस धाप टाकल्यासारखा बोलत होता.—'अहो, तेथे शिवसेनेचे कोणी नगरपिते आहेत का?'

मी लॉबीत डोकावलं. तेथे कोणीच नव्हतं. मी म्हणालो 'कोणी नाही हो.'

'मग जरा सभागृहातून बोलवा ना कोणाला तरी.' चिंतायुक्त आवाज.

'आता मिटिंग चालू आहे. तुमचा काही निरोप आहे का ?'–मी.

'कुर्ला येथल्या नेहरूनगरात सदाकांत ढवणला आज दुपारी भोकसला. आम्ही त्याला शीव इस्पितळात दाखल केल आहे. कोणातरी शिवसेना नगरपित्याला तिकडे फोन करायला सांगा म्हणजे त्याची नीट काळजी घेतील.' त्यानं भरभरा सांगून टाकलं. 'गोपीनाथ' नावाच्या माणसानं भोसकलं असं ढवण सांगत होता असंही तो म्हणाला.

मला तर धक्काच बसला. मी राहतो त्याच वसाहतीत, माझ्या इमारतीच्या पाठीमागील रस्त्यावरच हा हल्ला झाला होता. ढवण त्याच वसाहतीत राहत असले तरी मी त्यांना कधी पाह्यलं नव्हतं, नावही ऐकलं नव्हतं. पण तरी एका माणसाचा खून, तोही आपण राहतो त्या परिसरात ही घटनाच हादरवून टाकणारी होती.

मी फोन बंद केला आणि लागलेच दोघा शिवसेना नगरपित्यांना बाहेर बोलावलं. 'सदाकात ढवणवर सुरीहल्ला झालाय्, तुम्ही जरा शीव इस्पितळात फोन करा. त्याला दोन नंबरच्या वॉर्डात ठेवलाय.' असं मी त्याना सागितल. परतु दोघांनीही विशेष इंटरेस्ट दाखवला नाही. 'ह्यँऽऽ' असाच एकाच्या चेहऱ्यावरचा भाव होता. ढवण माझा कोणी नसूनही मीच जास्त एक्साइट झालो होतो. त्या दोघाच थड वागणं पाहून मी बुचकळ्यातच पडलो.

आदल्या दिवशीची ही घटना प्रयास करूनही मी विसरू शकत नव्हतो. काहींचे हे राजकीय ढोंग मला चीड आणीत होते. गुरुवारीच रात्री दीड वाजता ढवण याचा अत झाला होता. त्याना पाह्यला रात्रीपर्यंत कोणीही नगरपिता गेला नव्हता असा आरोप काही राजकीय पक्षानी केला आहे. मी ज्यांना ढवणवर हल्ला झाल्याच सागितल त्यानी तरी इस्पितळात फोन केला की नाही कोण जाणे! ढवण यांच्या मृत्युनंतर मात्र दुसऱ्या दिवशी सारी शिवसेना प्रेतयात्रेची तयारी करीत होती. राजकारणाच्या सारीपाटात कोठल प्यादं एकदम वजीर ठरेल कोणास ठाऊक !

ते काहीही असो. प्रेतयात्रेतली शिस्त मात्र वाखाणण्यासारखी होती. पाचच्या सुमाराला भोईवाड्यातून प्रेतयात्रा निघाली. एखाद्या बड्या सरकारी व्यक्तीच्या अत्ययात्रेला जसा पोलिसाचा जामानिमा असतो तसा या प्रेतयात्रेला होता. पोलिसांच्या सात गाड्या प्रेतयात्रेच्या अग्रभागी होत्या. छोटया जीप्स, स्टेशनवॅगन्स व एस आर. पी. नी. भरलेले तीन ट्रक्स अशी जय्यत तयारी होती. वायरलेस गाडी होती. त्याशिवाय दोघे पोलिस अधिकारी मोटार-सायकलवरून ये-जा करीत होते. मोटारीच्या या ताफ्यामागे पुन्हा गर्द जाभळ्या पोषाखातले पाचपन्नास पोलिस होते. त्याच्यामागे दूरध्वनिक्षेपक लावलेला ट्रक होता. शिवसेनेचे

नेते त्या ट्रकमध्ये होते. 'सदाकांत ढवण अमर रहे,' 'पाशवी खुनी हल्ल्याचा निषेध असो' व 'साधन-शुचितावाल्यांचा धिक्कार असो' अशा ठरवून दिलेल्या तीनच घोषणा दिल्या जात होत्या. श्री. बाळ ठाकरे यांच्या आदेशावरून फक्त याच घोषणा द्याव्यात असे पत्रकही काढण्यात आले होते. या दूरध्वनिक्षेपकाच्या ट्रकनंतर ढवण यांचा देह ठेवलेला ट्रक होता. त्यामागे हजारो शिवसैनिक होते. भगव्या फिती लावलेल्या शिवसैनिकांनी दोन्ही बाजूस साखळी केलेली होती व त्यामधून प्रेतयात्रा चालली होती. या साखळीबाहेरही काही पोलिस होतेच. प्रेतयात्रेच्या शेवटी पुन्हा पोलिसांच्या ५ गाड्या होत्या.

हळू हळू प्रेतयात्रा पुढे सरकत होती. घोषणांचा आवाज वाढत होता. माणसं प्रेतयात्रेत सामील होत होती. प्रेतयात्रा लांब होत होती. दोन ट्रकमधील अंतर वाढत होते. रस्त्यावर प्रेतयात्रा बघणाऱ्याचीही गर्दी झाली होती. इमारतीच्या खिडक्यातून, गच्चीमधून अनेक नजरा ही शोकयात्रा न्याहाळीत होत्या. भोईवाड्याहून नायगाव क्रॉस रोडला आल्यावर कोहिनूर मिल समोरील फुले रोडवर प्रेतयात्रा आत वळली. तेथून थेट हॉस्पिटल ॲव्हेन्यू रोडवर आली. के. ई. एम. व अन्य रुग्णालये यांची या रस्त्याच्या परिसरात वस्ती. रोग्यांना त्रास होऊ नये म्हणून या रस्त्यावरून जाताना घोषणा थांबविण्यात आल्या. मूकपणे ही शोकयात्रा पुढे गेली आणि पुन्हा मग घोषणांचा गदारोळ उठला.

मला राहून राहून आठवण होत होती कॉ. कृष्णा देसाई यांच्या अंत्ययात्रेची. त्याही अंत्ययात्रेबरोबर लालबाग, परळ हा भाग मी पायी तुडवला होता. एखादा वाघ पाठीमागे लागल्यासारखी ती प्रेतयात्रा घाईने निघाली होती. त्या प्रेतयात्रेत एवढा पोलिस बंदोबस्त नव्हता. पोलिसांच्या देखत वाटेल तशा घोषणा दिल्या जात होत्या. जला दो, जला दो शिवसेना जला दो, हरामखोर ठाकरे, बंडल ठाकरे मुर्दाबाद, खूनका बदला खूनसे लेंगे अशा घोषणा अगदी उघडपणे, सर्रास दिल्या गेल्या होत्या. ही प्रेतयात्रा आहे की सूडयात्रा असा संभ्रम मला त्यावेळी पडला होता. कृष्णा देसाई यांच्याविषयी त्या प्रेतयात्रेत कोणीच बोलत नव्हतं. सारा राग शिवसेनेवर होता आणि त्याचा वारंवार उच्चार होत होता. स्मशानभूमीतही जी भाषणं झाली त्यात देसाई यांच्या कर्तृत्वाचा फारसा उल्लेख कोणी केला नाही, एखाद्या राजकीय प्रचार सभेचं स्वरूप त्या श्रद्धांजली सभेला आलं होतं.

त्या तुलनेनं ढवण यांच्या प्रेतयात्रेतली शिस्त, संयम निश्चितच प्रशंसनीय होती. कोणाचा तोल सुटला नव्हता. 'मुंबई बंद' जसा शिवसेनेने यशस्वी करून दाखविला तशीच ही प्रेतयात्रा कोणताही अनुचित प्रकार न घडता जाईल याची खात्री वाटत होती.

या दोन्ही प्रेतयात्रांवर राजकारणाचे सावट होते. देसाई यांच्या अंत्ययात्रेत उघड, खुले आव्हान दिले जात होते, तर ढवण यांच्या अंत्ययात्रेत राजकीय पक्षाचा

अप्रत्यक्ष निषेध होत होता. देसाई यांचा जेथे खून झाला त्या तावरीपाडा येथून जवळच जाणाऱ्या आंबेडकर रस्त्यावरून ढवण यांच्या प्रेतयात्रेने वळसा घेतला आणि भारतमाता थिएटरवरून परळ, दादर टी. टी. मार्गाने प्रेतयात्रा पुढे गेली. वाटेत परळला जेथे गोपीनाथ टेंबूलकर (ज्याला संशयित म्हणून पकडले आहे तो) राहतो त्या वेल्हाळ बिल्डिंग जवळूनही ही प्रेतयात्रा गेली. ज्या रस्त्यांवरून २१ दिवसापूर्वी देसाई याचा देह नेला गेला जवळजवळ त्याच रस्त्यावरून ढवण यांची अंत्ययात्रा जात होती. ७२ साली निवडणुका व्हायच्या आहेत त्याचे सुरुवातीचे हे दोघे बळी असे लोक बोलत होते. मुंबई कलकत्ता होणार की काय अशी भीती बोलून दाखवत होते. काही महिन्यापूर्वी एका इसमाला चिंचपोकळीः जवळ जिवंत जाळण्यात आले होते. त्यानंतर अधूनमधून हल्ल्याचे प्रकारही घडत होते आणि आता तर चक्क खून पडले होते. हे नेमके राजकीयच खून होते याचा उलगडा सत्य बाहेर आल्यावरच होईल. परंतु त्यामुळे राजकीय वातावरणात दहशतीची, भयाची लाटच येते की काय असे वाटते आहे. ' मुंबईला हे झालंय तरी काय?' राजकारणाने रंग कसे बदलणार, याचीच चिंता जो तो त्या प्रेतयात्रेत प्रकट करीत होता.

परळ येथे ढवण यांची प्रेतयात्रा आली तेव्हा तेथे काही गडबड होईल की काय अशी शंका वाटत होती. परळ चौकाच्या अलीकडे 'दळवी बिल्डिंग' आहे. कम्युनिस्ट पक्षाचे हे मुंबईतले क्रेमलिनच! या पक्षाच्या कचेरीवर पूर्वी दोनदा हल्ले झालेले. कॉ. देसाई यांची प्रेतयात्रा जेव्हा दळवी बिल्डिंगपाशी आली होती तेव्हा त्यात बिल्डिंगमधील शिवसेना शाखेचा फलक उखडून फेकून देण्यात आला होता. २–४ दगडही पडले होते. ढवण यांची प्रेतयात्रा बिल्डिंगच्या दिशेने येत असताना वातावरण चांगलंच तंग बनलेलं होतं. २५ हजार माणसं प्रेतयात्रेत


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणाची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (बी. एन.) पो. कतरीसराय (गया)

होती. हळूहळू हा माणसांचा सागर पुढे सरकत होता. दळवी बिल्डिंगपाशी पहिला ट्रक येऊन ठेपताच घोषणा अगदी मोठमोठ्याने देण्यात आल्या. अर्थात् या ठरवून दिलेल्या घोषणा होत्या. मुठी आवळून व त्वेशाने त्या दिल्या जात होत्या एवढंच. त्यातच कोणीतरी एकानं चप्पल फेकायचा प्रयत्न केला पण दोघा–चौघांनी त्याला थोपावलं. जवळजवळ तीस मिनिटं संपूर्ण प्रेतयात्रा तेथून पुढे जायला लागली. तेवढ्या वेळेपुरता साऱ्यांचा जीव टांगणीला लागला होता. न जाणो काही घडलंच तर शहर पेटायचं. फेब्रुवारी दंगलीचे चटके मुंबईकर अजून विसरले नव्हते. परंतु सुदैवानं काही अनुचित घडलं नाही. तो जनसागर तसाच पुढे गेला. मागे राहिले ते कानात घुमणारे घोषणांचे निनाद.

दादरवरून, मार्मिक कचेरीवरून शिवाजीपार्क स्मशानभूमीवर ही अंत्ययात्रा गेली. तेथे श्री. ठाकरे, अन्य नेत्यांची भाषणे झाली. हे बलिदान व्यर्थ जाणार नाही असं सांगितलं गेलं. देहालां अग्नि देण्यात आला. लपलप उफाळणाऱ्या ज्वालांनी त्या देहाला स्वतःतच सामावून घेतले. एक जीवन संपले.

"राजकारण हा 'डर्टी गेम' आहे त्यात तुम्ही पडू नका" असं ढवण यांच्या पत्नी त्यांना नेहमी सांगायच्या, परंतु या गेममध्ये ढवण पडले व कायमचेच हरले गेले.

हा खून राजकीय होता का? की काही वैयक्तिक भांडणातून तो झाला याबद्दल नाना तर्क–कुतर्क मांडले जात आहेत. मला त्याच्याशी काही कर्तव्य नाही. जून महिन्यात मुंबापुरीत दोन हत्या झाल्या. या दोन्ही हत्यांना मोठी राजकीय कारणं आहेत असं सांगितलं जातंय. त्या निमित्ताने मुंबईतलं राजकारण कोठलं वळण घेणार याची चर्चा होत आहे. मुंबईतल्या या दोन प्रेतयात्रांनी राजकारणाचा रक्ताळलेला भीषण इतिहास लिहिला गेला असं काही म्हणत आहेत. आणि सामान्य माणसाच्या मनातली असुरक्षितता वाढते आहे.

कृष्णा देसाई यांचा खून झाला तो जागा मी पाहिली होती. तावरेपाडा येथे बैठ्या झोपडपट्टीवजा चाळीतले ते खुनाचे ठिकाण माझ्या मनात घर करून राहिले आहे. तेथे रक्त सांडले गेले असेल, कृष्णा देसाई किंचाळले असतील हे दृश्य कल्पनेने उभे करतानादेखील अंगावर काटे येतात. आणि आता तर माझ्या राहत्या घराजवळ पासून अगदी नजीक आणखी एक हत्या घडली होती. नेहरूनगरमधील पहिल्या नंबरच्या इमारतीसमोरच सदाकांत ढवणवर सुरीचे वार झाले. तो तगडा माणूस कसा कळवळला असेल, जखमेने होणाऱ्या प्राणांतिक वेदना त्याने कशा सहन केल्या असतील याचा विचारच काळजाचं पाणी करतो आणि मग आठवतात. कै. ढवण यांच्या पत्नीचे उद्‌गार –

'पॉलिटिक्स इज अ डर्टी गेम.'

□ □ □

# विचारवेध

**समीर**

## ◻ अणुबाँब नको असणारे देश

**भा**रताने अणुबाँब केला पाहिजे असे आग्रहाचे मत भारतीय जनतेत गेले काही दिवस वाढत चालले आहे. अशा परिस्थितीत 'अणुबाँब जवळ नसणाऱ्या देशांची अणुशास्त्रीय प्रगती' या विषयाचा खास अभ्यास करण्यासाठी नुकतेच भारत-भेट देऊन गेलेले एक अमेरिकन प्राध्यापक शेल्टन विल्यम्स यांचे विचार पाहणे उद्‌बोधक ठरेल. ते म्हणाले :

'सुरुवातीला माझे लक्ष अणुशास्त्र प्रसार प्रतिबंधक करारामागच्या अमेरिकन धोरणाकडे वेधले गेले, आणि अणुशस्त्रे जवळ नसणाऱ्या देशांची या करारावर प्रतिक्रिया काय आहे हे मी पाहू लागलो. माझ्या मते भारत हा अणुशस्त्र नसलेला एक महत्त्वाचा देश आहे, म्हणून भारताने या करारावर का सही केली नाही याचा मी अभ्यास केला, या अभ्यासाचा परिणाम म्हणजे मी 'अमेरिका, भारत व अणुबाँब' नावाचे पुस्तक लिहिले व ते जानेवारी १९६९ मध्ये प्रसिद्ध झाले. त्यानंतर तटस्थतेचे धोरण नसलेल्या पण अणुशस्त्रही नसलेल्या एका देशाचा अभ्यास हाती घेतला, व तो देश म्हणजे जपान. जपान १९७५ पर्यंत अणुबाँब तयार करील असे भाकीत करण्यात आले आहे, पण जपानमध्ये काही दिवस राहिल्यावर हे भाकीत मला पटत नाही. अगदी नुकतेच या विषयावर जपानी जनतेचे मत अजमावण्यात आले तेव्हा आढळले की २५ टक्के लोकांना बाँब हवा आहे तर सुमारे ७४ टक्के लोक पूर्वीइतकेच बाँबच्या विरुद्ध आहेत. आणि बाँबच्या बाजूने निर्णय घेण्यात आला तर तो उलथून पाडण्याइतके सामर्थ्य या मंडळीत आहे.'

तरीदेखील जपानचा अणुबाँब-विरोध कमी होत चालला आहे हे खरे आहे. याचे एक कारण म्हणजे अणुबाँब-प्रसारविरोधावर सबंध जगात चर्चा चालली असल्याने जपानी लोकही आता अणुशस्त्रांच्या विषयावर बोलू लागले आहेत. अणुबाँब देशात तयार न करण्याचे, बाहेरून देशात न आणण्याचे व जवळ न बाळगण्याचे आपले धोरण जपानी सरकार कायम ठेवील असे वाटते. पण अमेरिकेने जपानला दिलेली संरक्षणाची हमी मागे घेण्यात आली, किंवा जपानचा तिच्यावरचा विश्वास उडाला, किंवा चीनपासून आक्रमणाचे भय निर्माण झाले तर मात्र

हे धोरण बदलू शकेल. अणुशक्तीच्या शांततामय उपयोगाच्या बाबतीत मात्र सव जगात दुसऱ्या क्रमाकाचे राष्ट्र होण्याचा जपानचा निश्चय आहे.

भारतात दोन वर्षांपूर्वीच्या मानाने अणुबाँबची हाकाटी बरीच पसरली आहे, 'पण ही मागणी विस्तार पावली असली तरी किती खोल रुजली आहे हे सागणे कठीण आहे ' अणुबाँब महाग नाही असे जनसघाचे समर्थक म्हणतात, पण अणु-शस्त्रसज्ज सेना तयारीत ठेवायला अतोनात खर्च येतो ही गोष्ट ते हिशेबात धरीत नाहीत. 'पण सध्या तरी जनतेची ही मागणी काबूत ठेवणे सरकारला अशक्य नाही. '

## ◻ 'सँडविच ' शिक्षणक्रम

तांत्रिक विद्यालयात किंवा व्यवसाय-शाळांतून मिळणाऱ्या पुस्तकी शिक्षणाला अनुभवाची जोड देणाऱ्या शिक्षणक्रमाला सँडविच शिक्षणक्रम म्हणतात. भारत सरकारने नुकताच असा शिक्षणक्रम आखला असून या विषयात सल्लागार म्हणून भारतात आलेले ब्रिटिश तज्ञ श्री ईस्टन यांनी नुकतीच अशा शिक्षणक्रमाची आवश्यकता पुढील शब्दात प्रतिपादन केली :

' सँडविच शिक्षणक्रमाचा उद्देश उद्योग-धद्यात सपूर्ण जबाबदारी घेऊ शकणारे तांत्रिक पदवीधर तयार करणे हा आहे. उदाहरणार्थ : इजिनिअरिंग शिकू इच्छि-णाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना हा विषय किती व्यापक आहे याची कल्पना नसते. पण काही महिने प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण घेतल्यावर आपण कुठल्या प्रकारचे इजिनियर व्हावे हे त्याना कळते. या शिक्षणक्रमाची एक समस्या म्हणजे उद्योग-धदे चालवणारी मडळी पुष्कळदा या विद्यार्थ्यांना पुरेसे काम देत नाहीत ' पण ही परिस्थिती आता बदलत चालली आहे. आता बहुतेक सर्व मोठ्या उद्योग-धद्यात एक प्रशिक्षण-अधिकारी असतो व त्याचे अशा विद्यार्थ्यांशी निकट सबध असतात. तांत्रिक शिक्षणाचे आणखी एक महत्त्वाचे अग म्हणजे ' पुन.शिक्षण. ' ' तत्रज्ञान इतके झपाट्याने वाढत चालले आहे की तत्रज्ञालाही पुनः पुन. शिक्षण देत रहावे लागते ' उदाहरणार्थ : इंग्लडमध्ये रगीत टेलीव्हिजन सुरू झाला तेव्हा साध्या टेलीव्हिजनचे काम करू शकणाऱ्या २००० तत्रज्ञाना पुनः शिक्षण ' द्यावे लागले. ' खरे म्हणजे आम्ही कुणालाही केवळ एकाच व्यवसायाचे शिक्षण देत नाही. कारण तत्रज्ञान इतके झपाट्याने बदलत असल्याने कदाचित् १०–१५ वर्षांनी तो व्यवसायच राहणार नाही. '

◻ ◻ ◻

श्रीज्ञानेश्वर समाधी संशोधन

# शास्त्रीय पूर्वतयारीचा अभाव

वरुण भिडे

मी लहानपणी आळंदीला गेलो होतो तेव्हाची गोष्ट. माझे लहानपण म्हणजे फार जुनी गोष्ट नाही. ५५–५६ सालातली गोष्ट असेल. तिथे एकादशीला एक कृषिप्रदर्शन भरले होते. मला त्या प्रदर्शनात काहीच रस नव्हता. मात्र ज्ञानेश्वर, संत ज्ञानेश्वर सिनेमा पहिल्याने माहिती होते. ज्ञानेश्वरांच्या समाधीच्या दर्शनाला मोठी राग होती म्हणून आमच्या गावच्या पोलिसाबरोबर मीं आत गेलो. त्याने मला समाधी दाखवली आणि म्हणाला... 'या समाधीत अजून ज्ञानेश्वर महाराज जिवत आहेत'...

'मग उखडून पाहिली तर ?'... मी शंका काढली.

'दिसतीलसुद्धा'... असे सांगून बाहेरच्या आवारात येऊन मला त्याने नंदी दाखवला आणि सांगितले... 'या नंदीच्या भुयारातून एकनाथ महाराज आत गेले होते'...

मी आश्चर्यचकित झालो. यानतर अनेक दिवस माझ्या मनात आत जाऊन पहाण्याची इच्छा होती. ही आठवण फार महत्त्वाची आहे असे नव्हे. प्रत्येकाच्या मनात एकदा तरी ही इच्छा डोकावून गेलेली असते... म. म. द. वा. पोतदाराच्या मनातही ही इच्छा आलेली होती. बाकी All great men think alike हे काही अगदीच खोटे नाही.

सध्या गाजत असलेल्या 'ज्ञानेश्वर समाधी संशोधन' या चर्चेमुळे सर्वांच्या मनातल्या सुप्त इच्छाना चालना मिळाली आहे. या संशोधनाच्या कल्पनेने महाराष्ट्रात हलकल्लोळ उडाला आहे. वृत्तपत्रे, सभासमेलने, ठराव यामुळे गदारोळ उसळला आहे कुठल्यातरी नगरपालिकेने आणि पुण्याच्या महापालिकेने निषेधाचे ठराव मंजूर केले आहेत. या सर्वाकडे पाहिले तर अशी कल्पना होईल की एखादा महमद गझनी अथवा अल्लाउद्दीन खिलजी धर्मावर आणि भावनांवर आघात

करण्यासाठीं येत असावा. फक्त हा प्रश्न राज्य पातळी आणि केंद्र पातळीवर जाण्याचा शिल्लक आहे. आपले भावनाप्रधान आणि धार्मिक लोकप्रतिनिधी ते पुण्य नक्कीच जोडतील. या सर्व प्रकरणी भारत इतिहास सशोधक मंडळावरही विनाकारण चिखलफेक होत आहे शेवटी मडळाच्या चिटणीसाना खुलासा करावा लागला.

म. म. डॉ. द. वा. पोतदार हे एक या संशोधनाला अनुकूल असणारे अधिकारी पुरुष. त्यांना भेटून मी माझी भूमिका माडली. ते मला म्हणाले... 'अहो या गोंधळाला काही अर्थ आहे का? इटलीतील लारिची नावाच्या गृहस्थाने एक कॅमेरा तयार केला आहे. पेरिस्कोप आणि सूक्ष्म कॅमेरे अशा प्रकारात अणूचा उपयोग केलेला आहे या कॅमेऱ्याच्या सहाय्याने त्याने इटलीतील अनेक जुन्या थडग्याचे संशोधन केले आहे. त्यामुळे अनील कवीना अशी कल्पना सुचली की ज्ञानेश्वरांच्या समाधीच्या अतर्भागाचे फोटो घेता येतील. ही कल्पना लोकांपुढे मांडली जावी म्हणून एक लेख लिहून व सभा घेऊन कल्पना जाहीर केली या सभेचा आणि भा. इ. सं मंडळाचा इतकाच सबध की ही सभा मडळाच्या आवारात झाली. खरे पहाता या सभेचा आणि मडळाचा काय सबध? समजा उद्या माझ्या घरात येऊन कुणी काही बोलले तर ती माझी जबाबदारी होईल का?'...यानतर ते म्हणाले... 'हा सर्व ओरडा विनाकारण चालू आहे. केवळ कल्पना माडली गेली आहे. हे काम बऱ्याच खर्चाचे आहे. इतका खर्च कोण करणार हा प्रश्नच आहे. जरी खर्चाची तयारी झाली तरी असा कॅमेरा इथे करणे किती शक्य आहे? दुसरा मार्ग असा की लारिचीचा कॅमेरा मिळवणे. हा मार्ग असभवनीय आहे. लारिची असे किमती उपकरण कशाला देईल? त्याला त्याची संशोधने आहेतच. त्यातूनही जरी त्याने कॅमेरा दिला तरी तो आणणार कसा, वापरणार कसा? अशा अनंत अडचणी आहेत. त्यातूनही जरी मार्ग निघाला तरी देवस्थानच्या पंच-मंडळीच्या परवानगीखेरीज कोणी सशोधन करेल? जर पचमडळीनी नकार दिला तर योजना अर्थात बारगळणार. थोडक्यात सागायचे म्हणजे... 'बाजारात तुरी आणि भट भटणीला मारी'... असा प्रकार आहे. कशाला काही पत्ता नाही, माझा या विषयात संबध नाही, तरीही माझ्याकडे प्रचड पत्रव्यवहार झाला आहे. कशाला विनाकारण तिकिटाचा खर्च करतात?'... असे म्हणून त्यांनी तो नमुनेदार पत्र-व्यवहार दाखवला... म. म. पोतदारानी एक उदाहरण दिले.... 'पुण्यात कसबा पेठेत जमिनीखाली अनेक घरे आहेत. ती पहाण्यासाठी उत्खनन करावयाचे म्हटले तर कोणी परवानगी देईल का? ज्ञानेश्वर समाधी संशोधन तसेच अवघड होणार आहे' असे सांगून ते तात्विक बाजूकडे वळले... 'जर या पद्धतीप्रमाणे सशोधन झाले तर समाधी, देऊळ याचे काही नुकसान होणार नाही. त्यामुळे तशा सशोधनाला हरकत नाही. रशियामध्ये देखील तैमूरलंगाच्या समाधीचे उत्खनन झाले

आहे. संशोधन वाटेल तिथे होत नाही. नुकसान न होता होईल तेच संशोधन केले जाते. सशोधक हा चिकित्सक असतो. तो भावना, श्रद्धा मानीत नाही. सत्य-सशोधन हे त्याचे उद्दिष्ट असते.'

'सशोधक जरी भावना विचारात घेत नसला तरी त्याचे महत्त्व नाकारणे शक्य नाही. भावना आहेत म्हणूनच त्याला सशोध्य विषय मिळतात.'... या बाबतीत त्यानी गमतीदार उदाहरण दिले . ' फलटण येथे काही यादवकालीन मंदिरे आहेत. आता जीर्ण आणि दुर्लक्षित झालेली आहेत. म्हणजे या मदिराबाबत भावना सपल्या आहेत तरी ऐतिहासिक महत्त्व सपत नाही. तरीही भावना नसल्याने त्या मदिराचे दगड घरे बाधायला वापरले गेले आहेत...'

माहिती दिल्याबद्दल मी त्याचे आभार मानले. त्यावेळी त्यानी या प्रकरणी भा. इ. स. मडळाचा सबध नसल्याचे स्पष्ट केले आणि विचारले,

... 'तुम्ही कोणाकडून आलात ?'

... 'माणूस साप्ताहिकाकडून'...

... 'माझ्याकडे येऊन विचारणारे तुम्हीच पहिले 'माणूस' आहात'...

या विषयात वारकरी मडळी फार जागरुक आहेत. त्याना भेटल्याशिवाय या विषयी त्याचा दृष्टिकोन समजणे कठीण होते म्हणून मी आळदीला गेलो. आळदीच्या वाटेवर मला ज्ञानेश्वराचे घोडे दिसले. लोक मोठ्या भक्तिभावाने दर्शन घेत होते... वारीचे प्रस्थान जवळ आल्याने कोणी भेटेल अथवा नाही ही शकाच होती.

देवळाच्या आवारात गेलो असता तेथे दर्शनाची आणि महापूजेची मोठी राग होती. सर्वत्र वारकऱ्याची गर्दी होती. भजनी मडपात तल्लीनतेने... 'हेचि दान देगा देवा' चालले होते. मी तेथे धुडामहाराज वगैरे सत्पुरुषाची भेट घेण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यात मी अयशस्वी झालो. सुदैवाने पच कमिटीपैकी श्री. स. के. नेऊरगावकर याची भेट झाली. त्यानी मोठ्या सौजन्याने वारकऱ्याची बाजू समजावून दिली.

ते म्हणाले, 'गेली ७०० वर्षे वारकरी उन्हा पावसातून, काटे तुडवीत वारी करीत आहेत. निरनिराळ्या राजवटी झाल्या परतु ज्ञानोबा राजावरची श्रद्धा अभग आहे. या श्रद्धावान मनाला धक्का देणे अयोग्य आहे.'

'आमची अशी श्रद्धा आहे, ज्ञानेश्वर महाराज अजून समाधीत जिवत आहेत. त्याचा समाधी भंग होऊ नये म्हणून आम्ही आत हळुवारपणे जातो. नृसिंह सरस्वती समाधीचे बाहेरून दर्शन घेत तर गुलाबराव महाराजाना समाधीला धक्का लागताच रडू आले होते. यात समाधी भग होऊ नये हा हेतू होता'...

'अस पहा. या समाधी सशोधनाला आधार समाधीच्याच अभगाचा आहे. जसे एकनाथांना दर्शन ३०० वर्षांनी झाले तसे आज आपल्याला का होऊ नये ?'... मी शका काढली.

...'ज्ञानेश्वरांना पहायला हरकत नाही परंतु एकनाथांना साक्षात्कार झालेला होता. अजूनही कित्येकाना साक्षात्कार झालेले आहेत असे पुरावे आहेत. दुसरे असे त्यातूनही दर्शनाचा प्रयत्न झाला तर काहीही न दिसण्याचा संभव आहे. याला आधार ज्ञानेश्वरीच्या ६ व्या अध्यायात आहे त्या अध्यायानुसार समाधी अवस्थेत महाभूतात विलीन होऊन वायुरूप अथवा तेजरूप अवस्था येते. जर असे असेल तर कशाचा फोटो घेणार ? '

...'साक्षात्काराचे पुरावे सांगाल का ? '...

...'अजूनही पुण्यापासून दिवेघाट चढून जाईपर्यंत पाण्याचा घोटही न घेणारे वारकरी आहेत. पचाहत्तर–ऐंशी वयाचे, बसत बसत, खुरडत जाणारे कसे वर्षानुवर्ष निष्ठेने जाणाऱ्या या लोकाना साक्षात्कार झाला नसेल असे कसे म्हणावे ? याशिवाय दुसरे उदाहरण म्हणजे वै. जोग महाराज मृत्युशय्येवर असताना त्याना दृष्टान्त होवून वारकरी सप्रदायाचे कार्य करण्यासाठी आयुष्य नेमून दिले. त्याप्रमाणे नियुक्त आयुष्य सपताच त्यानी देहत्याग केला. तसेच गानू नावाचा एक एजिनियरिंगचा विद्यार्थी इथल्या देवळात आला. परीक्षा जवळ आली होती तरी हा कोणाचे ऐकेना. शेवटी या बुद्धिमान विद्यार्थ्याच्या प्रेमाखातर युरोपियन प्राचार्य आले तरीही तो गेला नाही. त्याचे उत्तर एकच... 'माझी कुडलिनी जागृत झाली आहे. मला ज्ञानेश्वर महाराज दिसत आहेत.'... त्याने येथेच देहत्याग केला. याला खोटे म्हणणार का ? '

'शतकानुशतके जोपासलेल्या या श्रद्धेला डावलणे योग्य नाही. तसा प्रयत्न झाला तर आम्ही मुळीच परवानगी देणार नाही भावनाना महत्त्व आहेच की. मोठी युद्धे भावनांसाठी होतात. निशाणासाठी युद्धे होतात. चिकित्सेने पहाता निशाण म्हणजे फडके, पण तसे मानता का ? राष्ट्राचीसुद्धा ध्वज-संहिता असतेच '...

...'हे सर्व ठीक. परंतु माझी अशी शंका की जर कोणी विचारणा केली नव्हती तर तुम्ही परवानगी देणार नाही हे का जाहीर केले ? '... मी विचारले.

...'ते निवेदन करण्याचे कारण या प्रकरणाला वृत्तपत्रातून मोठी प्रसिद्धी मिळाली व त्यामुळे वारकरी मडळी गोधळली. त्यांच्यासाठी व त्याचप्रमाणे जर हा प्रश्न उद्भवला तर आमची भूमिका काय असेल, हे माडले इतकेच '...

प्रस्थानाच्या गडबडीत असूनही त्यानी माहिती दिली म्हणून मी त्याचे आभार मानले. मला पोचवायला दारापर्यंत येऊन बाहेरच्या वारकऱ्याकडे निर्देश करून ते म्हणाले... 'हे पहा, हे वारकरी, म्हातारे, तरुण, स्त्रीपुरुष, मुले सर्व आहेत. बहुतेकजण अशिक्षित आहेत. याना कॅमेरा, सशोधन, फोटो, अनील काही माहीत नाही. माहीत आहे तो फक्त ज्ञानेश्वर. त्याच्याशी तुम्ही युक्तिवाद करून पटवून देणेही शक्य नाही '...

मी त्याचे पुन्हा आभार मानले त्यावेळी ते म्हणाले... 'हा खुलासा मी व्यक्ती

म्हणून केला आहे. अर्थात पंचमडळी माझ्याशी सहमत असतीलच '...

यानंतर मी तीन चार वारकऱ्याना या विषयावर विचारले. मोठचा संशयी नजरेने ते माझ्याकडे पहात होते. त्याच्या बोलण्यावरून इतके स्पष्ट झाले की, वारकरी मंडळी प्रसंगी प्राण पणाला लावतील यात सदेह नाही.

या विषयावर मी सहज मास्टर कृष्णरावांशी बोलत होतो. त्यांनी मला रागाऊन विचारले.

...' तू कशाला या भानगडीत पडतोस ? '...

...' मी माहिती जमवतो आहे '...

...' अरे, संशोधन वगैरे ठीक आहे. विद्वानाचे काम ते. पण तरी एकदम ज्ञानेश्वरांना हात घालायचा ? आधी इतर प्रयोग करा, सिद्ध करा. मग हा विषय काढा. एकदम हा विषय काढला ? लोकाच्या भावनांना दुखवणे होते '... मास्तरांचे हे विचार सर्वात बोलके आहेत. त्यावर अधिक भाष्य करण्याची जरुरी नाही.

भा. इ. सं मंडळाचे चिटणीस आणि विख्यात संशोधक श्री. ग. ह. खरे यांनी आ. रा. देशपांडे यांनी भरवलेल्या सभेचा उल्लेख करून सांगितले की... ' या सभेशी मंडळाचा काहीही सबध नव्हता. म. म. पोतदारांचा जसा भारतातील अनेक शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्थांशी सबध आहे तसा मंडळाशी आहे. ते मंडळाचे कार्याध्यक्षच आहेत. ते त्या सभेचे अध्यक्ष होते तरी त्यांच्या त्या अध्यक्षत्वाचा आणि ते मंडळाचे कार्याध्यक्ष असण्याचा काहीही परस्परसंबंध नाही. या सभे संबंधात मंडळाशी जोडला गेलेला संबंध आमूलाग्र चुकीचा आहे.

' भा. इ. सं. मंडळ इतिहासकाल आणि इतिहासपूर्वकाल यावर यथाशक्य संशोधन करीत आहे. त्याच्यापुढे अनेक सशोधन विषय आहेत. त्यावर संशोधन करावे अशी त्याची इच्छा आहे. परतु मंडळाची सध्याची आर्थिक स्थिती अशी आहे की एकदा अगीकृत केलेली कार्ये देखील त्यास समाधानकारक रीतीने पूर्ण करता येत नाहीत. असे असता नव्याने हे सशोधन करण्याचा विचार मडळ करील असे वाटत नाही. हा विषय मडळाच्या कारभारी मडळापुढे आलेलाही नाही '...

हे निवेदन करून ते असे संशोधन व्हावे की नाही या विषयाकडे वळले – ते म्हणाले...' कोणी कसले संशोधन करावे अथवा करू नये हे ज्याचे त्याने ठरवायचे आहे. जे संशोधन बहुजन समाजाच्या भावनांस अथवा श्रद्धांस मानवणारे नाही असे संशोधन कोणी करू गेल्यास त्या संशोधनास विरोध होण्याचा संभव आहे.

' मात्र या बाबत हे लक्षात ठेवले पाहिजे की समाजाच्या भावना आणि श्रद्धा चिरंतन नसतात. त्यात हळूहळू बदल होतात. म्हणून ५० वर्षापूर्वी ज्या संशोधनास विरोध होत होता त्याला आज होत नाही. तसेच ज्या संशोधनास आज भावना अगर श्रद्धा यामुळे विरोध होण्याचा सभव आहे त्या संशोधनास कालातराने

विरोध होईलच असे नाही. तेव्हा काही संशोध्य विषयासाठी काही काळ थांबले तरीही चालेल. मात्र असे थांबायचे की नाही हे ज्याचे त्याने ठरवायचे आहे ...'

या सर्व विचारवंतांच्या निवेदनावरून हे स्पष्ट आहे की 'समाधी संशोधन' हा मोठा चर्चेचा विषय झाला असला तरी त्यात प्रत्यक्ष पाहता अर्थ थोडा आहे. या विषयाचा इतका बागुलबुवा का केला गेला आहे ही मोठी शंका आहे. जरी 'शून्यामाजी वसाहती' अशी परिस्थिती असली तरी या निमित्ताने मानवी जीवन आणि संशोधन यांचा परस्पर संबंध काय याला चालना मिळाली आहे.

संशोधन हे मनुष्यासाठी आहे. मनुष्य संशोधनासाठी नाही हे एकदा गृहीत मानले की अडचणी सुटणे असंभाव्य नाही. ज्या संशोधनाचा परिणाम सामाजिक स्वास्थ्य बिघडवणारा होईल ते संशोधन अयोग्य म्हटले पाहिजे अथवा असा मार्ग शोधला पाहिजे की संशोधन करूनही सामाजिक स्वास्थ्य बिघडणार नाही. आजही अशी कित्येक संशोधने होतात की ज्याचा निष्कर्ष जाहीर रीतीने मांडला गेल्यास मोठा गोंधळ होईल. म्हणून संशोधने थांबली नाहीत. संशोधने होत आहेतच आणि जिज्ञासूना त्याचे निष्कर्ष पहायला मिळतातच.

संशोधने कशाचीही व्हावीत परंतु त्याला सार्वजनिक स्वरूप कितपत द्यावे हा प्रश्न आहे. जर मानवी जीवनाला उपायकारक आणि अपायकारक संशोधने झाली तर पहिले फक्त जाहीर व्हावे.

या सर्व प्रकारात असे वाटते की या सर्व गोंधळाची जबाबदारी सार्वजनिक स्वरूप देणारांची आहे. संशोधनाची पूर्वतयारी नसताना जाहीर सभा भरवणे आणि जाहीर लेख लिहिणे म्हणजे खोड्या म्हणून समाजाला डिवचणे होते आहे. असे जाहीर वागणे, परंपरांना, श्रद्धांना डिवचणे म्हणजे प्रसिद्धीसाठी केलेला हव्यास असावा असे वाटते.

संशोधन होणे हा मानवी प्रगतीचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. संशोधनाशिवाय मानवी प्रगती होणार नाही तरी मानवाला दुखवावे असे नाही. तसे करायचे असेल तर सामाजिक छळाला तयार व्हायला पाहिजे. गॅलिलिओ, कोपर्निकस इतकेच नव्हे तर स्वतः ज्ञानेश्वरांवर देखील ही आपत्ती आली होती. ती सोसण्याची, जिवंत जाळले जाण्याची अथवा जिवंत समाधी घेण्याची तयारी ठेवून मगच समाजपुरुषाला डिवचण्याची हिंमत करावी. आधी वणवा पेटवून मग तोंड लपवणे या भेकडपणाला काही अर्थ नाही.

□ □ □




अ. रा. सा.

एकाद्या गोष्टीविषयी त्वरीत निर्णय घेऊन ती तडीस नेली आहे असं माझ्या ध्यान कधी झालंच नाही आत्तापर्यंत. माझा पिंड हा असा कसा याबद्दल मला हजार वेळा संभ्रम पडला आहे आजतागायत. कित्येक गोष्टी करायच्या तर अगदी उत्कटतेनं असत मनात, परंतु या ना त्या कारणानं ते लांबणीवर पडतं अन् त्यानंतर मात्र त्याविषयी उगाचच हुरहुर लागून रहाते ! अभ्यासासाठी कोणती पुस्तकं वापरावीत याचाच कित्येक दिवस माझ्या मनात ठाम निश्चय होत नाही. एवढच काय परंतु बसमध्ये एकाद्या व्यक्तीला स्वतः उठून जागा देताना सुद्धा मी चाचपडलो आहे ! माझ्या एकूण मनोवृत्तीनं मीच अनेकदा बुचकळ्यात पडलो आहे.

... तुझ्याविषयी कमा हे अगदी असंच झालं.

तुझ्यावर माझं प्रेम आहे हे मी स्वतःला केव्हाच सांगून टाकलं होतं त्यावेळी, पण एकदाही ते व्यक्त मात्र माझ्याकडून झालं नाही. तूं काय हे ओळखलं नव्हतंस कमा ? परंतु एवढं असूनसुद्धा दोघे जवळ मात्र कधीच येऊ शकलो नाही आपण.

कॉलेजात असताना रमेशबरोबर तुझ्या घरी मी यायला लागलो तेव्हां पहिल्यांदाच तुला पाहिलं. डोळयांसमोरून तू सर्कन् सरकून गेली होतीस !

वास्तविक तू किती अबोल. इतक्या वेळां मी तुझ्या घरी आलो असेन, परंतु कितीसं बोललो असू आपण एकमेकाशी ? फारच थोडं, परंतु नुसत्या एकमेकांच्या सान्निध्यात असण्यातच किती मौज वाटायची ? आतल्या घरातून येणारा तुझा मधुर आवाज रोमरोमात भिनून रहायचा !

तुला आठवतंय ? असाच एकदां मी घरी आलो होतो. रमेश, दादा कोणीच घरांत नव्हते. संध्याकाळपर्यंत त्यांची वाट पहायला लागली. पण तिथे कोणी नसून सुद्धा मला कटाळा असा आलाच नाही. मनात जी काही खळबळ माजली होती त्यान जीव अगदीं गुदमरून चालला होता. मनांतली नक्की भावना स्वतःलाच कळेनाशी झाली होती. गुतागुतीचा प्रश्न सोडविताना मन उगाचच गोंधळून गेलं होतं !

... तू चहा आणून दिलास. मी तुला नकळत आग्रह केला. अन तू समोर बसून कसातरी चहा संपविलास. बोललास अगदीच कमी. नजरेला नजर द्यायच तर राहूच दे ! त्या तुझ्या बुजऱ्या रूपान नक्कीच माझ्यावर विलक्षण प्रभाव पडला होता.

तुला खरं सांगू ? त्यादिवशी खोलीवर आलो अन् कित्येक दिवस तुझाच विचार मनांत घोळला. स्वतःलाच थांगपत्ता न लागल्यावर होणाऱ्या विचित्र मन स्थितीत ते दिवस गेले माझे. माझं मन नक्कीच तुझ्याकड खेचलं जात होत ! अन् मला खात्री आहे क्षमा, तुझ्या डोळ्यानी सुद्धा तुला फसवल होतं. तुझ्या डोळयात मी केव्हाच माझं प्रतिबिंब पाहिल होत !

पण इतक्या सरळसोटपणे एकाद्या प्रश्नावर मी निर्णय घेतला तर तो, 'मी' कसला ? जिथं साध्या साध्या प्रश्नावर वावटळी निर्माण व्हायच्या, तिथ हा प्रश्न तर केवढा महत्त्वाचा !

केव्हा, कुठून, कसे कळले कोण जाणे ! पण मला कोणाकडून तरी कळलं की तुझ्यात व्यग आहे ! तुला कानांनी ऐकायला कमी येत होत म्हणे. झालं, माझ्या मनात वादळ उठायला एवढं सबळ कारण पुष्कळ होतं.

... ते वादळ नतर फिटलं नाहीच !

मध्यंतरी तुझ्या वडिलांनी माझ्या घरी लग्नाविषयी विचारलं, अन् त्यावेळी मी नकळत कळविल की अजून चार वर्षे तरी नाही म्हणून !

क्षमा ! मी अस का केल, मलाही व्यवस्थित उमगत नव्हत. उमगलं असत तर कदाचित काहीतरी निर्णय घेतला असता. कदाचित माझ उच्च शिक्षण, माझ्या भंवती–भोवती होणाऱ्या त्या दररोजच्या पार्ट्या, त्यात फटाकट्याखारख्या उडणाऱ्या चटपटीत मुली या सर्वांचा परिणाम झाला असेल. कदाचित मनांतल्या मनात तुला

मी या साच्यात बसविण्याचा प्रयत्न करताना तो फोल ठरला असेल. कदाचित त्या सर्वात तुझं ते व्यंग उठून दिसलं असेल !

काय झालं ते माझंच अजून मला कळत नाही, पण काही समजायच्या आतच दुसऱ्या वर्षी तुझं लग्न ठरलं होतं !

मी मात्र काहीच करू शकलो नव्हतो.

अन् कमा काल तूं कितीतरी वर्षांनी अचानक त्या कपड्यांच्या दुकानात भेटलीस !

काही कल्पना नसताना.

पण मला पाहिलंस अन खळाळून हसलीस !

तुझ्या मिस्टरांशी ओळख करून दिलीस. मी फारसं चौकशी करण्याचं अगत्य सुद्धा दाखविल नाही !

मी चहा घ्यायचा का म्हटलं तर चटकन हो म्हणालीस !

खुर्चीवर बसल्याबसल्या मी तुझ्या मिस्टरांकडे संपूर्ण पाहून घेतलं. खरं सांगू कमा, तुझा नवरा माझ्यापेक्षा कितीतरी पटीनं चांगला आहे. अन् तो तुझा नितीन ! मला सारखं वाटत होतं की त्याला जवळ घेऊन त्याचा कडकडून पापा घ्यावा !

... पण तेही करूं शकलो नव्हतो मी.

तुझी आपली काहीतरी बडबड चाललीच होती. माझं मन मात्र उगाचच तुझ्याभोवती पिंगा घालीत होतं. इतकी वर्षे झाली, पण तुझ्यात काहीच कसा बदल नाही याचच मला आश्चर्य वाटत होतं. शरीराची ठेवण तर अगदी तशी.

मात्र बोलत होतीस भरपूर !


लहान मुलांसाठीं उत्कृष्ट औषध।

डोंगरे बालामृत

के. टी. डोंगरे अॅण्ड कं. प्रा. लि. मुंबई-४.

चहाचा घोट घेत तूं मला हळूच विचारलस्,

"मधु, लग्न केलंस ?"

तुझ्या विचारण्यानं मी कितीतरी दचकलो असेन !

चमकून तुझ्या चेहऱ्याकडं पाहिलं तर तूं चहाच्या पेल्यात बुडून गेली होतीस ! मुद्दाम विचारल्याचं एखादं सुद्धा चिन्हं तुझ्या चेहऱ्यावर दिसत नव्हतं. अन् त्यानं मी उगाचच होरपळून निघत होतो.

मी नुसताच हुंकारलो.

म्हटलं तर त्याचा अर्थ 'होय' अन् म्हटलं तर 'नाही' असा पण लावता आला असता !

अन् लगेच मी नितीनचा गालगुच्चा घेत म्हणालो,

"बराच अवखळ दिसतोय हं !"

अपेक्षेप्रमाणं विषय बदलला होता. ते तुझ्या लक्षात आलं होतं की काय कोण जाणे, परंतु त्याबद्दल तूं पुन्हा विचारलं नाहीस.

निरोप घेताना, आलास तर घरी ये, असं पुन्हा पुन्हा बजावायचं विसरली नाहीस.

नितीनला म्हणालीस,

"टाटा कर काकाना."

अन पुन्हा एकदा तुझ्या शब्दांनी मनात मोठं भगदाड पाडलं. पण तुझ्या चेहऱ्यावरची एकही रेषा बदलली नव्हती !

मनात उसळलेल्या विचाराच्या डोंबात मी तुला कसा निरोप दिला कोण जाणे.

तुझी पाठमोरी आकृती नजरेआड होईपर्यंत मी तस्साच त्या हॉटेलच्या दारापुढं उभा होतो......

तूं नवऱ्याशी कुजबुजत असावीस काहीतरी...

थोडंसं हसतही असावीस !

माझ्या मात्र मनात कुठंतरी दुःखाचा पेव फुटला......

वाटलं, उगाच तूं इतकं मनमोकळं बोललीस, उगाच ! मला ओळखही न दाखविता तशीच पुढं गेली असतीस तर मला फार बरं वाटलं असतं कमा, खरंच फार बरं वाटलं असतं !



वि. स. वाळिंबे

# पराजित अपराजित

या वेळी एक गोष्ट स्पष्ट होती. फ्रान्स निधारीत उणा पडणार नव्हता. सरकार, सैन्य आणि समाज यांच्यातील सामरस्य हा फ्रान्सच्या दृष्टीने नवा अनुभव होता. काय वाटेल ते झाले तरी चालेल, पण अखेरपर्यंत शत्रूशी झुंजायचे या जिद्दीने सारा देश उभा ठाकला होता.

सगळ्या देशाने ही जिद्द उराशी जपली होती म्हणूनच जर्मन सैन्याचे प्रारंभीचे जोरदार तडाखे सहन करताना फ्रान्सच्या मनोधैर्यावर आघात होऊ शकला नाही. एरवी महायुद्धाला तोंड लागले तेव्हा अठराशे सत्तरच्या नामुष्कीची पुनरावृत्ती व्हावी अशी रणक्षेत्रावरची परिस्थिती होती. महायुद्धाचा पहिला महिना तर फ्रान्सला कमालीचा वाईट गेला. फ्रेंच सैन्य कोठेही घट्ट पाय रोवून उभे राहू शकत नव्हते. जर्मन लष्कराच्या एकेका चढाईसरशी फ्रेंच सैनिकांना मागे यावे लागत होते. हे असे कोठवर चालणार आहे याचीही त्यावेळी कोणाला कल्पना नव्हती. म्हणजे खरे तर लोक हबकून जायला हवे होते. या पिछेहाटीमुळे थोडीशी घबराट निर्माण झाली. पण तेवढ्यामुळे पांढरे निशाण वर करावे असे मात्र कोणालाही वाटले नाही.

फ्रान्सच्या सुदैवाने त्याला यावेळी जनरल जोफ्रसारखा हिंमतबहाद्दर सेनानी लाभला होता. त्याच्यावर लष्कराचा विश्वास तर होताच, पण सरकार आणि जनता यानाही जोफ्रच्या कर्तृत्वासंबंधी संदेह वाटत नव्हता.

अर्थात् परिस्थिती अल्पावधीत इतके विपरीत वळण घेईल याची त्यालाही प्रारंभी कल्पना आली नाही. जर्मन युद्धव्यूहासंबधी त्याची फसगत झाली.

जर्मन सेनानींचा विचार स्पष्ट होता. पूर्व आणि पश्चिम या दोन आघाड्यांवर

या वैफल्यामुळे फ्रेंच समाजाचे मन
विकल झाले होते. जो तो दुसऱ्यावर
चडफडत होता....

## लेखांक सहा

अशा वेळी त्यांना आठवण झाली
ती त्या म्हाताऱ्या वाघाची—क्लेमेन्सोची.

---

एकाच वेळी लढण्याचे त्याना टाळायचे होते. पूर्वेकडचा रशिया युद्धाला सिद्ध होईपर्यंत काहीसा वेळ जाणार हे त्याना माहित होते. त्यामुळे पूर्व सीमेवर नाममात्र सैन्य ठेवून बाकीचा आपला सारा सेनासभार फ्रान्सवरील आक्रमणासाठी वापरायचा असे जर्मन सरसेनानी जनरल हेल्मठ फॉन मोल्टके याने ठरविले. एकदा फ्रान्सचा आणि त्याच्या मदतीला येणाऱ्या ब्रिटनचा खुर्दा उडविला की पश्चिम आघाडी शात होणार होती आणि मग मोल्टके रशियाला नामोहरम करण्यासाठी पूर्वेकडे धडक मारणार होता. फ्रान्सबरोबरची लढाई दीड दोन महिन्यात आटपायची अशा निश्चयाने मोल्टकेची धावपळ सुरू झाली होती.

मोल्टकेचा चुलता काऊंट आल्फ्रेड फॉन श्लिएफेन हा मुरब्बी युद्धविशारद होता. अठराशे सत्तरमध्ये फ्रान्स आणि प्रशिया यांचे युद्ध झाले तेव्हा प्रशियन सेनेचे नेतृत्व श्लिएफेन याच्याकडेच होते. त्यावेळी त्याने फ्रान्सला अवघ्या सहा आठवड्याच्या आत पराभूत केले होते. तेव्हापासून फ्रान्स हा श्लिएफेनच्या खास अभ्यासाचा विषय झाला होता. १८९१ मध्ये श्लिएफेनला बढती मिळून तो सरसेनानी झाला. जर्मनीला केव्हा तरी पुन्हा एकदा फ्रान्सबरोबर मुकाबला करावा लागणार आहे हे श्लिएफेनला ठाऊक होते. म्हणून फ्रान्सवरच्या आक्रमणाची योजना आखण्याचा त्याला छंद लागला होता. श्लिएफेन युद्धतंत्रात एवढा वाकबगार होता की सरसेनानीपद स्वीकारल्यापासून अवघ्या तीन वर्षांच्या आत त्याने आपल्या योजनेचा पहिला आराखडा तयार केला. सोळा वर्षे तो सरसेनानी होता आणि ही सारी कारकीर्द त्याने आपल्या या योजनेचा तपशील निश्चित करण्यात व्यतीत केली.

श्लिएफन योजना म्हणून हा युद्धव्यूह ओळखला जातो.

फ्रान्सच्या संरक्षण तयारीचा सारा भर आल्सेक आणि लॉरेन या आपण छिनावून घेतलेल्या प्रांतांलगत मोर्चे उभारण्यावर आहे हे श्लिएफेनला माहीत असल्यामुळे फ्रान्सला चकविण्याकरिता त्याने निराळीच कल्पना लढविली. जर्मन सेनेने सरळ फ्रान्समध्ये घुसण्याऐवजी पश्चिमेचा रस्ता धरून बेल्जम गाठायचे आणि इंग्लिश खाडीलगतची किनारपट्टी ताब्यात आली की दक्षिणेकडे तोंड करून पॅरिसच्या रोखाने कूच करायचे हे श्लिएफेन–योजनेचे मुख्य सूत्र होते.

आपली ही योजना हमखास यशस्वी होणार याबद्दल श्लिएफेनला खात्री होती, महायुद्धाला प्रारंभ व्हायच्या अगोदर एक वर्ष तो वारला. मृत्युशय्येवर असतानाही तो मोल्टके याला सांगत होता, "बेल्जममध्ये घुसवायचं सैन्य सर्वांत बलिष्ठ असल पाहिजे. आल्सेक–लॉरेनच्या डाव्या आघाडीपेक्षा बेल्जमकडची उजवी आघाडी अतिशय महत्त्वाची आहे हे विसरू नकोस."

मोल्टके याने श्लिएफेनचा कानमंत्र स्वीकारला पण त्यात त्याने थोडासा बदल केला. आल्सेक–लॉरेन आघाडीवर जेवढे सैन्य ठेवायचे त्याच्या सातपट सैन्य उजव्या आघाडीवर एकवटले पाहिजे असे श्लिएफेनने सांगितले होते. मोल्टके याला ते प्रमाण बदलावेसे वाटले. त्याने आल्सेक–लॉरेन भागात जेवढे सैन्य आणून ठेवले होते त्याच्या फक्त तिप्पट सैन्यच बेल्जम–आघाडीकडे रवाना केले. श्लिएफेनच्या युद्धव्यूहामध्ये केवळ उजव्या आघाडीला महत्त्व देण्यात आले होते. मोल्टके याने असे ठरविले की उजव्या आणि डाव्या अशा दोन्ही आघाड्यांवर एकदम जोर केला तर फ्रेंच सेनेला लवकर कोंडीमध्ये पकडता येईल.

श्लिएफेन–योजनेतील हा बदल मोल्टके याला पुढे खूपच महाग पडला.

परंतु प्रारंभी जर्मन सैन्याची अशा वेगाने घोडदौड सुरू होती की आपल्या हातून चूक घडली आहे हे मोल्टके याला जाणवले नाही. आपल्या लष्कराच्या पराक्रमावर तो खूष होता. युद्धाचा पुकारा झाल्यापासून एकोणिसाव्या दिवशी जर्मन लष्कर ब्रुसेल्समध्ये शिरले, बाविसाव्या दिवशी या लष्कराने फ्रेंच भूमीवर पाय ठेवला आणि पॅरिसच्या दक्षिणेला आणि पूर्वेस उभ्या असलेल्या फ्रेंच लष्कराचा एकोणचाळीसाव्या दिवशी बोजवारा उडाला.

'सहा आठवड्यात फ्रान्सचा पाडाव करतो' ही मोल्टके याची प्रतिज्ञा खरी ठरणार अशी चिन्हे दिसू लागली.

हे असे व्हायला फ्रेंच सेनानींचा फाजील आत्मविश्वास नडला. यावेळी जर्मन सैन्य बेल्जममधून फ्रान्समध्ये घुसणार आहे या बातमीवर विश्वास ठेवायला त्यांची तयारी नव्हती. श्लिएफेन–योजनेचा फ्रान्सला अगोदर सुगावा लागला नव्हता असेही नाही. १९०४ मध्ये या योजनेचा पहिला मसुदा तयार झाला तेव्हाच तो एका जर्मन सेनाधिकाऱ्याने फ्रेंच युद्धखात्याला विकला होता. त्यावेळी

जनरल पेन्देझाक सरसेनानी होता. ' श्लिएफेन-योजने 'मध्ये तथ्य आहे असे त्याला वाटले. परंतु त्याच्या सहकाऱ्यांना मात्र ही योजना कमालीची हास्यास्पद वाटली आणि आपली दिशाभूल करण्यासाठीच ही बनावट योजना आपल्या हातात पडावी अशी जर्मन युद्धखात्याने तरतूद केली असली पाहिजे असे त्याचे मत पडले. म्हणून या योजनेची फ्रान्सने त्यावेळी गंभीर दखल घेतली नाही.

' श्लिएफेन–योजने 'चा खरा धोका एकट्या जनरल मिशेल याने ओळखला होता. १९११ मध्ये तो सरसेनानी असतांना त्याने असे स्पष्ट म्हटले होते–' युद्धाचा भडका उडताच जर्मन सैन्य बेल्जममधून फ्रान्समध्ये प्रवेश करण्याची शक्यता ध्यानात घेऊन आपण व्हर्दू ते अँटवर्प यांच्या दरम्यान दहा लाख सैनिकांची फळी उभी केली पाहिजे. म्युएझ नदीवरचे नामूर हे ठिकाणही या बंदोबस्तातून वगळता कामा नये. "

मिशेलचे हे पत्र वाचले तेव्हा फ्रेंच युद्धखात्यातले अतिरथी-महारथी कुचेष्टेने हसले. त्यावेळी जोफ म्हणाला होता, ' मिशेलची ही सूचना म्हणजे निव्वळ मूर्खपणा आहे. ' लॉरेनच्या पठारावरूनच जर्मन सैन्य फ्रान्समध्ये घुसू शकते याबद्दल जोफची इतकी खात्री होती की मिशेलची सूचना विचारात घ्यावी असे त्याला मुळीच वाटले नाही. तसे वाटणे सोयीचेही होते. कारण एक तर आतापर्यंत ' श्लिएफेन–योजने 'ची दखल घेण्यात आलेली नव्हती आणि दुसरे कारण असे की जर्मन सैन्य बेल्जममधून पुढे आले तर फ्रेंच सेनेवर बचावाची भूमिका घेण्याची पाळी येणार होती.

जोफचा दुसरा आक्षेप मिशेल याला पटला. युद्ध जिंकायचे असेल तर चढाईचे धोरण स्वीकारायला हवे हे त्याला मान्य होते. म्हणून तो जोफ याला म्हणाला, ' बेल्जम–आघाडीवरच सेना–सामर्थ्य दुपटीनं वाढविलं तर आपल्याला चढाईचं धोरण स्वीकारता येईल. त्यासाठी आपण आपलं राखीव सैन्य आघाडीवर आणून ठेवलं पाहिजे. "

जर्मन सेनानींनी त्यावेळी नेमके तेच धोरण अवलंबिले होते. केवळ खड्या सैन्याच्या बळावर त्यांना बेल्जमच्या किनारपट्टीपर्यंत मोर्चे बांधणे शक्यच नव्हते. म्हणून त्यांनी आपले राखीव सैन्य आघाडीवर आणून ठेवले होते. आधुनिक युद्ध-शास्त्रातील हा अगदी क्रांतिकारक विचार होता. मिशेलने जोफ याला तेच सुनावले होते. परंतु राखीव सैन्याला ही जबाबदारी पेलेल हे काही फ्रेंच सेनानींना पटेना.

मिशेलचा युक्तिवाद अचूक होता हे पुढे कळून आले. परंतु युद्ध तोंडावर आले तेव्हा मात्र मिशेल एकाकी पडला होता. त्यामुळे त्याला सरसेनानीपदावरून दूर करण्यात आले आणि त्याजागी जोफची नेमणूक करण्यात आली. फॉश आणि कासलमान या आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने जोफ युद्धव्यूहाची आखणी करू

लागला. बेल्जमलगतच्या सीमेकडे सर्वस्वी दुर्लक्ष करून जोफ याने आल्सेक आणि लॉरेन भागातील सरक्षण–व्यवस्थेकडे आपले लक्ष केंद्रित केले. जोफ सैनिकांना सागत होता, 'युद्धाला प्रारंभ होताच आपण या आघाडीवर एकदम चढाईच धोरण स्वीकारायच आहे. म्हणजे काही दिवसाच्या आत आल्सेक आणि लॉरेन यापैकी एक तरी प्रात आपण ताब्यात घेऊ शकू.'

यावेळी जनरल फॉश, ऱ्हाईनवरच्या मेन्झ या गावापासून एकशेवीस मैल दूर असलेल्या नान्सी येथे उभा होता. तो म्हणाला, 'आपण मेन्झ गाठल की आपल्याला बर्लिनपर्यंत सहज मुसडी मारता येईल.'

युद्धाला प्रारंभ झाला तेव्हा स्वित्झर्लंडलगतच्या बेलफोर्टपासून बेल्जमलगतच्या हिर्सन या गावापर्यंत फ्रेंच सैन्य चढाईच्या पवित्र्यात उभे होते परतु हिर्सनपासून इंग्लिश खाडीपर्यंतचा दोनशे मैलाचा पट्टा तसाच मोकळा ठेवण्यात आला होता.

जर्मनीने नेमका याचा फायदा घेतला.

श्लिएफेन योजनेप्रमाणे मोल्टके याने प्रथम बेल्जममधील लिएज आणि नामूर हे किल्ले आपल्या ताब्यात घेतले आणि हिर्सनच्या पश्चिमेकडल्या मोकळ्या भागातून त्याचे सैन्य पुढे आले. तेथून पॅरिस गाठणे फारसे अवघड नव्हते. पॅरिसच्या सरक्षणासाठी पूर्वेला आणि दक्षिणेला फ्रेंच आणि ब्रिटिश सैन्य उभे होते. परतु अगावर लाटा याव्यात तसे जर्मन सैन्य वेगाने पुढे सरकू लागताच फ्रेंच आणि ब्रिटिश लष्करावर माघार घेण्याची पाळी आली.

ऑगस्ट सपायच्या आतच फ्रान्सवर युद्ध गमावण्याचा दुर्धर प्रसग येऊन ठेपला होता.

यावेळी फ्रान्सचे ग्रह उच्चीचे असले पाहिजेत. म्हणूनच अनपेक्षितपणे एक चमत्कार घडून आला. केवळ पॅरिसच्या लढाईचेच नव्हे तर पहिल्या जागतिक महायुद्धाचे भवितव्य बदलून टाकण्याचे सामर्थ्य त्या चमत्कारात होते.

सप्टेंबर उजाडला तेव्हा रणक्षेत्राचा विस्तार खूपच झाला होता. आल्सेक-लॉरेनपासून पॅरिसपर्यंतच्या अडीचशे मैल लाबीच्या भूभागावर चकमकी झडत होत्या. जनरल फॉन क्लकच्या नेतृत्वाखालील जर्मन सैन्याने अल्पावधीत एवढी मुसडी मारली होती की केव्हा एकदा आपण पॅरिसमध्ये प्रवेश करतो असे त्याला झाले होते. काही जर्मन तुकड्या तर पॅरिसला इतक्या भिडल्या होत्या की आयफेल टॉवरचा कळस त्याच्या नजरेच्या टप्प्यात आलेला होता.

मध्यतरीच्या काळात जोफ याने सिमाँ गॅलिएनी या निवृत्त सेनानीची पॅरिसचा लष्करी गव्हर्नर म्हणून नेमणूक केली होती. तशीच वेळ आली तर आपण पॅरिस सोडून द्यावे हा जोफ याचा विचार गॅलिएनी याला बिलकुल मजूर नव्हता. तो जोफ याला म्हणाला, 'आपण पॅरिस गमावलं तर लोक घाबरून जातील. परंतु

त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट ही आहे की पॅरिस हे आपल्या दळणवळणाचं मुख्य केंद्र आहे. म्हणून पॅरिसचं सरक्षण करण्यासाठी आपण पराकाष्ठा करायला हवी.'

आपला हा निर्धार लोकाना कळावा म्हणून गॅलिएनी याने लष्करी गव्हर्नरपद स्वीकारताच साऱ्या पॅरिसभर आपल्या सहीची पत्रके लावली. या पत्रकात त्याने म्हटले होते—' फ्रान्सच्या सरक्षणाला नवी गती लाभावी म्हणून सरकारने पॅरिसहून बोर्दो येथे प्रयाण केलेले असले तरी पॅरिस झुजविण्याचा सरकारचा निश्चय कायम आहे आणि त्यासाठीच माझी नेमणूक करण्यात आलेली आहे ही जबाबदारी पार पाडण्यात माझ्याकडून कुचराई होणार नाही. '

बरेचसे लष्कर आल्सेक, लॉरेन आणि आर्देनेस येथल्या आघाड्यांवर गुतून पडलेले असल्यामुळे गॅलिएनीच्या दिमतीला दिलेले सैन्य शत्रूवर चढाई करण्याच्या दृष्टीने तोकडे होते. परतु जनरल क्लक याने नेमका यावेळी आपला पहिला विचार बदलला आणि गॅलिएनी याने त्याचा अचूक फायदा घेतला. पॅरिसच्या दक्षिणेकडला आणि पश्चिमेकडला प्रदेश ताब्यात घेतल्याशिवाय पॅरिसमध्ये घुसण्याची घाई करायची नाही असा क्लक याला वरिष्ठाचा आदेश होता. परतु प्रारंभी मिळालेल्या विजयामुळे हा आदेश आता ध्यानात घ्यायची गरज नाही असे त्याला वाटले आणि त्याने चढाईची दिशा बदलली. तो उत्तरेकडून आणि पूर्वेकडून फ्रान्समध्ये प्रवेश करण्याच्या प्रयत्नाला लागला. क्लक याने चढाईची दिशा बदलली आहे याचा गॅलिएनी याला सुगावा लागताच त्याने पूर्वेकडल्या मार्न नदीच्या तीरावर उभ्या असलेल्या फ्रेंच आणि ब्रिटिश सैन्याला जनरल क्लक याच्या लष्करावर तुटून पडण्याचा हुकूम दिला. क्लक याला हा हल्ला अनपेक्षित होता. त्यामुळे तो थोडासा मागे सरला. यामुळे तर त्याची परिस्थिती अधिकच बिकट झाली. कारण क्लकचे सैन्य जनरल बुलोव्हच्या सैन्यापासून अलग पडले. ही दोन्ही सैन्ये एकत्र झाली तर पुन्हा त्याची आगेकूच सुरू होईल हे ओळखून गॅलिएनी याने क्लक आणि बुलोव्ह याच्यातील अतर वाढावे अशा हेतूने मारा सुरू केला.

मार्नच्या तीरावरील ही धुमश्चक्री सहा सप्टेंबरपासून एक आठवडाभर सुरू होती. आपल्याला माघार घेण्याशिवाय गत्यतर उरलेले नाही हे क्लक आणि बुलोव्ह याना तेरा सप्टेंबरला कळून चुकले. यावेळी त्याची अवस्था इतकी केविलवाणी झाली होती की आतापर्यंत हातात आलेले तीस हजार फ्रेंच युद्धकैदी तसेच सोडून देऊन या जर्मन सेनानींनी एस्न नदीपर्यंत माघार घेतली.

' मार्नच्या काठावरील चमत्कार ' म्हणून हा रणसग्राम ओळखला जातो.

या चमत्कारामुळे पॅरिस वाचले आणि पॅरिसबरोबर फ्रान्सही. सहा आठवड्यांच्या आत फ्रान्सला शरण आणण्याचे कैसरचे वेळापत्रक धुळीला मिळले. त्या रागाच्या भरात त्याने मोल्टके याला सरसेनानीपदावरून बडतर्फ केले.

यानंतर फ्रान्स चार वर्षे जर्मनीबरोबर झुंज घेत होता. या युद्धामध्ये त्याला



अंहं, असं नका करू!
THIS WAY
deluxe ink
ROYAL BLUE
पेन मोडून टाकण्यात काय
अर्थ आहे? पेन चागलं
चालायला हवं असेल तर
त्यासाठी शाई चांगली
वापरायला हवी. सफाईने
सहज उतरणारी, चटकन
वाळणारी. कॅमल डीलक्स इंक भरा.
कॅमल
डीलक्स इंक खरेदी करा

प्रारंभापासून ब्रिटनची मदत झाली हे खरे. फ्रेंच सैन्य दमलेले असताना अखेरच्या कालखंडात अमेरिकन सैन्यानेही फ्रान्सला आधार दिला हेही अमान्य करता येणार नाही. परंतु तरीही पश्चिम आघाडी प्रारंभापासून अखेरपर्यंत मुख्यतः फ्रान्सलाच साभाळावी लागली. हे करताना फ्रान्सच्या निग्रहाची अनेक वेळा कसोटी लागली. दमछाक झाली पण फ्रान्सचा धीर सुटला नाही. एकदा पॅरिसच्या मानेभोवतालचा गळफास सुटल्यानंतर फ्रान्सचा श्वास कधी कोंडला गेला नाही.

मार्नच्या काठावरील चमत्कारामुळेच हे घडू शकले.

पहिल्या महायुद्धाच्या चार वर्षांच्या अवघड कालखंडामध्ये तिसऱ्या प्रजासत्ताकाने आपल्या राष्ट्रीय चैतन्याचा जो घवघवीत आविष्कार दाखविला त्याला फ्रान्सच्या इतिहासात तुलना सापडणे कठीण आहे. जुन्या अनियंत्रित राजसत्तेच्या काळातच काय पण अगदीं अलीकडच्या नेपोलियन कारकिर्दीतही, सारा देश एकदिलाने एखाद्या विकट आव्हानाला सामोरा गेला आहे असे घडले नाही. युद्धातील चढउतारामुळे, फ्रान्सचे भवितव्य सतत अनिश्चिततेच्या लाटांवर हिंदकळत असताना तिसऱ्या प्रजासत्ताकाने जी चिवट वृत्ती दाखविली आणि नियतीवर मात करण्याचा जो अपूर्व पराक्रम केला त्याचे सारे श्रेय त्यावेळच्या विजीगिषु वृत्तीच्या फ्रेंच नेतृत्वाला द्यायला हवे.

क्लेमेन्सो आणि पुअँकरे, जोफ्र आणि गॅलिएनी, पेतां आणि फॉश ही माणसे अशी होती की पराभवाचे काळे ढग चोहो अंगानी गोळा झालेले असतानाहीं, आपल्या भूमीवरून शत्रूला पिटाळून लावण्याचा त्यांचा निश्चय कधी काजळला गेला नाही.

पुअँकरे हा तर त्यावेळी राष्ट्राध्यक्ष होता. त्यामुळे जनतेचे मनोधैर्य अभंग राखण्याची जबाबदारी त्याच्यावर होती. ती त्याने हिंमतीने पार पाडली. तो एकसारखे सांगत होता. 'आपला शेवटचा सैनिक जिवंत असेपर्यंत आपण लढणार आहोत.' या चार वर्षांच्या काळात शत्रू सदैव पॅरिसच्या जवळ उभा होता. त्यामुळे पॅरिस आपण किती काळ झुंजवू शकू याची पुअँकरे यालाही खात्री वाटत नव्हती. फ्रान्सच्या दृष्टीने ही परिस्थिती आश्वासक नाही हे त्याला ठाऊक होते. परंतु तरीही तो भांबावून गेला नाही की अखेरपर्यंत लढण्याच्या त्याच्या पोलादी निर्धाराला तडा गेला नाही.

महायुद्ध सुरू झाले तेव्हा क्लेमेन्सो कोणत्याच अधिकारपदावर नव्हता. तरी-देखील एक जागरूक निरीक्षक या नात्याने तो आपले कर्तव्य बजावीत होता. सरकारकडून किंवा सेनानीकडून एखादी चूक घडली की तो अस्वस्थ होई. त्या अस्वस्थतेमुळे त्याच्या आवाजाला अधिकच धार येत असे. १९१७ मधला नोव्हेंबर महिना फ्रान्सच्या दृष्टीने जीवघेणा ठरला. अशा वेळी प्रधानमंत्रीपद स्वीकारण्याचे क्लेमेन्सोला आवाहन करण्यात आले. त्याच्या कर्तृत्वाला ते आव्हान होते. ज्या

पोटतिडकीने क्लेमेन्सो सरकारवर टीका करीत होता त्याच जिव्हाळ्याने त्याने हे निमत्रण स्वीकारले.

फ्रान्सच्या बिकट कालखंडामध्ये क्लेमेन्सो याने नेतृत्वाचा नवा मानदंड निर्माण केला.

महायुद्ध भडकल्याला तीन वर्षे झाली होती. त्या अवधीत फ्रान्सच्या जीवित-वित्ताचा फार मोठ्या प्रमाणावर विनाश झाला होता. विसाव्या शतकात यद्धतंत्र बदलले याची बऱ्याच फ्रेंच सेनानींना जाणीव नव्हती. ते सतत चढाईच्या धोरणाचा आग्रह धरीत होते. या भ्रामक अट्टाहासापायीच लक्षावधी सैनिकांचे बलिदान घडले होते आणि एवढी अपरंपार प्राणहानी होऊनही फ्रान्सच्या हाती फारसे काही लागले नव्हते.

या वैफल्यामुळे फ्रेंच समाजाचे मन विकल झाले होते. जो तो दुसऱ्यावर चडफडत होता. लोक सरकारवर ठपका ठेवत होते, सरकार सेनाधिकाऱ्यांना जबाबदार धरीत होते, राजकीय पक्ष आणि वृत्तपत्रे 'आता या देशाच काय होणार' असे गंभीर चेहेरा करून विचारीत होते. सरकारचा वचक नाहीसा झाला की देशद्रोह्यांना फावते. फ्रान्समध्येही तसेच घडले. मोठमोठ्या हुद्यांवरचे अधिकारी शत्रूला गुप्त माहिती पुरवून पैसा गाठीला बांधण्याच्या उद्योगामध्ये रममाण झाले. शांततेचा ध्यास लागलेल्या समाजवाद्यांना तर ही पर्वणीच वाटली. त्यांनी कामगाराना संपावर जायला प्रवृत्त केले. देशाच्या राजकीय वातावरणातील ही व्यग्रता सैनिकांपर्यंत पोचायला वेळ लागला नाही. गेले कित्येक दिवस खंदक हेच त्याचे घर झाले होते. आपण कसे राहत आहोत, कोणत्या अडचणी सहन करीत आहोत यासंबंधी सरकार बेफिकीर आहे असे सैनिकाच्या मनाने घेतले आणि बंडाचा विचार त्याच्या मनात घोळू लागला. कामगारांच्या संपामुळे उत्पादन थंडावले, सैनिकांच्या असहकारामुळे रणांगणावरील हालचाली मंदावल्या. १९१७ मधले मे आणि जून महिने तर असे गेले की निरनिराळ्या आघाड्यावरचे सेनानी स्वस्थ बसून होते.

मार्नच्या काठावरचा चमत्कार वाया जाणार की काय, एखादी इमारत मध्येच खचावी तसा हा देश एकदम कोसळतो की काय या भयप्रद जाणीवेने जाणकारांचे मन थरकले.

अशा वेळी त्याना आठवण झाली ती त्या म्हाताऱ्या वाघाची-क्लेमेन्सोची.

परिस्थिती अंगावर उलटलेली असतानाही नमते घ्यायचे नाही ही क्लेमेन्सोची अशरण वृत्ती फ्रान्सच्या परिचयाची होती. म्हणून त्याच्या मित्रांनी 'नरव्याघ्र' असे त्याचे नामकरण केले होते. कर्तृत्ववान माणसाला मित्रांपेक्षा हितशत्रूच अधिक असतात. क्लेमेन्सोचे तसेच होते. त्यामुळे क्लेमेन्सोला प्रधानमंत्री करावे असे जेव्हा

त्याच्या मित्रांनी सुचविले तेव्हा या स्वयंमन्य हितशत्रूंनी कुत्सित स्वरात म्हटले, "तुमचा क्लेमेन्सो वाघ आहे हे खरं. पण तो वाघ आता म्हातारा झालेला आहे हे विसरू नका."

हितशत्रूच्या आक्षेपाला कृतीने उत्तर देण्याची धमक त्या वृद्धयुवकाच्या अंगात होती. म्हणूनच, टीकाकारांच्या बालिश बडबडीकडे लक्ष न देता, क्लेमेन्सोने प्रधानमंत्रीपद स्वीकारताच, फ्रेंच समाजातील वैफल्यवादाविरुद्ध युद्ध पुकारले. लोकमानसातील मरगळ दूर केल्याशिवाय विजयाचा मार्ग मोकळा होणार नाही हे त्याने ओळखले होते. प्रथम त्याने देशद्रोह्यांना तुरुंग दाखविला. हे करताना त्याने कोणाचाही मुलाहिजा ठेवला नाही. कय्योसारखा एकेकाळचा प्रधानमंत्रीही त्यात भरडला गेला.

युरोपमध्ये भडकलेल्या रणनाट्याचा आता शेवटचा अंक सुरू झालेला आहे हे क्लेमेन्सोला माहीत होते आणि म्हणून, या नाट्याचे भरतवाक्य फ्रान्सच्या विजयगीताने उच्चारले जाणार आहे असा लोकांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी, क्लेमेन्सोला ही सारी धडपड करावी लागत होती. एक वर्षभर तो खरोखरच एखाद्या हुकुमशहासारखा वागला.

तो तसा वागला म्हणूनच फ्रान्स वाचला.

परिस्थितीच्या संदर्भातच तत्त्वाचे मोल मोजायचे असते, सिद्धांताची मातबरी मानायची असते असे क्लेमेन्सोचे व्यावहारिक मन त्याला बजावत होते. म्हणूनच देशाचे अस्तित्व धोक्यात आलेले असताना दुबळ्या लोकशाहीची पर्वा करायची नाही असे त्याने ठरविले. त्यामुळेच तो फ्रान्सच्या वैभवाचा शिल्पकार ठरला.

पेतांबद्दलही तसेच म्हटले पाहिजे. व्हर्दूचा किल्ला हा फ्रान्सच्या लष्करी प्रतिष्ठेचा मानबिंदू होता. म्हणून तो ताब्यात घेण्यासाठी जर्मन सैन्य या किल्ल्याच्या दगडी भिंतीवर धडका घेत होते. १९१६ मध्ये तर हा किल्ला हातचा जातो की काय अशी फ्रान्सची अवस्था झाली होती. अशा वेळी हा किल्ला झुजविण्याची जबाबदारी पेतांवर सोपविण्यात आली. त्याने हा किल्ला अखेरपर्यंत लढविला म्हणून 'व्हर्दूचा विजेता' असा त्याचा गौरवोल्लेख करण्यात आला.

१९१६ मध्ये जोफ्रला सरसेनानीपदावरून दूर करण्यात आले. त्याच्या जागी आलेला नेव्हिल वर्षभरातच बाजूला सरला. १९१७ चा मे महिना फ्रान्सच्या दृष्टीने अतिशय अवघड ठरला होता. अशा वेळी पेतां याने सरसेनानीपद स्वीकारले. यावेळी तो एकसष्ट वर्षांचा होता. तरीही त्याचा उत्साह दांडगा होता. फ्रान्सला निराशेने ग्रासले आहे या संधीचा फायदा घेऊन जर्मन सेनानी पुन्हा एकदा चढाईचा पवित्रा घेणार हे पेतांला माहीत होते. परंतु ही चढाई थोपवायची एवढीच काही त्याच्यावर जबाबदारी नव्हती. पेतां सरसेनानी झाला तेव्हा फ्रेंच लष्करामध्ये कमालीची बेदिली माजली होती. प्रत्येक छावणीमध्ये बंडाची भाषा ऐकू येत होती.

शत्रूच्या चढाईपेक्षा हा धोका भयानक होता. यावेळी केवळ कणखर उपाय योजून भागणार नाही हे पेतॉं याने ओळखले. सैनिकाना विश्वासात घेतल्याशिवाय ते लढायला तयार होणार नाहीत हे जाणून पेतॉं याने सर्व आघाड्यांना भेट दिली. सैनिकाची गाऱ्हाणी शांतपणाने समजावून घेतली. तीन वर्षे खंदकांमध्ये काढावी लागल्यामुळे सैनिकांना अनेक अडचणी सहन कराव्या लागत होत्या. त्या ताबडतोब दूर केल्या पाहिजेत असे पेतॉंने सरकारला बजावले. सैनिकांना रजेचे प्रमाण वाढवून दिले. आपल्या कुटुंबियाची आबाळ होत आहे ही सैनिकांची आणखी एक मुख्य तक्रार होती. त्यामुळे सैनिकांच्या मुलाबाळांना अधिक सवलती देण्याचा कायदा करणे आवश्यक आहे हे पेतॉंने ससदेला पटवून दिले.

पेतॉंची ही तडफ पाहून सैनिकाचा राग दूर झाला. मग त्याने सैनिकांना आणि सेनाधिकाऱ्याना शिस्तीने वागण्याचे आवाहन केले. तो म्हणाला, 'शिस्त हा लष्कराचा प्राण आहे. म्हणून मी शिस्तभगाबाबत दयामाया दाखविणार नाही हे पक्के लक्षात ठेवा.' आक्रमक युद्धव्यूहाची रचना केव्हा करायची याबद्दलचे त्याचे मत स्पष्ट होते. सैनिकाचे नाहक बलिदान करणे त्याला मंजूर नव्हते. तोफदळ सुसज्ज झाल्याशिवाय पायदळाला आगेकूच करायचा हुकूम द्यायचा नाही असे त्याने ठरविले होते आणि आपला हा निर्णय त्याने सैनिकांनाही कळविला होता. त्याच्या या निर्णयाचा सैनिकावर अपेक्षित परिणाम झाला. आपल्या अडीअडचणींची दखल घेणारा आणि नवे युद्धतंत्र जाणणारा सरसेनानी आपल्याला आता लाभला आहे अशी त्याची खात्री पटली.

नतर पेतॉंने बंडखोर सैनिकाचा समाचार घेतला. जे सैनिक खंदकांमध्ये परत जायला तयार नव्हते त्याच्यावर त्याने खटले भरले. त्याच्यापैकी बऱ्याच जणांची लष्करी कारावासात रवानगी केली. त्यामुळे या सैनिकांना चिथावणाऱ्या दुय्यम सेनाधिकाऱ्यांनाही वचक बसला.

अवघ्या सहा महिन्याच्या आत पेतॉंने फ्रेंच सैन्यामध्ये नवे सामर्थ्य निर्माण केले.

परतु आश्चर्याची गोष्ट अशी की व्हर्दूचा किल्ला झुंजविणाऱ्या आणि सर्वसामान्य सैनिकामध्ये आत्मविश्वास निर्माण करणाऱ्या पेतॉंलाच नंतर पराभवाच्या गडाने पछाडले. मानवी मनाच्या वर्तनाचे तर्कशास्त्र नियमांच्या चौकटीत पकडता येत नाही हेच पेतॉंने सिद्ध केले.

१९१८ चा मार्च उजाडला तेव्हा, विजयश्री हस्तगत करण्याचा अखेरचा आणि निकराचा प्रयत्न करण्यासाठी जर्मनीने आपल्या उरल्यासुरल्या सामर्थ्यानिशी नवी चढाई सुरू केली. या चढाईचा जोर एवढा होता की सर डग्लस हेगच्या हाताखालचे ब्रिटिश सैन्य मागे हटू लागले. आपल्या सैन्याचीही तीच गत होणार आहे असे पेतॉं याच्या मनाने घेतले. जर्मन चढाईचा विचार करण्यासाठी फ्रेंच आणि ब्रिटिश सेनानीची बैठक भरलेली असताना, हेग याच्याकडे बोट करीत पेतॉं

म्हणाला, 'याला पंधरा दिवसाच्या आत शरणागती स्वीकारावी लागणार आहे. आपल्यावर ती पाळी आली नाही म्हणजे मिळविली.'

आयत्या वेळी कच खाण्याचा पेताँचा स्वभाव पुढे १९४० मध्येही उफाळून आल्याचा फ्रान्सने अनुभव घेतला. तरीदेखील १९१७ मधील त्याची महत्त्वपूर्ण कामगिरी नाकारता येत नाही.

पेताँच्या पार्श्वभूमीवर जोफ्र आणि गॅलिएनी यांचे कर्तृत्व विशेष उठून दिसते. महायुद्धाला तोंड लागल्यानंतर महिन्याभराच्या आतच जर्मन सैन्य पॅरिसपर्यंत येऊन थडकले होते. अशा वेळी जोफ्र किंवा गॅलिएनी याचे धैर्य हरपले असते तर पश्चिम आघाडी कोसळायला फारसा अवधी लागला नसता. पुढेही माघार घ्यायचे जोफ्रवर अनेक वेळा प्रसंग आले. परंतु तो कधी गागरून गेला नाही. क्लक या जर्मन सेनानीने लहानशी चूक करताच गॅलिएनी याने प्रसंगावधान दाखवून त्याला मार्नेच्या तीरावरून पिटाळून लावले आणि लढाईला वेगळे वळण दिले. १९१४ साल गाजविले ते या दोघानी.

फॉश हाही असाच निधड्या छातीचा सेनानी होता. त्याचा स्वतःच्या कर्तृत्वा-वर भरपूर विश्वास होता, फ्रेंच सैनिकाच्या शौर्याविषयी त्याला शंका नव्हती आणि मुख्य म्हणजे अंतिम विजय आपलाच आहे याबद्दल त्याला कधीही संदेह वाटला नाही. १९१८ च्या मार्चमध्ये पेताँ याने हातपाय गाळले तेव्हा फॉश त्याच्यावर खवळला. अँग्लो-फ्रेंच सेनानीच्या बैठकीमध्ये, 'पराभव अटळ आहे' अशी पेताँ याने भाषा काढताच फॉश त्याला म्हणाला, 'तुला लढायला नको आहे म्हणून तू पराभवाची अशुभ भाषा बोलतो आहेस. कोणाचं काहीही मत असो, मी शेवटपर्यंत लढणार आहे. शत्रूची जिथं जिथं गाठ पडेल तिथं तिथं लढणार आहे.'

फॉशचा हा आवेश पाहून सर डग्लस हेग याला धीर आला. त्यावेळची परि-स्थिती अशी होती की फ्रेंच, ब्रिटिश आणि अमेरिकन लष्कराच्या हालचालीमध्ये सुसूत्रता असणे आवश्यक होते. या तिन्ही लष्करांचे नेतृत्व एकाच व्यक्तीकडे सोपवावे असे जेव्हा ठरले तेव्हा सगळ्यानी एकमताने 'पश्चिम आघाडीचा सर-सेनानी' म्हणून फॉशची निवड केली.

फॉश आतापर्यंत जे बोलत होता ते करून दाखविण्याची संधी त्याला मिळाली होती. फ्रान्सबरोबरचे युद्ध जिंकण्याचा अखेरचा प्रयत्न करण्यासाठी जर्मनीने लुडेनडार्फची पाठवणी केली. परंतु फॉशने अवघ्या दोन महिन्याच्या आत लुडेन-डार्फच्या सैन्याला फ्रेंच भूमीवरून पिटाळून लावले. इतकेच नव्हे तर विजेत्याच्या रुबाबात जर्मन भूमीवर पदार्पण करण्याचा मानही फॉशनेच मिळविला.

तिसऱ्या प्रजासत्ताकावरचे अरिष्ट टळले होते.

११ नोव्हेंबर १९१८ चा दिवस. सकाळची पाचची वेळ. खास सरसेनानीसाठी

राखून ठेवण्यात आलेली आगगाडी कॉंपिएन्सच्या जंगलातील रेथॉन्द यथे उभी होती. या आगगाडीतील एका डब्यामध्ये सरसेनानीची कचेरी होती. तेथे मार्शल फॉश अगोदरच येऊन बसला होता. तो कैसरच्या प्रतिनिधीची वाट पहात होता. ठरल्याप्रमाणे जर्मन सेनानी तेथे आला, फॉशला त्याने लष्करी पद्धतीने अभिवादन केले आणि फॉशने पुढे केलेल्या कागदावर मुकाटयाने स्वाक्षरी केली. तो जर्मन अधिकारी निघून गेला तेव्हा फॉश स्वतःशीच हसला. जर्मनीने फ्रान्सकडे युद्ध-विरामाची याचना केली होती. तो कागद हातात खेळवीत फॉशने पॅरिसला फोन केला–" जर्मनीनं शरणागती स्वीकारली आहे. आज सकाळी अकरा वाजल्यापासून युद्धविराम कार्यवाहीत येत आहे. "

हा फोन आला तेव्हा पॅरिसमधल्या नोत्रदाम चर्चवरची घंटा विजयनाद घुमवीत होती. पॅरिस आनंदाने अक्षरशः वेडे झाले होते. आर्क द त्रायंफपासून प्लेस द ला कोन्कोर्दपर्यंत एकच घोषणा निनादत होती–'व्हिव्हा ला फ्रान्स '

फ्रान्सने युद्धाचा खर्च मांडला–तेरा लाख सत्तावन्न हजार आठशे माणसे ठार, बेचाळीस लाख सहासष्ट हजार माणसे जखमी, पाच लाख सदतीस हजार माणसे युद्धकैदी वा बेपत्ता, उत्तर भागातील उद्योगधंदे उद्‌ध्वस्त झालेले, सरकारी तिजोरी रिकामी पडलेली, मोजता न येण्याजोगा कर्जभार डोक्यावर बसलेला.

जमा–विजयप्राप्तीचा सुखद अनुभव. वाढलेल्या प्रतिष्ठेचा अभिमान. कठिणतम दिव्यातून देश वाचल्याचा आनंद. आपले प्रजासत्ताक दुबळे नाही हा आशावाद.

एकोणिसशे अठरा हे वर्ष इतिहासामध्ये विरून गेले तेव्हा जर्मनीतील राजसत्ता देशोधडीला लागली होती, ऑस्ट्रिया-हंगेरी आणि तुर्कस्तान यांची साम्राज्ये नकाशावरून पुसून गेली होती, रशियातील नवजात बोल्शेव्हिक सत्ता अंतर्गत शत्रूशी मुकाबला करण्यासाठी धडपडत होती आणि इटालीमध्ये यादवी उफाळून आली होती. विजेत्या फ्रान्सशी बरोबरी करू शकेल अशी एकही सत्ता युरोपच्या भूमीवर उरली नव्हती.

फ्रान्सच्या इतिहासातील तो सुवर्णक्षण होता.

(क्रमशः)






सुधाकर राजे

## ◻ गाढवालाच गुळाची चव

परवा वर्तमानपत्रात वाचले की कानडात एका प्राणिसंग्रहालयातला पाणघोडा जाळी तोडून पळाला तेव्हा आमिष म्हणून त्याच्या वाटेवर थोड्या थोड्या अंतराने केक टाकण्यात आले, व ते खात खात तो पिंजऱ्यात परतला. भले शाबास ! आता गाढवाला गुळाची काय चव असे म्हणायची सोय नाही; उलट गाढवालाच गुळाची चव असे म्हटले पाहिजे. आता हा पाणघोडा पाश्चिमात्य देशात स्थाईक झाल्याने त्याला केकचे एवढे जबरदस्त आकर्षण वाटले यात शंका नाही. त्यातूनही तो अमेरिकेतल्या एखाद्या झूमध्ये असता तर मला वाटते त्याच्या वाटेवर चुइंग गम पसरावा लागला असता अन् ठिकठिकाणी कोकाकोलाचे हौद बांधावे लागले असते. पण हाच पाणघोडा दिल्लीतल्या झूमधला असता तर ? तर मग त्याला योग्य असे एकच आमिष ठरले असते – आलू छोले. दिल्लीच्या कुठल्याही फूटपाथवर मुबलक उगवणारा हा पदार्थ उघडी-नागडी गरिबांची पोरे जेवढ्या चवीने खातात तेवढ्याच चवीने मोटारीतून उतरणाऱ्या चटकचांदण्या खातात हे अस्मादिकांनी पाहिलेले आहे. थोडक्यात म्हणजे हा पदार्थ यच्चयावत प्राणिमात्राला प्रिय आहे. अन् एकदा प्राणिमात्र म्हटला की त्यात फॅशनेबल बायका आल्या त्याचप्रमाणे पाणघोडेही आले, नाही का ? ते एक असो, पण आपल्या झूमध्ये गाढव ठेवलेले नसते हे नशीब म्हणायचे. नाहीतर पळालेल्या गाढवाला माघारी आणण्यासाठी गुळाच्या किती ढेपी खर्चाव्या लागल्या असत्या हे एक त्या गाढवालाच माहीत !

## ◻ दूधखुळी व्याख्या

भारत सरकारतर्फे प्रकाशित होणाऱ्या गॅझेटच्या ताज्या अंकात 'दूध म्हणजे काय' याची सरकारी व्याख्या देण्यात आली आहे. आता बोला ! दूध म्हणजे काय असा दूधखुळा प्रश्न भारत सरकारला कोणी विचारला याची कल्पना नाही. पण अक्षरशः तान्ह्या मुलापासून प्रत्येकाला दूध म्हणजे काय हे माहीत असल्याने ही सरकारी व्याख्या नक्की कोणासाठी करण्यात आली आहे हे सांगणेही कठीण.

बराच विचार करून माझी खात्री झाली आहे की या व्याख्येची गरज फक्त एकाच माणसाला आहे, व तो म्हणजे आमचा गवळी. आमच्या गवळ्याचा नीरक्षीर-अविवेक आता इतक्या थराला पोचला आहे की किती शेर पाण्यात दुधाचे किती थेंब असलेच पाहिजेत याचा सरकारी दंडक घातल्याखेरीज उपाय नाही.

## ◻ माणसाची एक्स्पोर्ट व्हॅल्यू

आपल्याकडे माणसाला किंमत नाही हेच खरे. आता हेच पहा, भारतातून दर-वर्षी हजारो मानवी सांगाडे म्हणे वैद्यकीय शिक्षणासाठी निर्यात होत असतात. गेल्याच्या गेल्या वर्षी तेवीस हजार सांगाड्यांचे आपल्याला पंचवीस लाख रुपये मिळाले, तर गेल्या वर्षी पन्नास हजार सागाडे निर्यात करूनही अवघे तेवीस लाख रुपयेच मिळाले, हर, हर ! एकामागून एक अन्नान्नमंत्र्यांच्या कारकीर्दीत भारतातली बहुतेक सर्व माणसे अस्थिपंजर झाली आहेत, पण अस्थिपंजर म्हणूनही त्याची एक्स्पोर्ट व्हॅल्यू घसराली नं ? छे, छे, असे होता कामा नये. माझी भारत सरकारला अशी आग्रहाची सूचना आहे की, ' कपाटातला अस्थिपंजर ' भारतात ज्या सुपीरियर क्वालिटीचा मिळू शकेल तसा इतरत्र कोठेही मिळणार नाही हे त्रिकालाबाधित राजकीय सत्य सर्व जगाला नीट कळले पाहिजे. कुठल्याही सर्वसाधारण भारती-याची बरगडी जितक्या सहजतेने मोजता येते तशी इतर कोणाची तरी मोजता येईल काय ? ते काही नाही, भारतातल्या माणसाला किंमत नसल्याने तो अस्थिपंजर झाला असेल, पण अस्थिपंजराची किंमत कमी होता कामा नये.

## ◻ शेक्सपियरचा सूक्ष्मावतार

बंगालमध्ये दोन-चार इंच लांबी-रुंदीची मासिके निघाली व पंधरा-वीस शब्दांच्या लघुकथा लिहिल्या जाऊं लागल्या तेव्हाच पुढे काय होणार याची कल्पना आली होती—अन् ती खरी ठरली आहे. थोड्या दिवसांपूर्वी फक्त सात मिनिटे चालणाऱ्या एका बंगाली नाटकाचा प्रयोग झाला असे वाचले. म्हणजे नाटकाला जाताना हाताला रिस्टवॉच लावायची जरुरी नाही—उलट खिशात स्टॉपवॉच हवे. असो, मराठी प्रमाणे बंगालीतही आता ननाट्य आले म्हणायचे, पण जरा निराळ्या अर्थाने. मराठी ननाट्य हा नाट्याचा नकारात्मक प्रकार समजायला कठीण असेल, पण बंगाली प्रकार अगदी सोपा—ननाट्य म्हणजे नाटकच नाही !

◻ ◻ ◻

मुदलात, शहर मुंबईला सांस्कृतिक कार्यक्रमांना तोटा नसतो. तशात फालतू सत्कारसमारंभांच्या पत्रावळींचा खच तर ऐन मोसमात गुडघाभर पडलेला असतो. सी. सी. आय. च्या हिरवळीपासून आंबेडकरमैदानापर्यंत आणि रेसकोर्सपासून बकरी अड्ड्यापर्यंत सत्कारांच्या मथवलेल्या कुस्त्या चालूच असतात. अशा दलाली मामल्यात कोण कशाला डोकावणार? त्यांचे ते चार भीडू, भिडस्त आप्तस्वकीयांच्या समवेत आपापले कार्यभाग उरकीत असतात. उरलेले थंड जग आपल्या वेगळ्या वाटेने चाललेले असते. ह्या उरलेल्या थंड जगातल्या हजार-बाराशे शौकीनांची पावलं गेल्या शनिवारच्या पावसाळी संध्याकाळी एका आगळ्या सत्कारसमारंभाकडे स्वेच्छेनेच नव्हे, तर उतावळेपणाने वळली होती.

— कारण तो सत्कारसमारंभ होता तुमच्या आमच्या जीवनात मूठभर आनंदाचं चांदणं शिपणाऱ्या संगीतकार श्रीनिवास खळ्यांचा! खळे स्वतः गोड गाणारे; तसेच इतरांना गाते करणारे. सेहेचाळीस सालापासून मराठी गीतांना चाली

# दिवस असा गोड झाला



श्रीनिवास खळे

बांधायला त्यांनी प्रारंभ केला. म्हणजे सरळ हिशोबाने आता त्यांच्या संगीतरचनेच्या पर्वाची पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत. मात्र ह्या मोक्याच्या समेवर जरी हा सत्कारसमारंभ आखलेला होता, तरी तो निव्वळ तेवढ्यापुरताच नव्हता. खळ्यांच्या एकूण संगीतरचनेचाच कृतज्ञतेने गौरव करावा, आणि कलावंत ऐन उमेदीत असतानाच त्याची पाठ थोपटावी, ह्या उमद्या हेतूने तो स्फुरित झाला होता. संस्था नाही, मंडळ नाही, धनिकांचे काडीमात्र सहकार्य नाही, अशी जमेची बाजू लख्ख कोरी असुनही केवळ चार दिलदार मित्र एकत्र आले. त्यांच्या चाहात्यांनी त्यांना साथ दिली.

कार्यक्रम उभा राहिला. तोरण लागलं. सनईचे सूर घुमू लागले. घोळक्याघोळक्याने स्त्री-पुरुष जमा झाले. कृतज्ञता शब्दावाटे वाहू लागली. अंत करण पालवली.

सत्कारनायक बिनीचा सगीतकार. त्याचा सत्कार फक्त गद्य भाषणानीच झाला. पण संगीताची ब्रीच मोठी उणीव छोटेखानी भाषणाच्या काव्यत्म शैलीनी आणि शब्दात भरलेल्या उमाळ्याच्या प्राणानी भरून काढली. एकीकडे खळ्यांची बहादुरी सागितली जात होती, तर दुसरीकडे रसिकाना खळ्यांच्या गोड चालीच्या स्मृतीनी मोहरवून टाकलं होतं. 'गोरी गोरी पान, फुलासारखी छान', 'गिरीधरापुढे ह्या नाचीन मी', 'निळासावळा नाथ', 'शुक्रतारा', 'दावा नयनी यशोदेचा सुकुमार,' 'देवा दया तुझी'... ह्या प्रवाहाला आहोटी माहीत नाही. हृदयनाथ मंगेशकरानी जाहीर कबुलीजबाब दिला की श्रीनिवास खळ्यांबरोबर तुलनेसाठी उभं राहाण्याचीही आपली यत्ता नाही. ह्यातला विनय वजा केला तरीही खळ्यांच्या गुणांची बाकी शिल्लक उरतेच. सप्तसुराची पलटन दिमतीला असलेले वसतराव देशपांडे अध्यक्षपदावरून म्हणाले, 'खळे मराठी भावगीताच वस्त्र विणीत असताना पाश्च्यात्त्य संगीताची भेसळ करतात असा प्रच्छन्न आरोप त्यांच्यावर केला जातो. पण संगीतात कप्पे नसतात. ते भेदाच्या पलीकडे आहे. खळ्यांचे दोन सूर रुजले, रसिकाच्या अतःकरणात स्वराचं लग्न लागलं. ह्यापलीकडे आणखी काय हवंय?' जणू सर्व रसिकाच्या भावना वसतरावानी शब्दाकित केल्या! कारण सगीताच्या व्याकरणाशी सुतराम सोयरसुतक नसलेल्या श्रोत्याना डोलवतात त्या फक्त सुरेल चाली. त्या हृदयाला भिडल्या, ओठावर परत परत फुलल्या म्हणून तर गाणवजावणं नसलेल्या ह्या समारभाला माणसं आडवेळ असूनही आपणहून गर्दी गर्दीने आली.

'श्रीनिवास खळे : एक सकलन' ह्या सुबक गौरवग्रथाच प्रकाशनही अध्यक्षाच्या हस्ते झालं. ह्या आकर्षक पुस्तकाबद्दल काय लिहावं? सगीतक्षेत्रातल्या मुरब्बी कलावंतानी आणि खळ्याच्या रसिकानी वाहिलेली आदराजली किती मार्मिक आणि जिव्हाळ्याची आहे! "खळ्याच्या स्वररचनेत वैचित्र्य आहे, भावपूर्णता आहे, नवीनपणा आहे, खोलपणा आहे, आणि या साऱ्याला शास्त्रीय ज्ञानाची पक्की बैठक आहे. मुख्य म्हणजे त्यात कुणाचेही अनुकरण जाणवत नाही. जे आहे ते खळ्याचे स्वतत्र आणि अस्सल असे कलावैभव आहे," हे लता मगेशकरानी आपल्या 'सज्जन कलावत' ह्या लेखात खळ्यांना दिलेले अमोल शिफारसपत्र म्हणजे खळ्याच्या स्वररचनेच्या शेल्यावरली जरीची वेलबुट्टीच म्हणायची. सौ. वसुमतीवहिनीनी खळ्याच्या घरगुती जीवनाचा आणि झुंजीचा आलेख किती प्राजळपणे काढला आहे! पुस्तकात खळ्याच्या दहा बहारदार गीताचे अत्यत उपयुक्त सकलन आणि स्वरलेखन दिले आहे. किबहुना, हे छोटेखानी पुस्तक म्हणजे शाईमध्ये तयार केलेली श्रीनिवास खळ्याची अतःकरण असलेली रसाळ संगीतरचनाच आहे!

ज्याच्या गौरवासाठी हा सत्कारसमारंभ, ते खळे मात्र शब्दपुष्पाच्या आणि पुष्पहाराच्या तुफान माऱ्यापुढे हवकून गेले मूक झाले. त्याच्या एका तपाच्या सेवेला आलेला फुलोरा ते ओल्या नेत्रांनी पहात होते गायकवाडीत प्रो. मधुसूदन जोशीच्या भारतीय संगीत महाविद्यालयात तानाचे पलटे घोटलेल्या ह्या कलावताने अजमीरला जाऊन रेल्वे स्टेशनमास्तरचा रुक्ष अभ्यासक्रम पूर्ण केला. मात्र रेल्वेच्या फाट्यावर आयुष्य फुकट दवडायच नाही ही मनाशी खूणगाठ मारून आयुष्याचा फाटा बदलला नि बेकार अवस्थेत मायपोट मुबई गाठली. एका चिचोळ्या जागेत मोजून अठरा माणसं रहात असलेल्या कुटुबाचा आश्रय घेतला. डी. पी. कोरगाव-करांकडे कफल्लक अवस्थेत उमेदवारी केली. आकाशवाणीवर शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम केले. संसार केला. अन्नाला महाग झाले हार्मोनियम विकायला निघाले. पण वहिनीनी धीर दिला. आशाबाईंनी सावली केली. एच. एम. व्ही. ने आधार दिला. हळू हळू काम मिळू लागलं. त्रेसष्ट साली आकाशवाणीवर मराठी सुगम संगीत विभागाचे स्वररचनाकार ह्या पदावर मोठ्या मानाने आले. पण आल्यावर चरकात अडकून बसले. चाकरमानेगिरीत कोडून पडले. नोकरनाम्यावरहुकूम त्यांना सर्वकर्मकुशल व्हाव लागलं. कारकून होऊन कॅटलॉग भरावे लागले, वाद्याची ने-आण करावी लागली, वाद्यवृंदाना चाली ठोकाव्या तर लागल्याच, पण अस्मा-दिकांसारख्याची चिल्लर पदही स्वरबद्ध करावी लागली. पण ही हमाली चालू असताना काही सुदर कामंही हातून झाली. 'शुक्रतारा मंदवारा' ह्या भावसर-गमच्या गाण्याची अफलातून चाल त्यानी अवघ्या एका तासात तयार केली! इतकंच काय, एकेका दिवसात सहा सहा गाण्याना चाली लावल्या. ती गाणी आमच्या स्टुडिओत ते बसवीत असताना ते दिवस-दिवस तद्रीत असायचे. आम्हाला हेवा वाटायचा. कैकदा दुपारी फराळाच्या टेबलावर त्यांनी आम्हाला फैय्याझ-खांसाहेबाचे किस्से भक्तिभावपूर्वक सुनवले आहेत. ह्या तद्रीतून निर्माण झालेल्या स्वरलहरीनी त्यांची किर्ती केली. मग वाटा उजळल्या. आकाशवाणी सोडली. दरम्यान लताबाईंनी माया केली. आता एच. एम. व्ही. त मराठी विभागाचे ध्वनिमुद्रणाधिकारी म्हणून कारकीर्द गाजवीत आहेत. मध्यतरी जबरी दुखणी आली. जीवावरचं बोटावर निभावल. पण एकूण ससारयात्रा मधुर झाली. आता पूर्णपणे संसारी झालेले खळे कागदावरले कवीचे सुके शब्द रसिक श्रोत्याचे हृदयीचे जीवलग कसे होतील त्याच्या दिशा चाचपीत आहेत. नवीन नवीन कलावताना वाव देत आहेत. म्हणून परवा जमलेल्या समस्त मडळीच्या हृदयात एकच इच्छा पालवत होती: श्रीनिवास खळे ह्या खूप खूप भोगलेल्या प्रसन्न आणि दानत शुद्ध असलेल्या सज्जन कलावताच्या ओंजळीत त्याच्या विद्येचे चादणे फुलत राहो; कारण, अखेर त्यातलेच थेंब आमच्या अंगावर पडून आमची आयुष्यं सुसह्य व्हायची आहेत! ◻

— रवींद्र पिंगे

अनपेक्षित
निकालाने
गाजलेली

# ब्रिटनची निवडणूक

वा. दा. रानडे

मतपेटी कित्येकदा जादूच्या पोतडीप्रमाणे चमत्कार करते याचा अनुभव नुकत्याच झालेल्या ब्रिटिश निवडणुकांनी पुन्हा एकदा दिला. मजूर पक्ष निश्चित विजयी होणार असे अंदाज निरनिराळ्या वृत्तपत्रांच्या लोकमत चाचण्यांनी मतदानाच्या अगदी आदल्या दिवसापर्यंत वर्तविले होते; पण मतदारांनी ते सर्व अंदाज खोटे ठरवून श्री. एडवर्ड हीथ यांच्या नेतृत्वाखालील हुजूर (कॉन्झर्वेटिव्ह) पक्षाला निर्णायक बहुमताने निवडून देऊन त्यांच्या हाती सत्तेची सूत्रे सोपविली. हा चमत्कार कसा घडला ? हुजूर पक्ष कोणत्या कारणांमुळे विजयी झाला ? मजूर पक्षाच्या वाट्याला असा अनपेक्षित पराभव का आला ? हुजूरांच्या विजयाचे परिणाम ब्रिटनच्या अंतर्गत व परराष्ट्र धोरणावर आणि विशेषत: भारतीय सबंधांवर काय होतील या प्रश्नांच्या संदर्भात ब्रिटिश निवडणूक निकालांचे केलेले हे विश्लेषण.

हुजूर पक्षाच्या विजयाची कारणे अनेक आहेत. त्यातील सर्वांत महत्त्वाचे कारण आर्थिक आघाडीवरील विल्सन सरकारचे अपयश. देण्याघेण्याच्या व्यवहारातील परिस्थिती यावर्षी प्रथमच सुधारली एवढी एकच आर्थिक दृष्टीने समाधानकारक घटना होती, पण

एकंदर अर्थव्यवस्थेत त्याचे महत्त्व फार थोडे होते. मजूर सरकार चलनवाढ व भाववाढ रोखण्यास असमर्थ ठरले. दर वर्षास ३·८ टक्के या प्रमाणात किंमती वाढत गेल्या. हुजूर सरकार अधिकारावर असताना १९६० ते १९६४ च्या दरम्यान ही वाढ २·५ टक्के होती.

## आर्थिक आघाडीवर अपयश

पौंडाची किंमत हुंडणावळीच्या अधिकृत दरापेक्षा प्रत्यक्षात आणखी घसरू लागली. निवडणुकीपूर्वी ही किंमत पौंडाला १५ शिलिंग ४ पेन्सपर्यंत खाली आली होती. ॲटली सरकारच्या काळात एकदा व विल्सन सरकारच्या काळात दुसऱ्यांदा असे पौंडाचे दोनदा अवमूल्यन मजूर पक्षाच्या राजवटीत झाले. "मजूर पक्ष म्हणजे अवमूल्यन करणारा पक्ष. त्यांच्या राजवटीत पौंडाचे दोनदा अवमूल्यन झाले. त्यांना पुन्हा निवडून दिलेत तर तिसऱ्यांदा अवमूल्यन होईल." असा प्रचार हुजूर पक्षाचे नेते हीथ यांनी केला होता. पौंडाची किंमत १५ शिलिंगापर्यंत घसरलीच आहे ती आणखी दहा शिलिंगापर्यंत खाली घसरेल असेही चित्र आपल्या भाषणातून त्यांनी रंगविले होते. त्याचा परिणाम मतदारावर झाल्याची कबुली मजूर पक्षाच्या नेत्यांनीही दिली आहे.

आर्थिक आघाडीवरील अपयशाचे आणखी एक मोठे गमक म्हणजे वाढती बेकारी. बेकारांची संख्या पाच लाखावर गेली. हा आकडा गेल्या तीस वर्षात सर्वात जास्त होता. मतदाराचा कल मजूर पक्षाविरुद्ध जाण्याचे हेही एक महत्त्वाचे कारण होते.

मजूर पक्षाचे सरकार हुजूरांपेक्षा अधिक वेगाने आर्थिक प्रगती करील अशी अपेक्षा होती, पण झाले उलटच. हुजूर राजवटीच्या शेवटच्या चार वर्षात विकासाचा वेग वर्षाला २·९ टक्के होता. मजूर राजवटीत १९६४ ते १९६६ या काळात तो वर्षाला २·३ टक्केपर्यंत खाली आला. नतरच्या चार वर्षात हा वेग थोडा वाढला, पण २·९ पेक्षा हे प्रमाण कमीच होते. 'ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक कोऑपरेशन अँड डेव्हलपमेंट' या संस्थेने आपल्या २२ सभासद राष्ट्रांच्या आर्थिक विकासाच्या वेगाची पाहणी केली. त्यात लुक्झाबूर सोडून बाकी सर्व राष्ट्राचा विकासाचा वेग ब्रिटनपेक्षा जास्त असल्याचे दिसून आले. ब्रिटनमध्ये विल्सन राजवटीत मोटारी व जहाजाचे उत्पादन घटले. सूत उत्पादनही कमी झाले. घर बांधणीचा वेग मंदावला.

विल्सन राजवटीत जादा कराचा बोजा वर्षाला ३०० कोट पौंडापर्यंत वाढला. हुजूर राजवटीत कराचे प्रमाण वर्षाला २०० कोट पौंडानी कमी करण्यात आले होते. अधिकारावर आल्यावर आम्ही कर कमी करू असे आश्वासन हुजूर पक्षाचे नेते हीथ यानी दिले होते.

उत्पादन वाढ, वेतनवाढ आणि भाववाढ याचा योग्य मेळ राखण्यात मजूर सरकारला यश आले नाही. मजूर राजवटीच्या पहिल्या पाच वर्षात उत्पादन फक्त

१० टक्यांनी वाढले पण वेतनवाढ ३५ टक्के आणि भाववाढ २३ टक्के झाली.

कॉमनवेल्थ राष्ट्राशी ब्रिटनची निर्यात कमी होण्यास हुजूर राजवटीपासूनच सुरुवात झाली होती. त्या राजवटीत हा व्यापार ४४ टक्क्यावरून ३० टक्क्यांपर्यंत खाली आला होता. तो वाढविण्याचे आश्वासन मजूर पक्षाने अधिकारावर येताच दिले होते, पण प्रत्यक्षात हा व्यापार वाढण्याऐवजी २२ टक्क्यांपर्यंत घसरला.

रहाणीमानात वर्षाला पाच टक्के वाढ करण्याचे आश्वासनही मजूर सरकार पाळू शकले नाही. रहाणीमानात वाढ वर्षाला फक्त दीड टक्का झाली.

याचा अर्थ आर्थिक आघाडीवर मजूर सरकारने काहीच कार्य केले नाही असा नाही. पोलाद उद्योगाचे राष्ट्रीयीकरण, तांत्रिक विकासासाठी स्वतंत्र खाते, मक्तेदारी प्रतिबंधक मंडळाच्या अधिकारात वाढ, राष्ट्रीय आरोग्य योजनेवरील खर्चाच्या प्रमाणात वाढ याचा उल्लेख मजूर सरकारच्या बाजूने करता येईल; पण यशापेक्षा अपयशच अधिक डोळ्यात भरणारे आहे.

## अमेरिकन तंत्राचा अवलंब

मजूरपक्षाच्या निवडणूक यंत्रणेपेक्षा अधिक कार्यक्षम यंत्रणा हुजूर पक्षाने उभारली होती. अमेरिकन अध्यक्षीय निवडणुकीतील उमेदवाराप्रमाणे हुजूर पक्षाचे नेते एडवर्ड हीथ यांनी रोज विमानाने देशाच्या निरनिराळ्या भागात संचार केला. आपल्या कारभारातही खर्चावरील नियंत्रणाच्या अमेरिकन पद्धती ते आणणार आहेत. सरकारी कारखान्याचा या दृष्टीने अभ्यास करण्यासाठी हुजूर पक्षाने एक संशोधन विभाग उघडलेला असून तरुण अर्थशास्त्रज्ञ मार्क इरेबट त्याचे प्रमुख आहेत. खर्चावरील नियंत्रणाच्या अमेरिका व कानडाच्या पद्धती ब्रिटनमध्ये आणण्यावर त्याचा भर आहे.

निवडणुकीची पद्धतशीर तयारी हुजूर पक्षाने एक वर्ष आधीपासून सुरू केली होती. ज्या ६७ मतदार संघात मजूर पक्षाचे उमेदवार अगदी थोड्या मतांनी निवडून आले होते तेथे लक्ष केंद्रित करून त्या जागा जिंकण्यावर हुजूर पक्षाचा भर होता. वर्षापूर्वी या प्रत्येक मतदार संघातील मतदाराच्या कलाची चाचणी-पाहणी या पक्षाने केली, व त्यासाठी ३५ हजार पौंड खर्च केला. या मतदारसंघातील मतदारांना कोणते प्रश्न अधिक महत्त्वाचे वाटतात याची ही पाहणी होती.

निवडणुकीच्या आधी पंधरा दिवस मतदारांच्या कलाची चाचणी रोज घेतली जात होती. कित्येकदा तर रोज दोन तीन चाचण्या होत. मतदारावर कोणत्या प्रश्नाचा विशेष प्रभाव पडत आहे हे अजमावणे, तसेच टेलिव्हिजनचा कितपत परिणाम होतो हे अजमावणे हा या चाचण्याचा उद्देश असे.

आर्थिक पेचप्रसंगासंबंधी आपल्या प्रचाराचा मतदारावर प्रभाव पडत आहे व त्यावरच शेवटच्या आठवड्यात भर द्यावयाचा हा निर्णय हुजूर पक्षाने अशा चाचणी-पाहणीतूनच घेतला. यासंबंधीचे पुढील दोन प्रश्न मतदारांना एक

आठवड्याच्या अंतराने दोनदा विचारण्यात आले.

१ : देशास आर्थिक पेचप्रसंगाला तोंड द्यावे लागेल असे हुजूर पक्ष म्हणतो. मजूरपक्ष तसे म्हणत नाही. तुम्हाला या पैकी कोणाचे म्हणणे बरोबर वाटते ?

या प्रश्नास निवडणुकीपूर्वीच्या दोन आठवड्यात हुजूर पक्षाच्या बाजून अनुक्रमे ४४ टके व ४९ टक्के आणि मजूर पक्षाच्या बाजूने ३५ टक्के व २५ टक्के अशी मते मिळाली.

२ : आर्थिक पेचप्रसगाला तोड देण्यासाठी अधिकारावर कोणता पक्ष असावा असे तुम्हाला वाटते ? हुजूर की मजूर ?

या प्रश्नास दोन आठवड्यात हुजूर पक्षाच्या बाजूने अनुक्रमे ३९ टक्के व ४५ टक्के आणि मजूर पक्षाच्या बाजूने ४४ टक्के व ४१ टक्के अशी मते मिळाली.

मतदारांचा कल हुजूर पक्षाकडेच झुकला असल्याचे या चाचणीवरून स्पष्ट झाले होते.

भाववाढीची झळ महिलाना अधिक जाणवते. त्याना सहज समजेल अशा पद्धतीने हा प्रश्न त्याच्यापुढे माडून आवाहन केले तर त्याची मते आपणास मिळतील असा कयास हुजूर पक्षाच्या नेत्यांनी बाधला व तो अचूक ठरला. महिलाना आवाहन करण्याची ही कल्पना हुजूर नेत्यांना 'यग अँड रुपर्ट' या अमेरिकन जाहिरात कपनीत काम करणाऱ्या जॉफ्रे टकर या ब्रिटिश मानसशास्त्रज्ञाने सुचविली. हुजूर पक्षाच्या विजयात महिलाच्या मताचा मोठा वाटा आहे यात शका नाही.

## तीन लाख पौंड जाहिरातींसाठी

निवडणूक प्रचाराच्या जाहिरातीवर हुजूर पक्षाने सात महिन्यात तीन लाख पौडापेक्षा अधिक खर्च केला. मजूर पक्षाने मतदारांना दिलेली आश्वासने केराच्या टोपलीत टाकल्याची पानभर मोठी जाहिरात सर्व प्रमुख वृत्तपत्रातून येत होती. मजूर पक्षाचे जाहिरातीवरील खर्चाचे प्रमाण हुजूरांच्या निम्मे होते.

हुजूर पक्षाचे नेते एडवर्ड हीथ यांनी या निवडणुकीत मिळविलेला विजय अनेक दृष्टीनी वैशिष्टयपूर्ण आहे हुजूर पक्षाच्या विजयात त्यांच्या कर्तृत्वाचा वाटा सर्वात मोठा आहे. ब्रिटनमध्ये आशिया-आफ्रिकेतील गौरेतरांनी स्थायिक होण्यावर कडक निर्बंध घालावेत असा प्रचार करून व निवडणुकीत काळा-गोरा वाद आणून इनॉक-पॉवेल यांनी मजूरपक्षीयांची बरीच मते हुजूर पक्षाला मिळवून दिली हे खरे; पण केवळ पॉवेल याच्या प्रचारावर हुजूर पक्ष निवडणूक जिंकू शकला नसता. आर्थिक प्रश्नावर भर देऊन हीथ यांनी केलेल्या जोरदार प्रचारामुळेच हुजूर पक्षास निर्णायक विजय मिळू शकला.

हीथ यानी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत धीमेपणाने निवडणूक लढविली व जिंकली. विल्सनसारख्या लोकप्रिय, नाटकी, निवडणूक डावपेचात अत्यंत तरबेज अशा नेत्याशी त्यांना सामना द्यावयाचा होता. विल्सन यांनी कितीही चुका केल्या

तरी पक्षाच्या ८० टक्के सभासदांचा त्यांना पाठिंबा असे, तर हीथ यांच्यात कितीही गुण असले तरी पक्षाच्या ५० टक्के सभासदांचाच हुकमी पाठिंबा त्यांच्या मागे होता. मजूर सरकारने फारसे काही भरीव कार्य केलेले नाही याची जाणीव विल्सन यांना होती, पण आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावावर आपण निवडणूक जिंकू असा आत्मविश्वास त्यांना वाटत होता. म्हणून या निवडणुकीला विल्सन विरुद्ध हीथ असे दोन नेत्यांतील लढतीचे स्वरूप त्यांनी दिले होते. पण केवळ व्यक्तिमत्त्वावर निवडणूक जिंकता येत नाही हा अनुभव या निवडणुकीने त्यांना दिला.

निरनिराळ्या मतदान चाचण्यांचे निष्कर्ष मजूर पक्षास अनुकूल व हुजूर पक्षास प्रतिकूल होते. मजूर पक्षच पुन: सत्ताधारी होणार असे वातावरण या चाचण्यांनी देशात तयार केले होते. पण हीथ यांनी धीर न सोडता प्रचार मोहीम चालू ठेवली.

धीर सोडायला लावणाऱ्या प्रसंगापैकी एक प्रसंग : मँचेस्टर येथे एका सभेत भाषण करून हीथ मिडलँड हॉटेलात आले होते. बी. बी. सी. टेलिव्हिजनचे डेव्हिड सेल्स त्यांना तेथे भेटले. ते म्हणाले. "नॅशनल ओपिनिअन पोलने आपल्या चाचणीचे निष्कर्ष आताच जाहीर केले त्यात मजूर पक्षास १२·४ टक्के मतांची आघाडी आहे.

हीथ – आमच्याविरुद्ध ?

सेल्स – होय. तुमच्याविरुद्ध.

हीथ यांच्या डोळ्यात एक क्षणभरच अश्रू आलेले दिसले, पण ते त्यांनी लागलीच आवरले. निराशा झटकून टाकून ते पुन: कामास लागले.

हीथ आपल्या बेक्सले मतदार संघात १९६६ पेक्षा चौपट मते जास्त मिळवून निवडून आले खरे, पण या निवडणुकीतही नाट्यपूर्ण व चिंता निर्माण करणारी परिस्थिती उद्भवली होती. हीथ नावाचाच दुसरा एक उमेदवार या मतदार संघात उभा होता. त्याचे खरे नाव एडवर्ड जेम्स रॉबर्ट लँबर्ट. पण हीथ या नावाने त्याने उमेदवारीचा अर्ज भरला होता. दोन हीथमुळे घोटाळा होऊन एडवर्ड हीथ याची मते वाया जाण्याचा धोका दिसू लागला. पण हुजूर कार्यकर्त्यांच्या संघटनाकौशल्यामुळे एक हजारापेक्षा अधिक मते वाया गेली नाहीत. आठ दिवसात १,२८,००० पत्रके वाटून त्यांनी तोतया हीथपासून सावध रहा असा प्रचार केला, व आपल्या नेत्यास निवडून आणले.

## कमी मतदानामुळे पराभव

निवडणूक हुजूर पक्षाने जिंकली म्हणण्यापेक्षा मजूर पक्षाने गमावली म्हणणे अधिक बरोबर होईल. निवडणुकीच्या अगदी आदल्या दिवसापर्यंत निरनिराळ्या चाचणी मतदानाचे निष्कर्ष मजूर पक्षाला अनुकूल होते. विजयाबद्दलच्या फाजील आत्मविश्वासाने त्या पक्षाचे नेते, कार्यकर्ते व सर्वसामान्य सभासदही काहीसे गाफील राहिले. आपल्या पक्षाच्या सभासदांना जास्तीत जास्त सख्येने मतदानास

आणण्याकडे त्यांनी लक्ष दिले नाही. या निवडणुकीत ७१·५ टक्के मतदान झाले. ब्रिटनमधील १९३५ नंतरच्या सर्व निवडणुकात हे सर्वात कमी मतदान आहे. घरी बसलेल्या मतदारात मोठी संख्या मजूरपक्षीयांची होती. कमी मतदान हे मजूर पक्षाच्या पराभवाचे एक महत्त्वाचे कारण आहे.

निवडणुकीत ४·७ टक्के मते हुजूर पक्षाकडे झुकली. अधिकारारूढ पक्षाकडून विरोधी पक्षाकडें एवढ्या मोठ्या प्रमाणावर मतदारांची मते झुकण्याची १९४५ नतर ही पहिलीच वेळ होती. हुजुरांची मते ४·६ टक्क्यांनी वाढली तर मजुरांची मते ४·९ टक्क्यांनी घटली. ग्रामीण भागात ४·९ टक्के, शहर भागात ४·४ टक्के व बेकारी मोठ्या प्रमाणात असलेल्या भागात ४·१ टक्के मते हुजूर पक्षाकडे झुकली. हुजूर पक्षास ४६·४ टक्के, मजूर पक्षास ४३ टक्के, लिबरल पक्षास ७·४ टक्के, व इतर उमेदवारांना ३·२ टक्के मते मिळाली. जागांची विभागणी पुढील-प्रमाणे झाली. हुजूर ३३०, मजूर २८८, लिबरल ६, इतर ६, एकूण ६३०. अनामत रकमा जप्त होण्यात लिबरल पक्षाचा पहिला क्रम आहे. पक्षवार आकडे पुढील-प्रमाणेः मजूर ९०० पौंड, हुजूर १६५० पौंड, लिबरल २७,३०० पौंड, कम्युनिस्ट ८७५० पौंड.

## दोन्ही पक्षांमध्ये फरक थोडा

हुजूर पक्ष आणि मजूर पक्ष यांच्या धोरणात व कार्यक्रमात फारसा फरक राहिलेला नाही. मजूर पक्ष स्वतःला समाजवादी म्हणत असला तरी जहाल समाज-वादी कार्यक्रमापासून तो बराच दूर गेलेला आहे. बदरांच्या राष्ट्रीयीकरणाशिवाय राष्ट्रीयीकरणाचा कोणताही कार्यक्रम पक्षाच्या जाहीरनाम्यात नव्हता. सपत्ती-कर बसविण्याची सूचना पक्षातील डाव्या गटाने केली होती पण जाहीरनाम्यातून ती वगळण्यात आली. दोन्ही पक्षांमध्ये विशेष फरक नाही. पण बदल म्हणून दोन निवडणुकांपेक्षा अधिक काल कोणत्याही पक्षास अधिकारावर ठेवावयाचे नाही असे ब्रिटिश मतदारांनी सर्वसाधारणपणे ठरविलेले दिसते. युद्धोत्तर काळात मजूर पक्ष सलग दोन निवडणुकापेक्षा अधिक काळ अधिकारावर राहिलेला नाही.

हुजूर पक्ष यापूर्वी १९५१ ते १९६४ अशी तेरा वर्षे अधिकारावर होता. तीन निवडणुका या पक्षाने लागोपाठ जिंकल्या. आता ह्याच पक्ष युद्धपूर्वकाला-प्रमाणे दीर्घकाल अधिकारावर राहणार काय असे वाटू लागले होते. एवढ्यात मतदारांनी १९६४ च्या निवडणुकात मजूर पक्षास निवडून आणले. त्यानंतर मजूर पक्षही लागोपाठ तिसरी निवडणूक जिंकून दीर्घकाल अधिकारावर राहणार काय असे यंदा दिसू लागले. तोच मतदारांनी त्याला सत्तेवरून खाली खेचले.

दोन पक्षांच्या कार्यक्रमात विशेष फरक नसला तरी हुजूरपक्ष अधिकारावर आल्याने काही थोडे बदल जाणवतील. कर कमी करण्याचे आश्वासन हुजूर नेत्यानी दिले आहे. त्याची थोडीफार अमलबजावणी त्यांना करावीच लागेल. तसे

करताना सामाजिक हिताच्या योजनावरील खर्चास कात्री लागण्याचा संभव आहे. गौरेतरांच्या प्रवेशावर अधिक कडक निर्बंध घातले जाण्याची शक्यता आहे ब्रिटन-मधील भारतीयांच्या दृष्टीने हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

अतर्गत धोरणापेक्षा परराष्ट्र-धोरणातील काही बदल अधिक महत्त्वाचे ठरतील. युरोपच्या सामायिक बाजारपेठेत प्रवेश करण्याचा ब्रिटन प्रयत्न करील. दक्षिण आफ्रिका, ऱ्होडेशिया या वर्णद्वेष्टचा गोऱ्या राजवटीशी हीथ सरकारचे संबंध सुधारतील. ऱ्होडेशियाची आर्थिक नाकेबंदी सैल केली जाण्याचा सभव आहे, पण यामुळे आफ्रिकन राष्ट्रात ब्रिटनबद्दल प्रतिकूल लोकमत निर्माण होईल. सिंगापूर-मधील लष्करी तळ व लष्कर १९७१ नतर काढून घेण्याचे धोरण मजूर सरकारने आखले होते. ते फिरवून तेथे लष्करी तळ ठेवण्याचे हीथ सरकारचे धोरण आहे. बडे राष्ट्र म्हणून जागतिक राजकारणातील आपले स्थान ब्रिटनने केव्हाच गमावले आहे; पण सध्याच्या आर्थिक परिस्थितीत यासाठी येणारा खर्च ब्रिटनला कितपत झेपेल याची शका आहे.

यंदाच्या निवडणुकीत मजूर पक्ष विजयी होणार व पूर्वीचेच धोरण पुढे चालू राहणार असे राजकीय निरीक्षक गृहीत धरून चालले होते. त्याप्रमाणे निकाल लागला असता तर या निवडणुकीकडे फारसे कोणाचे लक्षही गेले नसते. पण मत-दारांनी अनपेक्षित धक्का देऊन हुजूर पक्षाला निवडून आणल्याने ही निवडणूक गाजली व तिने जगाचे लक्ष वेधून घेतले एवढेच. या पलीकडे या निवडणुकीस जागतिक राजकारणाच्या दृष्टीने विशेष महत्त्व नाही.

□ □ □

## ब्रिटनमधील आठ निवडणुका

| | शेकडा | शेकडा मते | | जागा | |
|---|---|---|---|---|---|
| वर्ष | मतदान | हुजूर | मजूर | हुजूर | मजूर |
| १९४५ | ७३·३ | ३९·८ | ४८·३ | २१३ | ३९३ |
| १९५० | ८४·० | ४३·५ | ४६·१ | २९८ | ३१५ |
| १९५१ | ८२·५ | ४८·० | ४८·८ | ३२१ | २९५ |
| १९५५ | ७६·८ | ४९·७ | ४६·४ | ३४५ | २७७ |
| १९५९ | ७८·७ | ४९·४ | ४३·८ | ३६५ | २५८ |
| १९६४ | ७७·१ | ४३·४ | ४४·१ | ३०४ | ३१७ |
| १९६६ | ७५·८ | ४१·९ | ४७·९ | २५३ | ३६३ |
| १९७० | ७१·५ | ४६·४ | ४३·० | ३३० | २८८ |

मूलतः बाईंनी निजलिंगप्पा–मोरारजी गटावर हल्ले चढवले, त्या तरुण तुर्कीपैकी श्री. मोहन धारिया किंवा चद्रशेखर आदि पूर्वाश्रमीच्या प्रसोपावाल्यांना मंत्रि-मडळापासून कटाक्षान दूर ठेवण्यात आलं आहे. तर पूर्वाश्रमीचे कम्युनिस्ट म्हणून गाजलेल्यापैकी श्रीमती नदिनी सत्पती ह्यांना बढती मिळाली आहे. आणि श्री. गणेश ह्याना मत्रिपद बहाल केलं गेलं आहे ! ह्यातन काय अर्थ निघावेत हे सागा-वयाची आवश्यकता मला तरी वाटत नाही.

# त्रिवेंद्रम -- अच्युत धक्का !

दिल्लीत श्रीमती गांधी मंत्रिमंडळात उलथापालथ करत असताना केरळात पेच-प्रसग उभा रहात होता. वास्तविक केरळीय मंत्रिमंडळातला पेचप्रसग तसा जुना आहे. पण नक्षलवादी आणि जातीय दगली ह्यामुळे केरळातल्या घटनाना फारशी प्रसिद्धी मिळाली नाही. मिळाली तेव्हाही त्यांची दखल घेतली नाही. आणि तिथे पेचप्रसग निर्माण झाला असला तरी, तो ताटातुटीपर्यंत पोचला असावा अशीही कुणाची कल्पना नव्हती. परतु, परवा जेव्हा केरळचे मुख्यमत्री श्री. अच्युत मेनन ह्यांनी विधानसभा बरखास्त करून मध्यावधी निवडणुकाची सूचना माडली आणि त्या सूचनेचा राज्यपालांनी स्वीकार केला, तेव्हा मात्र केरळला, देशालाही धक्काच बसला असणार ! विशेष म्हणजे विधानसभा बरखास्त होण्यापूर्वी काही तासच अगोदर केरळ मत्रिमडळाची बैठक भरली असूनही श्री. मेनन ह्यांच्या निर्णयाचा त्यांच्या निकट सहकाऱ्यानाही थांगपत्ता नव्हता. श्री. मेनन ह्यांनी हा धक्का देताना एक नवा पायंडाही पाडला आहे. बहुधा एखाद्या मंत्रिमंडळाच विधान-सभेतलं बहुमत कमी झाल्यास ते मत्रिमंडळ राजीनामा देत. पर्यायी मंत्रिमडळ बनवल जाऊ शकेल का ह्याची राज्यपाल चाचपणी करतात. आवश्यक वाटल्यास राष्ट्रपति-राजवट लादली जाते. परतु हे नेहमीचे सकेत केरळात धुडकावून लावले गेले आहेत. मंत्रिमडळ अल्पमतात गेल्यानंतर मुख्यमंत्र्यानी विधानसभा बरखास्त करून टाकली आहे. वास्तविक लोकप्रतिनिधीची विधानसभा बरखास्त झाल्यावर मत्रिमडळ अस्तित्वात राहण्याचा प्रश्न उद्‌भवतच नाही. परतु केरळात मात्र श्री. अच्युत मेनन ह्यांचं मत्रिमडळ ' काळजीवाहू ' सरकार म्हणून अधिकारात राहणार आहे. श्री. मेनन ह्यांनी हा नवा पायडा पाडला आहे. घटनेच्या व लोकशाही मूल्यांच्या चौकटीत तो कसा बसतो हा कदाचित चर्चेचा विषय ठरेल. तशी चर्चा सुरूही झाली आहे. परंतु ह्या निर्णयामागचं राजकीय उद्दिष्ट मात्र स्पष्ट आहे. मध्यावधी निवडणुकापूर्वी स्वपक्षाचं बस्तान बसविण्यासाठी, शासनावर असल्याने जे फायदे मिळतात ते उपटण !

केरळ हे राजकीयदृष्टया देशातलं एक अत्यंत अस्थिर राज्य! प्रथमपासूनच इथे विविध सरकार उभी राहिली-कम्युनिस्ट, काँग्रेस, आघाडी, वगैरे सर्व प्रकारची शासन केरळीय जनतेनं पाहिली आहेत. विशेष म्हणजे कुठल्याच सरकारला संपूर्ण पाच वर्षे केरळमध्ये टिकून राहता आलं नाही. ह्याच सगळयात महत्त्वाच कारण म्हणजे केरळातली सुशिक्षितता आणि अफाट दारिद्रय! त्यामुळे केरळात डाव्याचा जोर जास्त. उजव्यानाही डाव्याची धोरण उचलूनच तिथे चालावं लागत. त्यातच छोटया छोटया चिल्लर पक्षांची तिथे भाऊगर्दी उडाली आहे. ह्या साऱ्याची स्पष्ट परिणती म्हणजे केरळातली सततची राजकीय अस्थिरता! १९६७ नंतर अधिकारावर आलेलं नंबुद्रिपाद मंत्रिमडळ असंच गडगडलं. नंतरच श्री. अच्युत मेनन ह्याचं सरकार मुळातच अल्पमतातलं. काँग्रेसवाल्यांनी त्याना बाहेर पाठिबा दिला. त्या कुबडयांच्या आधारावर हे सरकार कसंबसं आठ महिने उभं राहिलं. ह्या सबध आठ महिन्यात कूळ कायदा, कमाल जमीन धारणेची मर्यादा वगैरेंसारख्या काही चागल्या गोष्टी करूनही हे सरकार स्थिर कधीच नव्हतं! त्यातच समाजवाद्यांनी गोधळ घातला. 'समाजवाद्यानी' म्हणताना मला प्रसोपा, ससोपा, इसोपा वगैरे वगैरे सारेच समाजवादी अभिप्रेत आहेत. ह्या मंडळीचं सारच राजकारण चमत्कारिक असतं. घटकेत ते समाजवादी ऐक्याच्या गोष्टी उच्चरवाने बोलू लागतात, तर दुसऱ्याच क्षणाला एकमेकांचा पाडाव करण्यासाठी कम्युनिस्ट, काँग्रेस ह्यांच्याकडे धाव घेतात. हे लोक केव्हा कुणाशी युती करतील, केव्हा ती युती मोडून टाकतील, केव्हा त्याच कम्युनिस्ट प्रेम उतू जाईल किंवा केव्हा त्याचा कम्युनिस्टाविषयीचा आत्यतिक तिटकारा प्रगट होईल-कशाचाच काही नियम नाही. केरळात ह्याच मडळीनी गेल्या काही दिवसात प्रसोपा-केरळ सोशॅलिस्ट्स्-इंडियन सोशॅलिस्ट्स्-संसोपा ह्या रिंगणात अशा काही अफलातून कोलांटचा उड्या मारल्या की मुख्यमंत्री मेननना काहीच कळेनासं झालं. समाजवाद्यांची आपसातली ही भांडणं जेव्हा त्याच्या कह्याबाहेर जाऊ लागली तेव्हा त्यानी सरळ काढता पाय घेतला; आणि विधानसभाच बरखास्त करून भाडणाऱ्याना चपराक ठेवून दिली. जगाला धक्का दिला.

हे दोन धक्के देशाला बसत असतानाच, बिहारातल्या प्रसोपातली दुफळी (ससोपात आधीच आहे,) जनसघाची पजाब मत्रिमडळातून माघार, उ. प्रदेश व बिहार विधानसभांची अभूतपूर्व गोंधळातली बेमुदत तहकुबी, वगैरे अनेक धक्केही देशाला ह्याच वेळी अनुभवावे लागले. एकीकडे राष्ट्रीय सकटाची जाणीव काही नेते जनतेला करून देत असतानाच, राजकीय अस्थिरतेचे हे धक्के देशाला बसत आहेत. ह्यात अराजकाची भीती आहे. लोकशाही विचारसरणीलाही धोका आहे. ह्याचा विचार देशातल्या प्रमुख पक्षाच्या नेत्यानी वेळीच केला पाहिजे. लोकशाही आघाडचा उभ्या राहिल्या पाहिजेत आणि 'सरकारे पाडण्याचे चाळे' बद झाले पाहिजेत!

◻ ७ ◻

 पृष्ठ ८ वरून

लोकांना ते आवडले आहेत. (गंभीर मुद्रेनेच) माझ्याही नाटकांचे अनुवाद इतर काही भाषात झाले आहेत. कोणाला लोकांच्या मनातून उतरवायचे असेल तर त्याच्या कलाकृतीचा अनुवाद करावा, असे मी आपला समजत होतो. पण बादलबाबूची नाटके याला अपवाद ठरली आहेत. त्यानी त्यांना नाव मिळवून दिले आहे. नाटककार म्हणून त्याचे स्थान आज फार महत्त्वाचे आहे त्यांची खूप प्रशंसा होते, सन्मानही त्यांना प्राप्त झाला आहे आणि त्यांच्यावर टीकाही होत आली आहे. थोडक्यात, कोणाही नाटककाराने हेवा करावा असे त्यांचे स्थान आहे. आज ते इथे आपल्यात आले आहेत हे आपले भाग्य. मुंबईच्या भावी विकासाचा विचार करण्यासाठी त्यांना सेमिनारच्या संयोजकांनी बोलावले. एक नाटककार यासाठी बोलावण्यात येतो हे प्रथमच घडत आहे. भावी मुंबईत काही आदर्श प्रायोगिक नाट्यगृहे कशी बांधता येतील ते बादलबाबूनी पहावे अशी आमची त्यांना सूचना आहे. आजच्या या निमित्ताने, कलकत्त्यातल्या प्रायोगिक रंगभूमीच्या परिस्थितीविषयी त्यानी आम्हाला काही सांगितले तर बरे होईल. बादलबाबू, तुम्ही कलकत्त्यात तुमची नाटके तुमच्या स्वतःच्याच संस्थेतर्फे बसवून सादर करता, तुमचे अनुभव काय आहेत ?

आता सर्व नजरा पु. लं. शेजारच्या आटीव कुडीच्या गोऱ्या, टक्कलवाल्या, टोकदार नाकाच्या त्या माणसाकडे वळल्या. एकदम पाहिले तर वाटत होते की हा रोज बसच्या रांगेत इमानाने जाऊन उभा राहणारा आणि संधी मिळाल्यास मध्ये घुसणारा प्रातिनिधिक मध्यमवर्गीय आहे. दांडग्या माणसांमधून अल्लद वाट काढण्याइतका छोटा आणि दोन पिंगट डोळ्यातच काय ती आपल्या अफाट विवटपणाची खूण वागवणारा.

ते अलीशान दालन, वरचे छताला लटकलेले ते भले थोरले काचेरी झुबर, भिंतीपासची प्रचंड रंगीबेरंगी लाल हिरवी सोनेरी अलमारी, मागली उंच रुंद खिडकी, नि तिचे उंची उंची देखणे पडदे यात मधोमध एका मोठ्या कोचात बसलेला हा अगदीच साधा बगडा नि छोटा माणूस आणखीच छोटा नि मजेशीर वाटत होता. इतके कशाला, भोवतालच्या वजनदार घोळक्यातदेखील त्याचे छोटेपण फार उठून दिसत होते. असे वाटत होते की गलिव्हर्सच्या सभेत चुकार लिलिपुटीयन आणून बसवला आहे.

पिंगट डोळ्यातले चिवट गांभीर्य जरा अधिक गडद झाले. हाती सिगरेट जळत होती तिची राख पुढ्यातल्या रक्षापात्रात एकदोनदा झाडून बंगालचे आणि भारताचे आजचे एक प्रमुख नाटककार बादल सरकार बोलू लागले. आपण कलकत्त्यात नाटके कशी करतो ते सांगू लागले. त्यात विलक्षण तटस्थता होती

ाणि एक  कारचे कव्हाच स्वीकारलेले एकाकीपण होते. तरीही कोठूनही मिळालशास कोणतेही सहकार्य किंवा मदत घेण्याची अबोल तयारी व्यक्त होत होती. बादल सरकार म्हणाले की, कलकत्त्यात आमचा एक ठरलेला नाटकाचा हॉल आहे. इतर कोणी कधीही तिथे नाटके करणे शक्य नाही कारण प्रयोगाच्या दृष्टीने सर्व गैरसोयी त्यात आहेत. पण याच कारणाने आम्ही तिथे नाटके करतो, कारण तो आम्हाला दीडशे रुपयात केव्हाही मिळू शकतो. कलकत्त्यात थिएटर्सची भाडी नऊशेवर आहेत. आमचा एका प्रयोगाचा सगळा खर्च मिळून साडेचारशे ते पाचशेवर जाऊन चालत नाही. आणि यात प्रयोगागणिक आम्ही दीडदोनशेचा तोटा घेत असतो. आमचा प्रेक्षकवर्गच तेवढा आहे. माझ्या नाटकाचे कलकत्त्यात दोन, फार तर तीन किंवा चार प्रयोग होऊ शकतात. प्रेक्षकांना आवडले तर चार, न आवडले तर दोन. या दारिद्र्यामुळे नेपथ्य, प्रकाशयोजना वगैरेवर आमचा खर्च एकदम बेतशीर चालतो. एका नाटकाच्या नेपथ्यावर सर्व मिळून शंभर ते सव्वाशे रुपये म्हणजे डोक्यावरून पाणी गेले. (श्रोत्यात कोणीतरी म्हणाले दोन तीन हजारांखाली हल्ली मराठी प्रायोगिक नाटकाचाही सेट बनत नाही !) शिवाय आमच्या हॉलचा रंगमंच असा आहे की त्यावर महागडा तर काय पण नाटकाचा नेहमीचा बॉक्स सेट देखील नीट बसणार ना ी. त्यामुळे आपोआपच काटकसर होते. नाटकातल्या पोषाखांवर खर्च केला जात नाही. शिवाय आमच्यात कोणी नामवंत किंवा समर्थ नट नाहीत. आहेत ते अनामिक नाटकवेडे. त्यामुळे सर्वांनी मिळून जे करायचे ते कसून करायचे, जीव ओतून करायचे हे ठरले आहे. तेच आमच्या प्रयोगाचे बळ. व्यावसायिकाची वैभवशाली नाट्यनिर्मिती टाकून असली नाटके पैसे देऊन पाहणारा आमचा अल्पसंख्य प्रेक्षक प्रायोगिक रंगभूमीचा तसाच मोठा चहाता असणार हे उघड आहे; पण या प्रेक्षकाचीही एक मेख आहेच. नाटकात जेवढी पात्रे जास्त तेवढे त्याला ते नाटक अधिक 'नाटक' वाटते. तीन पात्रांचे माझे एक नाटक त्याने तेवढ्यासाठी तडकाफडकी नापास केले. मग मीही नाटकात पात्रे अगदीच कमी नसतील अशी काळजी अभावितपणे घेत असतो. बाकी काही नाही तरी एवढी तडजोड माझ्या प्रेक्षकासाठी जमेल तेव्हा जमेल तशी करतो

कोणी तरी विचारले, फुटपुज्या प्रेक्षकांच्या बेभरवशाच्या आधारावर तुमच्या नाटकाचे भवितव्य हे असे सदाचे टांगून राहणे संपावे, ही कोंडी फुटावी, म्हणून तुम्ही काही केले आहे का ?

बादल सरकार म्हणाले, एकदा एक नोकरी करून मी दहा हजार रुपये गाठी जोडले. असे ठरवून की या भांडवलावर आपल्या नाटकांचा जुगार एकदा नीट करूनच पहायचा. मग मी कलकत्त्यात कांही हॉल्स ठरीव वार घेतले. आणि न चुकता दर शनिवार रविवारी या ना त्या हॉलला माझी नाटके करू लागलो. जाहिरातीवरही

भर दिला. निर्मिती–खर्च चढ केला. प्रथम सभागृहे ओस असत. मग ती जरा भरू लागली. नियमीत आणि वरचेवर प्रयोगांचा आणि जाहिरातीचा परिणाम होऊन आमचा प्रेक्षकवर्ग वाढू लागला. आणि दहा हजारच संपले. प्रयोग अर्थात् बंद झाले. अधिक प्रयोग लावणार कोणत्या आर्थिक बळावर ? प्रेक्षकवर्ग वाढत होता, तो आणखी वाढेल हे दिसत होते, पण तो पुरेसा वाढण्यापूर्वीच माझ्या या योजनेची ही अशी इतिश्री झाली आणि आम्ही जिथे होतो तिथेच पुन्हा येऊन पडलो. खात-बट्ट्यातले आणि दारिद्र्यातले दोन नाहीतर चारच प्रयोग–बस्स. मग नाहीतरी जे अपरिहार्यपणे पत्करावेच लागत होते ते दारिद्र्य आमचे ब्रीद म्हणूनच आम्ही ठरवले आणि उघडउघड दरिद्री पण जीव ओतून केलेले प्रयोग आमच्या मोजक्या प्रेक्षकाला आवर्जून दाखवीत राहिलो. होणारा तोटा सोसत राहिलो. प्रायोगिक नाट्यसंस्थांना अर्थसहाय्य देणारी सरकारे आणि सांस्कृतिक निधी आहेत, हे आम्हांला परवापरवापर्यंत ठावे नव्हते. अशा सधन संस्थांनी कलकत्त्यातल्या आमच्या संस्थेसारख्या छोट्या प्रायोगिक नाट्यसंस्थांना हजार हजारभर रुपये जरी वर्षाला दिले तरी आम्ही चैनीत आमची नाटके करू आणि अशा संस्था तिकडे बऱ्याच आहेत. गुणी माणसे त्या धडपडून चालवताहेत. मोठ्या संस्थांप्रमाणे त्यांचे बाहेर नाव नाही

मागल्या बाजूला उभे राहून हे ऐकणारे मुंबईतल्या इंग्रजी रंगभूमीवरचे फरुख मेहता दाढी कुरवाळीत आवेशाने आपल्या ढाल्या आवाजात यावर म्हणाले, पण या परिस्थितीबद्दल कोणी भावविवश होण्याचे कारण मला तरी दिसत नाही. साऱ्या जगभर प्रायोगिक नाट्यसंस्था अशाच परिस्थितीत चालतात. नवे ते पूर्णांशाने पत्करण्याला माणसे कुठेही तयार नसतात. त्यालाच पाचपंचवीस वर्षे लोटली की आपोआप पत्करले जाते. तेव्हा मी म्हणतो की हे असे चालायचेच !

बादल सरकार नामक टोकदार नाकाचा छोटा माणूस हे ऐकून शांतपणे सिग्रेटची राख झाडीत आपल्या सौम्य स्वरात म्हणाला, हो ना, भावविवश कुणी झालेलेच नाही, मी वस्तुस्थिती–तीदेखील विचारण्यात आली म्हणून–सांगतो आहे. तक्रार नाहीच. आम्ही अशीच नाटके केली, करतो आहे आणि यानंतरदेखील करू...

एव्हाना प्रारंभी मागे खुर्च्या धरून असलेली अनेक नाटकवाली श्रोते मंडळी या छोट्या माणसाचा आणि मोठ्या नाटककाराचा सौम्य तटस्थ आवाज आणि त्यावाटे व्यक्त होणारे निरावेश काठिण्य नीट ऐकण्यासाठी खुर्च्या सोडून भराभर पुढे जाजमावर जाऊन बैठक घेती झाली होती. या विलक्षण निरुपद्रवी आणि तितक्याच चिवट, सावध व्यक्तिमत्त्वात 'एवम इंद्रजित'मधला इंद्रजित आणि लेखक, 'बाकी इतिहास'मधला शरद आणि सीतानाथ, 'वल्लभपूर'मधला भूपती कोठे दिसतो का त्याची मनोमन जणू शोध घेत होती. ते उत्कट काव्यात्म वैफल्य, ती सत्यापासून पळ काढणारी पांढरपेशी थिटी महत्त्वाकांक्षा आणि फास लावून

घेणारी कर्कश बुद्धिनिष्ठा, तो सदा प्रयत्नशील सरंजामशाही आशावाद, यांपैकी कशाचा आढळ कोठे होतो का ते पहात होती. आणि आपल्या पिंगट रोखल्या नजरेने सभोवतालचे हेच सारे टिपीत की काय, लिलिपुटियन चणीचा गलिव्हर बादल सरकार सिग्रेटमागून सिग्रेट ओढीत मधोमध धीटपणे बसला होता.

... बाहेर आलो तेव्हा वाटले की याच्या नाटकांइतकाच हा प्रांजळपणे रोम-रोमात आजचा मध्यमवर्गीय पांढरपेशा आहे. तसाच संवेदनाक्षम आणि व्यवहारी. एकाच वेळी बुद्धिनिष्ठ आणि काव्यात्म. आशावादी आणि वैफल्याचा ध्यास असलेला. स्वप्नरंजनातून देखील जगण्याचे बळ गोळा करणारा. वरपांगी कमालीचा निरुपद्रवी पण आक्रमणे एका मर्यादेपलीकडे खपवून न घेणारा, आपल्या छोट्या ताकदीने, आपल्या पद्धतीने पण लढणारा. भिडस्त तसा अनौपचारिक.

जिने उतरत असताना वाटले की खरे म्हणजे ही बैठक वातानुकूलित बंदिस्त बादशाही दालनात भरली होती तरी ती तिथली नव्हेच. मुळीच नव्हे. ती तर टवटवीत ओलसर हिरवळीवरची. कोठून तरी नृत्याचे पदन्यास रुमझुमत कानी पोचताहेत, तिकडे पलीकडे अनेक सतारीचा रियाझ झंकारतो आहे, वरच्या माडीवरच्या खुल्या स्टुडिओत कोणी चित्रकार रंगफलकाशी कुचल्याने खेळतो आहे आणि बाजूला उभा राहून उघडा मोहन घिसाड छिन्नी हातोडा सावरीत हिरवळीवरचे हे 'बौद्धिक' निरागस कुतुहलाने पहातो आहे. भिंतीपलीकडच्या जुनाट झाडावर कावळे उतरले आहेत आणि आभाळात छानशी निळाई पसरली आहे.

वाटले, या एस. उर्फ बादल सरकार नामक नाटककाराचे नाते या–या सगळ्याशी आहे, त्या वरच्या हवाबंद दालनातल्या प्रचंड रंगीबेरंगी अलमारीशी नाही, मोठ्या थोरल्या लटकत्या झुंबराशी नाही, उंच कृत्रिम छताशी नाही, कोचांशी नाही, भिंतीशी नाही, तेथल्या त्या कोंडल्या बंदिस्त हवेशीही नाही, त्याचा कोवळचा मनाचा हळवा तरुण इंद्रजित एका नैसर्गिक, मुक्त जिण्यासाठी तर तळमळतो, त्याविना त्याच्याच रक्तातल्या मध्यमवर्गीय प्रवृत्तीच्या पिंजऱ्यात तडफडत, पिचत रहातो, डोके आपटून घेत रहातो. त्याला हवी आहे मोकळी छातीभर हवा. आपले सुख प्राप्त करण्याचे नैसर्गिक स्वातंत्र्य. ते गेले म्हणून त्याचा शोक, त्याची तगमग.

भुलाभाई इन्स्टिटयूटच्या प्रवेशद्वारावाटे समोर समुद्र दिसत होता. विलक्षण अशांत, खूप गढूळ आणि वादळी.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

आवृत्ती दुसरी

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

किमत : प्रसिद्धीनंतर रुपये पंचवीस सुमारे
प्रसिद्धीपूर्व सवलतीची किंमत रुपये चौदा

सवलतीची मुदत : १५ ऑगस्ट १९७० पर्यंत
रजिस्टर पोस्टाने ग्रंथ हवा असल्यास रुपये दोन अधिक.
रक्कम मनिऑर्डरने पाठवावी. कार्यालयातही स्वीकारली जाईल.

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M-H 649

चंद्रशेखर आझाद, सुखदेव,
राजगुरु, भगतसिंग........

हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन आर्मीचे
धुरंधर सेनापती आणि सैनिक
यांच्या हौतात्म्याची वीरगाथा




लेखक : वसंत पोतदार

किमत : प्रसिद्धीनंतर रुपये पंधरा सुमारे
प्रसिद्धीपूर्व सवलतीची किमत रुपये आठ

सवलतीची मुदत : १५ ऑगस्ट १९७० पर्यंत
रजिस्टर पोस्टाने ग्रंथ हवा असल्यास एक रुपया अधिक.
रक्कम मनिऑर्डरने पाठवावी. कार्यालयातही स्वीकारली जाईल.

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०